




महाराष्ट्रात महागुंतवणूक

**३ लाख १६ हजार कोटींची गुंतवणूक**
**८४ हजार रोजगार**




पीएम विश्वकर्मा योजनेच्या १०१ कौशल्य केंद्रांचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ

**तीन लाख कारागिर येणार विकासाच्या मुख्य प्रवाहात**

# जागतिक महिला दिन






उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत पुण्यात गुंतवणूकीचा सोहळा

**४००० कोटींचे करार, ५००० रोजगार**

MCED
महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे प्रकाशन
वर्ष ३४ वे
मार्च 2024
₹ 75/-
मासिक

# उद्योजक

उद्योजकीय मन घडविणारा तत्त्वज्ञ मित्र

# सर्वोत्कृष्टतेसाठी प्रशिक्षण

**उद्योजकता विकास क्षेत्रात ३४ वर्षापासून कार्यरत संस्था**

**ध्येय (Mission)**

**जागतिक पातळीवर उद्योजकीय चैतन्य निर्मिती**

**दृष्टिकोन (Vission)**

ग्राहकांचे समाधान केंद्रस्थानी ठेवून, संघटना व व्यक्ती यांच्या उद्योजकीय व व्यवस्थापकीय क्षमतेत वृद्धी होण्यासाठी, नविनतम तंत्रज्ञानाच्या वापराद्वारे नैतिक मूल्यांची जोपासना करत साह्यभूत ठरणे. कर्मचाऱ्यांचे हित व आकांक्षा जोपासत संस्था आत्मनिर्भर व विश्वात उत्कृष्ट संस्था म्हणून संबोधली जावी.

## • ध्येय धोरणे •

१) होतकरू व नवउद्योजकांचा शोध घेवून त्यांना प्रोत्साहन देणे तसेच प्रशिक्षणाद्वारे यशस्वी उद्योजक घडविणे.
२) राज्यात उद्योजकतेचा प्रचार व प्रसार करणे. ३) उद्योजकतेच्या क्षेत्रात संशोधन करणे.
४) उद्योजकतेशी निगडीत सल्ला सेवा, ट्रेनिंग सेंटर, तांत्रिक वर्कशॉप, इंडस्ट्रियल क्लिनिक, निर्मिती केंद्र सुरू करणे.
५) उद्योजकतेच्या क्षेत्रातील माहिती / ज्ञानाचे आदान-प्रदान. ६) संस्थाना प्रशिक्षण गरजांविषयी सहकार्य करणे.
७) उद्योजकतेशी निगडीत नियतकालिके/प्रकाशने प्रकाशित करणे.

### संस्थेचे प्रमुख उपक्रम

१) उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम (EDP)
२) स्वयंरोजगार विकास प्रशिक्षण कार्यक्रम (DPSE)
३) व्यवसाय प्रशिक्षण मार्गदर्शन कार्यक्रम (VTP)
४) उद्योजकता परिचय कार्यक्रम (EAP)
५) व्याख्याते प्रशिक्षण कार्यक्रम (FDP)
६) प्रेरक प्रशिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम (TTP)
७) पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमा अंर्तगत व्यवसाय व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रम (PMEG)
८) व्यवस्थापन विकास कार्यक्रम/संस्था विकास कार्यक्रम
९) उद्योजक मासिक
१०) माहिती तंत्रज्ञानावर आधारित उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम

### उपलब्ध प्रशिक्षणाच्या पायाभूत सुविधा

१) सुसज्ज प्रशिक्षण हॉल
२) प्रशिक्षणाच्या अत्याधुनिक सुविधा.
३) सुसज्ज असे निवासी वस्तीगृह.
४) माहितीने परिपूर्ण असे ग्रंथालय.
५) उपहारागृहाची सुविधा.
६) इंटरनेट, व्हिडोओ कॉन्फरन्सींग सारख्या अत्याधुनिक सुविधा उपलब्ध.
७) स्वतःचे वेब पोर्टल कार्यान्वीत.
८) तज्ज्ञ मनुष्यबळ व प्रशिक्षीत प्रेरक प्रशिक्षकांचा समूह.
९) ११ विशेष कक्ष (सेंटर), ८ विभागीय कार्यालये व प्रत्येक जिल्ह्यात प्रेरक प्रशिक्षकाची उपलब्धता.
१०) उद्योजकतेच्या क्षेत्रांतील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील संस्थांशी समन्वय.

प्रशिक्षणाच्या गरज पूर्तीसाठी संपर्क साधा.


मा. कार्यकारी संचालक

**महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र**

अ-३८, एम.आय.डी.सी. रेल्वे स्टेशन औरंगाबाद-४३१ ००५.

Email : executivedirectormced3@gmail.com
udyojakmagazine2@gmail.com
Portal : www.mced.co.in


उद्योजकीय मन घडविणारे मासिक
**उद्योजक**

**Visit us @ http://www.mced.co.in**

**उद्योजक**

*March-2024, VOL.XXXIV, ISSUE III*

मुख्य संपादक
**बी. टी. यशवंते**

व्यवस्थापकीय संपादक
**संतोष बोर्डे**

विभाग प्रमुख, उद्योजक मासिक
**संतोष बोर्डे**

मुखपृष्ठ
**संतुक गोलेगावकर**

**पत्रव्यवहार**
मुख्य संपादक, उद्योजक,
अ-३८, एम.आय.डी.सी.,
रेल्वे स्टेशन परिसर,
छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००५.
☎ २३२१२२३, २३२१२२४
फॅक्स : (०२४०) २३४१७१९



**सल्लागार मंडळ**

**डॉ. भा. र. साबडे**
संचालक, आयएसबीआय, पुणे

**डॉ. यु. म. पठाण**
ज्येष्ठ साहित्यिक, छत्रपती संभाजीनगर.

**श्री. राम भोगले**
उद्योजक, छत्रपती संभाजीनगर

**श्री. रा. रं. बोराडे**
साहित्यिक, छत्रपती संभाजीनगर.

**संपादक**
दै. लोकमत, छत्रपती संभाजीनगर

**श्री. विवेक देशपांडे**
उद्योजक, छत्रपती संभाजीनगर

**श्री. सुधीर सेवेकर**
साहित्यिक, छत्रपती संभाजीनगर

**अध्यक्ष,** मसिआ, छत्रपती संभाजीनगर

**विभागप्रमुख,** जनसंवाद व वृत्तपत्रविद्या विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ

**श्री. सुरेश वाघ,** नाशिक



उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन
अंतर्गत कार्यरत संस्था

MCED

महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र
यांचे प्रकाशन

**E-mail :**
udyojakmagazine1@gmail.com
udyojakadvt@gmail.com

**Portal :**
www.mced.co.in



**कोणत्याही महिन्यापासून 'उद्योजक'चे वर्गणीदार होता येईल.**


# सक्षम महिला, समृद्ध भारत



महिलांच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक कामगिरीचा गौरव करण्यासाठी दरवर्षी ८ मार्च हा 'जागतिक महिला दिवस' म्हणून सर्वत्र साजरा होतो. क्लारा झेटकीन या महिलेने १९१० मध्येच याची सुरुवात केली, तर १९७५ मध्ये यास संयुक्त राष्ट्रांची अधिकृत मान्यता मिळाली. १९९६ पासून दरवर्षी एक थीम घेऊन हा दिवस साजरा केला जाऊ लागला. गेल्या ४ दशकांत सर्वच क्षेत्रांत महिलांचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. त्यास अजून चालना देण्यासाठी यंदाच्या महिला दिनाची थीम 'महिलांमध्ये गुंतवणूक करा अन् विकासाला गती द्या' (इन्व्हेस्ट इन वुमन : एक्सीलरेट प्रोग्रेस) ठेवण्यात आली आहे.

महिलांच्या विकासाला चालना देण्यासाठी राज्य व केंद्र शासनाने अनेक निर्णय घेतले आहेत. उद्योजकतेचे क्षेत्रही त्यास अपवाद नाही. एक महिला शिकली की तिचे कुटुंब शिकते हा जसा शाश्वत विचार आहे, त्याच धर्तीवर एक महिला उद्योजक झाली तर ती अनेक महिलांना रोजगार देऊ शकते, उद्योजकतेकडे वळवू शकते, हा विचारही समोर येत आहे. अधिकाधिक महिला उद्योजक घडविण्यासाठी महाराष्ट्राने देशात सर्वप्रथम खास महिला उद्योजक धोरण तयार केले. या अंतर्गत महिलांना उद्योग सुरू करण्यासाठी लागणाऱ्या भांडवलाचा काही भाग सरकार अनुदान रूपाने देत आहे. व्यवसायासाठी बँकेकडून घेतलेल्या कर्जाचे ५०% व्याज सरकार भरत आहे. महिला उद्योजकांना राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय प्रदर्शनांत सहभागी होऊन उत्पादनांची विक्री करण्यासाठीही सरकार सहाय्य करत आहे.

देशातील एकूण उद्योजकांत महिलांचे प्रमाण १३.७६% आहे. एकूण ५८.५ दशलक्ष उद्योजकांपैकी ८.०५ दशलक्ष महिला आहेत. या आस्थापनांमध्ये १३.४५ दशलक्ष महिलांना रोजगार मिळाला आहे. सुमारे ३०% महिला विविध कॉर्पोरेट समूहांमध्ये सीनिअर मॅनेजमेंट पदावर कार्यरत आहेत. यशस्वी उद्योगातील महिला अधिकाऱ्यांचे प्रमाण ७.१% आहे. हे महिला पुरस्कृत धोरणांचे परिणाम आहेत.

सर्वांना अभिमान वाटावा अशा चांद्रयान मोहिमेत महिला शास्त्रज्ञांचा समावेश होता. देशाच्या अर्थमंत्रीपदावर निर्मला सीतारामन या महिला आहेत. सीतारामन यांनी केंद्रातील मोदी सरकारच्या दुसऱ्या टर्ममधील अखेरचा अर्थसंकल्प सादर केला. यात गरीब, महिला, युवा आणि शेतकरी या चार घटकांच्या उत्थानावर भर देण्यात आला आहे. पूर्वी १ कोटी महिलांना लखपती बनविण्याचा निर्णय घेण्यात आला होता. यंदा ३ कोटी महिलांना लखपती बनवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

राज्याच्या उद्योग क्षेत्रातही महत्त्वाच्या घडामोडी घडत आहेत. दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेत यंदा राज्यात सुमारे ३ लाख ५३ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे सामंजस्य करार करण्यात आले. त्यानंतरही गुंतवणूकदारांचा ओघ सुरूच आहे. राज्याने देशात सर्वांत आधी हरित हायड्रोजन धोरण तयार केले. त्याचा लाभ घेण्यासाठी ७ उद्योगांनी हरित हायड्रोजन निर्मितीसाठी २ लाख ७६ हजार कोटींच्या गुंतवणुकीचे सामंजस्य करार केले. यातून ६४ हजार रोजगारनिर्मिती होणार आहे. अर्सेलर, मित्तल, निप्पोन, स्टिल इंडिया कंपनीनेही राज्यासोबत ४० हजार कोटी गुंतवणुकीचा सामंजस्य करार केला असून, यातून २० हजार प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रोजगारनिर्मिती होणार आहे. देशातील २४ तज्ज्ञ संस्थांसोबत राज्य शासनाने पुण्यात तब्बल ४००० कोटी रुपयांचे सामंजस्य करार केले. यातून ५००० रोजगारनिर्मिती होईल. नवतंत्रज्ञानाच्या रथावर स्वार होत कृषी आणि आरोग्य क्षेत्रात शाश्वत बदल घडविण्यासाठी राज्याने गुगलसोबत 'एआय फॉर महाराष्ट्र' सामंजस्य करार केला.

राज्यात येत असणारी मोठी गुंतवणूक येथील उद्योगस्नेही सरकार, उद्योगपूरक धोरणे, आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पायाभूत सुविधा आणि कुशल मनुष्यबळाच्या उपलब्धतेवर शिक्कामोर्तब करते. अजून मोठा पल्ला गाठायचा आहे. महिलांना अजून मोठ्या प्रमाणात उद्योग विश्वात आणायचे आहे. महिलांनी सरकारी धोरणांचा लाभ घेऊन ही संख्या वाढविण्याची, गुणवत्तापूर्ण उत्पादने, सेवा देऊन आपले वेगळेपण दाखवून देण्याची हीच योग्य वेळ आहे.


दीपेंद्र सिंह कुशवाह, भा.प्र.से.
**विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन तथा**
**अध्यक्ष, सुकाणू समिती, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (एमसीईडी)**



Edited & Published by Santosh Borde printed at M/s. Printwell International Pvt. Ltd., G-12, MIDC Chikalthana, Chhatrapati Sambhajinagar for Maharashtra Centre for Entrepreneurship Development (MCED), A-38, MIDC Area, Near Railway Station, Chhatrapati Sambhajinagar. Not responsible for unprinted articles. Chief Editor : B. T. Yeshwante

# उद्योजक

## मार्च २०२४

## अंतरंग





- ३ लाख १६ हजार कोटींची गुंतवणूक, ८४ हजार रोजगार / डॉ. आरतीश्यामल जोशी............०५
- तीन लाख कारागीर येणार विकासाच्या मुख्य प्रवाहात / प्रतिनिधी ..............................०७
- कृषी, आरोग्य क्षेत्रात शाश्वत बदल, जीवनमान उंचावणार / प्रतिनिधी ............................०९
- ४००० कोटींचे करार, ५००० रोजगार / संतोष बोर्डे..............................................११
- अर्थव्यवस्था फास्ट ट्रॅकवर / हेमंत देसाई.......................................................१३
- अंबानी कुटुंबीयांचा मजबूत कणा / प्रतिनिधी .................................................१५





- २४ व्या वर्षात सुरू केला स्मार्ट टीव्हीचा व्यवसाय, ४ वर्षांत १००० कोटींची उलाढाल / प्रतिनिधी..१७
- ब्युटी पार्लरने बहरले आयुष्याचे सौंदर्य / निशिगंधा कणकवलीकर.............................१९
- अमेरिकी नागरिकांना मराठमोळा पाहुणचार / प्रसाद घारे.......................................२१
- वय वर्षे ४२, संपत्ती ८४,३३० कोटी / प्रतिनिधी...............................................२४
- २० वर्षे बँकेची नोकरी, ५० व्या वर्षी न्याकाची स्थापना, २१,६०० कोटींची संपत्ती / प्रतिनिधी....२५
- रिअल लाईफमधील नायिका / डॉ. उमेश कणकवलीकर ......................................२७






- लक्ष्मीपतीची उद्यमशील सूनबाई / प्रतिनिधी.......................................................३०
- उद्योजकतेला चालना देण्यासाठी महिला धोरण / प्रतिनिधी.......................................३१
- अनुसूचित जातीच्या युवक-युवतींसाठी ५० जागा राखीव / प्रतिनिधी............................३४
- धोरण रोजगारनिर्मितीचे, उद्दिष्ट प्रगत महाराष्ट्राचे / संतोष बोर्डे.................................३५
- सेवाक्षेत्राला तंत्रज्ञानाचे वरदान / सुवर्णा कोलारकर ...............................................३८
- महिला उद्योजक उभे करणारी उद्योगिनी / प्रतिनिधी.............................................३९
- महिलांनो उद्योजक व्हा! / प्रतिनिधी...............................................................४१
- ब्रेकनंतरचे करिअर / जीवन मुळे.....................................................................४३
- महिलांची आकाशाला गवसणी / अक्षय निकम...................................................४५
- मागास भागात उद्योगांना सवलतीत वीजपुरवठा / प्रतिनिधी.....................................४७
- केंद्रीय अर्थसंकल्प आणि विकासाची नांदी / डॉ. डी. एस. काटे ................................४९
- कृत्रिम बुद्धिमत्ता आणि उद्योजकता विकास - नवे आयाम / डॉ. अभिराम डबीर...............५१
- नमुना प्रकल्प अहवाल / संजय सिधये ..............................................................५४

लेदर प्रॉडक्ट्स तयार करणे; बायोमास स्टोव्ह व फिश पिकल तयार करणे

याशिवाय संपादकीय, शीर्षासन, प्रश्नपेटी इत्यादी...




हरित हायड्रोजनः २ लाख ७६ हजार कोटी, आर्सेलर मित्तलः ४० हजार कोटी

# महाराष्ट्रात महागुंतवणूक

# ३ लाख १६ हजार कोटीची गुंतवणूक, ८४ हजार रोजगार

**महाराष्ट्रातील उद्योगस्नेही सरकार, उद्योगपूरक धोरणे, आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पायाभूत सुविधा आणि कुशल मनुष्यबळामुळे राज्यात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक येत आहे. राज्याने पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व लक्षात घेऊन देशात पहिल्यांदा हरित हायड्रोजन धोरण तयार केले. त्याचा लाभ घेण्यासाठी ७ उद्योगांनी हरित हायड्रोजन निर्मितीसाठी २ लाख ७६ हजार कोटींच्या गुंतवणुकीचे सामंजस्य करार केले. यातून ६४ हजार रोजगारनिर्मिती होऊन दरवर्षी ५११ कोटी किलोग्रॅम कार्बन उत्सर्जनात कपात होईल. जगप्रसिद्ध अर्सेलर मित्तल निप्पोन स्टिल इंडिया कंपनीनेही राज्यासोबत ४० हजार कोटी गुंतवणुकीचा सामंजस्य करार केला असून यातून २० हजार प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रोजगारनिर्मिती होणार आहे.**

**- डॉ. आरतीश्यामल जोशी**

जानेवारी महिन्यातील २९ तारीख राज्याच्या उद्योग विश्वासाठी महत्त्वाची ठरली. एकाच वेळी सात कंपन्यांनी हरित हायड्रोजन निर्मितीसाठी तर दावोस परिषदेनंतर लगेचच अर्सेलर मित्तल निप्पोन स्टिल इंडियाने ६ एमटीपीए क्षमतेच्या एकात्मिक पोलाद प्रकल्पाच्या उभारणीकरिता राज्यासोबत सामंजस्य करार केले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी विपीन शर्मा आणि अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत करार करण्यात आले.

**सात कंपन्यांसोबत करार :** एनटीपीसी ग्रीन एनर्जी, अवादा ग्रीन हायड्रोजन, रिन्यू ई-फ्युअल्स, आयनॉक्स एअर प्रॉडक्ट्स, एल.एन.टी. ग्रीन टेक, जे. एस. डब्ल्यू ग्रीन हायड्रोजन आणि वेलस्पन गोदावरी जीएच २ या सात विकासकांसोबत महाराष्ट्र शासनाने सामंजस्य करार केले. त्यांच्या प्रस्तावित प्रकल्पांमुळे २ लाख ७६ हजार ३०० कोटी रुपयांची आर्थिक गुंतवणूक होणार आहे, तर ७ प्रकल्पांची क्षमता ९१० केटीपीए (किलो टन्स पर अनम) असून त्यामुळे ६४ हजार रोजगारनिर्मिती होऊन प्रति वर्ष ५११ कोटी किलोग्रॅम कार्बन उत्सर्जनात कपात होईल. यापासून सुमारे ४,७३२ केटीपीए हरित अमोनिया निर्मिती होणार आहे.

**राज्यात ६ एमटीपीए क्षमतेचा एकात्मिक पोलाद प्रकल्प :** नुकतेच दावोस येथे प्रसिद्ध उद्योगपती लक्ष्मी मित्तल यांनी मुख्यमंत्री शिंदे यांची भेट घेऊन एका प्रकल्पासाठी सामंजस्य करार केला होता. त्यावेळी एका प्रकल्पावर समाधान न ठेवता एकापेक्षा अधिक प्रकल्पांसाठी गुंतवणूक करावी अशी इच्छा मुख्यमंत्र्यांनी मित्तल यांच्याकडे व्यक्त केली होती. त्यास प्रतिसाद देत अर्सेलर मित्तल निप्पोन स्टिल इंडियाने राज्यात ६ एमटीपीए क्षमतेच्या एकात्मिक पोलाद प्रकल्प उभारण्याकरिता ४० हजार कोटी गुंतवणुकीचा सामंजस्य करार केला. यातून २० हजार प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रोजगारनिर्मिती होणार आहे.



### हरित हायड्रोजन काळाची गरज

**- मुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

सामंजस्य करारानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, हरित हायड्रोजन काळाची गरज आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देखील हरित हायड्रोजनवर लक्ष केंद्रित केले आहे. केंद्र सरकारच्या हरित हायड्रोजन मिशनच्या मार्गदर्शक सूचनेनुसार राज्य शासनाने 'हरित हायड्रोजन धोरण-२०२३' प्रकाशित केले आहे. त्याद्वारे २०३० पर्यंत ५०० केटीपीए हरित हायड्रोजन निर्मितीचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी राज्य शासनातर्फे हरित हायड्रोजन विकासकांना विविध अनुदान सवलती देऊ केलेल्या आहेत. महाराष्ट्र उद्योगस्नेही सरकार असून आवश्यक त्या पायाभूत सुविधा, कुशल मनुष्यबळ असल्याने राज्यात गुंतवणूक मोठ्या प्रमाणावर होत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. महाराष्ट्र हरित हायड्रोजन परिसंस्थेमध्ये अग्रेसर बनविण्याचे उद्दिष्ट असल्याचेही त्यांनी सांगितले.



**राज्याच्या औद्योगिक विकासात योगदान :** याप्रसंगी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, राज्यातील लोह खाणींना जोडणारा हा प्रकल्प राज्याच्या औद्योगिक विकासात महत्त्वाचे योगदान देणारा आहे. महाराष्ट्रात औद्योगिक गुंतवणुकीसाठी पोषक वातावरण असून मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होत आहे. दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेमध्ये राज्यात सुमारे ३ लाख ५३ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे सामंजस्य करार करण्यात आले. थेट परकीय गुंतवणुकीमध्ये महाराष्ट्र देशात अग्रस्थानी असल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यातील पोषक वातावरणामुळे गुंतवणूक वाढत असून महाराष्ट्रात सध्या अतिविशाल पायाभूत प्रकल्प सुरू आहेत. देशात सुरू असलेल्या मोठ्या पायाभूत प्रकल्पांपैकी सुमारे ३५ टक्के प्रकल्प महाराष्ट्रात सुरू आहेत.

याप्रसंगी उद्योगमंत्री उदय सामंत, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सल्लागार मनोज सौनिक, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी विपीन शर्मा, निप्पॉन स्टिलचे उपसंचालक कुबोटा सॅन, मुख्य कार्यकारी अधिकारी अमित हरलका, उपमुख्यमंत्र्यांचे विशेष कार्य अधिकारी कौस्तुभ धवसे आदी उपस्थित होते.

**'स्किल सेंटर ऑन व्हील'चे लोकार्पण :** फिरत्या बसच्या माध्यमातून युवकांना कौशल्य प्रशिक्षण प्रदान करून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणाऱ्या 'स्किल सेंटर ऑन व्हील्स'चे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वर्षा निवासस्थानी २६ जानेवारी रोजी लोकार्पण झाले. युवकांना करिअर मार्गदर्शन देणे, त्यासाठी आवश्यक कौशल्य विकास उपक्रमाबाबत माहिती देणे, त्याचे प्रशिक्षण देणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. या उपक्रमामुळे वंचित घटकांचे आर्थिक आणि सामाजिक सक्षमीकरण होण्यास मदत मिळेल. या कार्यक्रमांतर्गत ब्युटी अ‍ॅण्ड मेकअप ट्रेड, इलेक्ट्रिकल डोमेस्टिक अप्लायन्सेस व कॉम्प्युटर एज्युकेशन या व्यवसायांच्या कार्यशाळा बसमध्ये आयोजित करण्यात आल्या आहेत. बसच्या चालन, परिवहन, देखभाल आणि दुरुस्तीसाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाबरोबर ५ वर्षांचा करार करण्यात आला आहे. या माध्यमातून १५ ते ४५ वयोगटातील गरजू युवक-युवतींना गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण मिळेल. लाभार्थ्यांना मिळालेल्या कौशल्य प्रशिक्षणाच्या माध्यमातून त्यांच्या कुटुंबाला आर्थिक आधार मिळेल, समाजातील मागास घटकांना आत्मनिर्भर बनवून मुख्य प्रवाहात आणणे शक्य होणार आहे.



### धोरण करणारे महाराष्ट्र पहिले राज्य

**- उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, हरित हायड्रोजन संदर्भात प्रभावशाली धोरण करणारे महाराष्ट्र देशातले पहिले राज्य आहे. नरेंद्र मोदी यांनी २०३० पर्यंत डीकार्बनाईज करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यानुसार वाटचाल सुरू असून हरित हायड्रोजन तंत्रज्ञानामुळे पर्यावरणाचा समतोल राखून ऊर्जा निर्मिती शक्य होणार आहे. महाराष्ट्र हरित हायड्रोजन क्षेत्रात पथदर्शी राज्य बनावे त्यासाठी आज झालेले सामंजस्य करार यशस्वीरीत्या कार्यान्वित होतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. याप्रसंगी ऊर्जा विभागाच्या प्रधान सचिव आभा शुक्ला, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्रा, महाऊर्जाच्या महासंचालक डॉ. कादंबरी बलकवडे आणि कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

**ग्रामीण भागातही कौशल्य विकास केंद्र :** याप्रसंगी मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, शासन आपल्या दारीच्या धर्तीवर स्किल सेंटर ऑन व्हील संकल्पना हा नावीन्यपूर्ण चांगला उपक्रम आहे. या योजनेच्या माध्यमातून विद्यार्थी स्वतःच्या पायावर उभे राहतील. या योजनेतून नोकरी देणारे हात तयार होतील. राज्य शासन विविध रोजगार मेळावे आयोजित करून अनेकांना रोजगार उपलब्ध करून देत आहे. या योजनेच्या माध्यमातून गावागावात जाऊन स्वयंरोजगार निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. शहरी भागाबरोबरच ग्रामीण भागात देखील स्किल डेव्हलपमेंट सेंटर सुरू केले जाणार असून या माध्यमातून जॉब ओरिएंटेड प्रशिक्षण मिळणार आहे. याप्रसंगी कौशल्य विकास व उद्योजकता, नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांची उपस्थिती होती.

*(या लेखाच्या लेखिकेला मराठी आणि इंग्रजी प्रसारमाध्यमात कामाचा १७ वर्षांचा अनुभव आहे. सध्या मुक्त पत्रकार म्हणून अनेक संकेतस्थळे, मासिके, साप्ताहिकात लिखाण करत आहेत. लेखिका छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे केंद्र तसेच महात्मा गांधी मिशन संस्थेच्या पत्रकारिता आणि जनसंवाद विभागात अध्यापन करतात.)* ■ ■




पीएम विश्वकर्मा योजनेच्या १०१ कौशल्य केंद्रांचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ

# तीन लाख कारागिर येणार विकासाच्या मुख्य प्रवाहात

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पारंपरिक कारागीर आणि हस्तकलेला ओळख प्राप्त करून देणारी पीएम विश्वकर्मा सन्मान योजना देशभरात सुरू केली आहे. केंद्राच्या अन्य योजनांच्या अंमलबजावणीत महाराष्ट्र अग्रेसर राहिला आहे. त्याप्रमाणेच पीएम विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजनेतही राज्य अग्रेसर राहील, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. जास्तीत जास्त होतकरू तरुणांनी यात सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले, तर योजनेअंतर्गत २०२८ पर्यंत ३ लाख कारागिरांना विकासाच्या प्रवाहात आणणार असल्याचे त्यांनी सांगितले.**

**- प्रतिनिधी**

मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथे पीएम विश्वकर्मा कौशल्य योजनेंतर्गत राज्यातील १०१ केंद्रांचे शुभारंभ करण्यात आले. याप्रसंगी मुख्यमंत्री म्हणाले, पीएम विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजनेतून राज्यात नवनवीन स्टार्टअपही सुरू व्हावीत. या स्टार्टअपनी जागतिक स्पर्धेत उतरावे. योजनेच्या पहिल्या टप्प्यात १५ जिल्ह्यांतील १०१ तुकड्यांना हे प्रशिक्षण देतोय. आगामी काळात अन्य जिल्ह्यांतही या प्रशिक्षणाचा विस्तार करण्यात येईल. त्याला सर्वतोपरी पाठबळ दिले जाईल.

### राज्यभरात रोजगार मेळावे

राज्यात कौशल्य विकासासाठी मुंबईसह, नागपूर, पुणे येथे कौशल्य विकास विद्यापीठ सुरू केली आहेत. राज्यात नमो रोजगार अभियानांतर्गत नमो महारोजगार मेळाव्यांचे आयोजन करण्यात येत आहे. नागपूरमध्ये मेळावा आयोजित केला होता. लवकरच ठाण्यासह राज्यभरात मेळावे होतील. महाराष्ट्र हे उद्योगाभिमुख, उद्योजकतेला प्रोत्साहन आणि प्राधान्य देणारे राज्य आहे. त्यामुळेच राज्यात मोठ्या प्रमाणात औद्योगिक गुंतवणूक येत आहे. दावोसमध्ये ३ लाख ८३ हजार कोटींचे सामंजस्य करार केले असून यातून अनेक रोजगार निर्माण होतील, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. याप्रसंगी प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य योजनेंतर्गत राज्यातील १०१ केंद्रांचा शिंदे यांच्या हस्ते रिमोटद्वारे शुभारंभ करण्यात आला.

### १५ जिल्ह्यांत १०१ ठिकाणी

कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा म्हणाले, कौशल्य विकास विभाग राज्यात जास्तीत जास्त कुशल मनुष्यबळ विकसित करण्यावर भर देत असून, राज्यात ५११ प्रमोद महाजन कौशल्य विकास केंद्रे सुरू झाली आहेत. पीएम विश्वकर्मा सन्मान योजना देखील १५ जिल्ह्यात १०१ ठिकाणी सुरू करत आहोत. यापुढे ही संख्या वाढविण्यात येईल. नमो महारोजगार मेळावे, रोजगार मेळावे यातून अधिकाधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देऊन प्रत्येक हाताला काम देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे.


### रुबिका फ्रान्ससोबत सामंजस्य करार

महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाने रुबिका फ्रान्स या जागतिक दर्जाच्या विख्यात डिझाईन संस्थेसोबत सामंजस्य करार केला. या करारांतर्गत विद्यापीठाने या अंतर्गत डिझाईन, ॲनिमेशन, गेमिंग, यू आय स्किल्स या अभ्यासक्रमांचे तसेच आंतरराष्ट्रीय प्लेसमेंट, स्टुडंट एक्स्चेंजचा अंतर्भाव असून यातून विद्यार्थ्यांना डिझाईन क्षेत्रातील जागतिक दर्जाच्या संधी उपलब्ध होतील.

### प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजना प्रमुख वैशिष्ट्ये

-प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजनेमध्ये अठरा व्यवसायांमध्ये सुतार, होड्या बनवणारे, हत्यारे बनवणारे, लोहार, टाळा बनवणारे, हातोडा आणि टूलकिट बनविणारे, सोनार, कुंभार, मूर्तिकार, चांभार,













पी एम विश्वकर्मा
सम्मान · सामर्थ्य · समृद्धि

मेस्त्री, चटई आणि झाडू बनवणारे, पारंपरिक बाहुल्या आणि खेळणी बनवणारे, न्हावी, हार बनवणारे, धोबी, शिंपी, माशाचे जाळे विणणाऱ्या कारागिरांना या योजनेचा लाभ मिळणार आहे.

-विविध १८ व्यवसायांच्या लाभार्थ्यांना ५ दिवसांचे कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यात येणार आहे. लाभार्थ्यांना संबंधित व्यवसायाच्या टूलकिटसाठी १५ हजार रुपयांचे ई-व्हाऊचर विद्यावेतन देण्यात येणार आहे. प्रशिक्षणानंतर पात्र लाभार्थ्यांना एक लाख रकमेचे ५ टक्के व्याजदराने कर्ज मिळेल. पहिल्या हप्त्याच्या कर्जाची परतफेड नियमित असल्यास लाभार्थ्यांना पुढील रु. दोन लाख रकमेचे ५ टक्के व्याजदराचे कर्ज मिळेल. वेगवेगळ्या तुकड्यांमध्ये प्रत्यक्ष प्रशिक्षणास सुरुवात करण्यात येणार आहे. राज्यातील १५ जिल्ह्यांमधील १०१ प्रशिक्षण केंद्रांमध्ये प्रत्यक्ष प्रशिक्षणास सुरुवात करण्यात येणार आहे.

-राज्यातील जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली विश्वकर्मा योजनेसाठी जिल्हा अंमलबजावणी समिती गठित झाली आहे. या योजनेत १८ व्यवसायांच्या लाभार्थ्यांना त्यांची नोंदणी जवळच्या नागरी सेवा केंद्रात करायची आहे. ग्रामपंचायत व शहरांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांनी या योजनेबद्दल जनजागृती करावी. या योजनेअंतर्गत २०२८ पर्यंत संपूर्ण भारतातील ३० लाख, महाराष्ट्रात साधारण तीन लाख लाभार्थ्यांचे उद्दिष्ट आहे.

कार्यक्रमाला कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, महाराष्ट्र राज्य नावीन्यता सोसायटीच्या आयुक्त निधी चौधरी, महाराष्ट्र खादी ग्रामोद्योग मंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आर. विमला, राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी वेद मनी, केंद्रीय कौशल्य विकास विभागाचे सचिव अतुल तिवारी दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे उपस्थित होते. कार्यक्रमाला कौशल्य विकास विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. अपूर्वा पालकर, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाचे संचालक दिगंबर दळवी, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाचे संचालक योगेश पाटील, राज्यातील १५ जिल्ह्यांतील स्थानिक लोकप्रतिनिधी, विश्वकर्मा केंद्राचे संचालक, स्थानिक शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे अधिकारी, प्रशिक्षणार्थी दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे उपस्थित होते. ■■



*उद्योजक मासिकाच्या माहे फेब्रुवारी २०२४ या विशेषअंकाचे विमोचन उद्योग संचालनाच्या कम्बाईन प्रोबेशनरी ट्रेनिंग प्रोग्राम सीपीटीपी-९ अधिकारी व उद्योग सहसंचालक तथा कार्यकारी संचालक एमसीईडी, छत्रपती संभाजीनगरचे श्री.बी.टी.यशवंते यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले.*




महाराष्ट्राचा गुगलसोबत 'एआय फॉर महाराष्ट्र' सामंजस्य करार

# कृषी, आरोग्य क्षेत्रात शाश्वत बदल, जीवनमान उंचावणार

**कृत्रिम बुद्धिमत्ता ही आता काळाची गरज झाली असून या तंत्रज्ञानाने जवळपास प्रत्येक क्षेत्रात प्रवेश केला आहे. या तंत्रज्ञानाच्या वापराने राज्याच्या कृषी आणि आरोग्य क्षेत्रात आमूलाग्र, शाश्वत बदल घडवून आणण्यासाठी महाराष्ट्र शासनाने गुगलसोबत 'एआय फॉर महाराष्ट्र' सामंजस्य करार केला आहे. आज संपूर्ण जग तंत्रज्ञानाने चालत असताना तंत्रज्ञानाच्या मदतीने प्रशासन चालविणे हा अतिशय सकारात्मक बदल ठरणार आहे, तर दैनंदिन वापरात एआयच्या वापराने सर्वसामान्य माणसाचे जीवनमान उंचावण्यास मदत होणार आहे.**

**- प्रतिनिधी**

राज्यातील कृषी, आरोग्य क्षेत्रासह विविध क्षेत्रांतील शाश्वत विकासासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) उपयोगी ठरणार आहे. त्यासाठीच गुगल इंडियाच्या पुण्यातील मुंढवा येथील कार्यालयात महाराष्ट्र शासन आणि गुगल यांच्यात ८ फेब्रुवारी २०२३ 'एआय फॉर महाराष्ट्र' सामंजस्य करार करण्यात आला. याप्रसंगी मुख्य सचिव डॉ. नितीन करीर, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव श्रीकर परदेशी, गुगल इंडियाचे भारतातील प्रमुख आणि उपाध्यक्ष संजय गुप्ता, नागपूर येथील ट्रिपल आयटीचे संचालक प्रा. डॉ. ओमप्रकाश काकडे, ॲक्सिस माय इंडियाचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक प्रदीप गुप्ता उपस्थित होते.

### जीवनमान उंचावण्यासाठी उपयुक्त

याप्रसंगी देवेंद्र फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र शासन कायम अशा अभिनव प्रयोगांना प्रोत्साहन देत आहे. गेल्या ६ महिन्यांत एआय तंत्रज्ञान वेगाने बदलले आहे. या तंत्रज्ञानात याच वेगाने बदल अपेक्षित असल्याने त्याच्या उपयोगासाठी वेगाने पावले उचलणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने कमी वेळात झालेला हा करार सकारात्मक दिशेने उचललेले पाऊल आहे. नव्या तंत्रज्ञानात लोकांचे जीवनमान बदलण्याची क्षमता असून अशा तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

### पुणे जागतिक नकाशावर येईल

गुगल ही जगातील मोठी तंत्रज्ञान कंपनी असून गुगलने तयार केलेली विविध नवी ॲप्लिकेशन्स लोकांचे जीवनमान सुधारण्यासाठी मदत करतात. गुगलसोबत नागपुरात एक ए.आय.चे उत्कृष्टता केंद्र निर्माण करत आहोत. त्याहीपुढे जाऊन विविध ७ क्षेत्रांत शाश्वततेसाठी व्यापक भागीदारीसाठी गुगलसोबत हा करार करण्याचा निर्णय घेतला असून त्यामुळे पुणे हे एआय संदर्भात जगाच्या नकाशावर येईल, असे फडणवीस म्हणाले.

### शाश्वत कृषी, आरोग्य सेवेसाठी एआय

फडणवीस म्हणाले, आज आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या युगात आपण प्रवेश केला आहे. आपल्याला जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात शाश्वतता हवी आहे. मुख्यतः आपल्या सर्वांचे जीवन शेतीच्या शाश्वततेशी संबंधित आहे. राज्यात हवामान बदल, ओला आणि सुका दुष्काळ असे शेतीवर परिणाम करणारे विविध प्रश्न असून तंत्रज्ञानाच्या सहाय्याने आपण कृषी क्षेत्रात शाश्वतता आणू शकतो. अनेक गोष्टींचा अंदाज बांधू शकतो. हीच परिस्थिती आरोग्य क्षेत्राबाबत आहे. आज सामान्य माणसापर्यंत उत्तम आरोग्य सेवा प्रदान करणे महत्त्वाचे आहे. शहरीकरणाच्या युगात उत्तम आरोग्य सेवा समाजातील शेवटच्या माणसापर्यंत पोहोचवणे अवघड ठरते. प्रशिक्षित व तज्ज्ञ डॉक्टर दुर्गम



किंवा ग्रामीण भागात जायला तयार नसतात. ग्रामीण भागातील सर्वसामान्य माणूस आरोग्य सुविधांसाठी शासकीय रुग्णालयांमध्ये जात असतो. अशा वेळी एआयसारख्या तंत्रज्ञानाचा वापर करून दर्जेदार आरोग्य सेवा अधिक चांगल्याप्रकारे समाजातील शेवटच्या माणसापर्यंत पोहोचवू शकतो.

### महाराष्ट्र स्टार्टअपची राजधानी

जागतिक स्तरावर मोठ्या कंपन्या भारताबद्दल विचार करताना माहिती तंत्रज्ञानाच्या दृष्टीने बंगळुरूचा उल्लेख करतात. मात्र, भारताची स्टार्टअप राजधानी महाराष्ट्र आहे. भारतातील सुमारे २० टक्के स्टार्टअप आणि २५ टक्के युनिकॉर्न महाराष्ट्रात आहेत. या करारामुळे पुण्याबाबतही जागतिक स्तरावर बोलले जाईल. यापूर्वी मुंबई, पुण्यापुरती मर्यादित असलेली स्टार्टअपची इको सिस्टीम आज मोठ्या स्वरूपात स्तर-२ आणि स्तर-३ शहरात पोहोचली आहे. ३० ते ३५ टक्के स्टार्टअप कृषी क्षेत्रात तयार होत असून याद्वारे आजचे तरुण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे जीवनमान बदलत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तंत्रज्ञानाच्या मदतीने थेट लाभ पोहोचविण्याची सक्षम यंत्रणा बनविल्यामुळे सामान्य माणसापर्यंत योजनांचे लाभ शेवटच्या माणसापर्यंत पोहोचत आहेत. त्यामुळे गेल्या ९ वर्षात भारतात २५ कोटी लोक दारिद्र्यरेषेच्या वर आल्याचेही फडणवीस यांनी सांगितले.

### सात क्षेत्रांसाठी भागिदारी

नावीन्यता आणि उद्योजकतेतील भागीदारीद्वारे गुगल राज्यातील स्टार्टअप इको सिस्टीमला तसेच उद्योजकता विकासाला एआय तंत्रज्ञान पुरवून सहकार्य करणार आहे. तसेच कौशल्य प्रशिक्षण आणि शिक्षण, आरोग्य, कृषी, पर्यावरण, नगर नियोजन, वाहतूक नियोजन अशा क्षेत्रासाठी या कराराद्वारे गुगलचे सहकार्य लाभणार आहे. शासकीय सेवांमध्ये नावीन्यता आणून सामान्य माणसापर्यंत शासकीय योजना प्रभावीपणे पोहोचविण्यासाठीदेखील तंत्रज्ञान उपलब्ध होणार आहे.



*उद्योग संचालनाच्या अधिकाऱ्यांच्या कम्बाईन प्रोबेशनरी ट्रेनिंग प्रोग्राम सीपीटीपी-९ प्रशिक्षण कार्यक्रमाला छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी मा. श्री. जी. श्रीकांत, भा. प्र. से. यांनी भेट दिली व प्रशिक्षणार्थींशी हितगुज केले. यावेळी श्री. संतोष बोर्डे, व्यवस्थापकीय संपादक, उद्योजक मासिक; श्री. डी. यू. थावरे, आस्थापना विभाग प्रमुख तथा विभागीय अधिकारी, एमसीईडी, छत्रपती संभाजीनगर; डॉ. अभिराम डबीर, मालमत्ता विभाग प्रमुख; श्री. देवेंद्र कटके, उपजिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर व प्रशिक्षणार्थी दिसत आहेत.*




उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत पुण्यात गुंतवणूकीचा सोहळा

# ४००० कोटींचे करार, ५००० रोजगार

**पुण्यामध्ये औद्योगिक क्षेत्राचा वेगाने विकास होत आहे. विविध प्रकारच्या उद्योगांसाठी आवश्यक पायाभूत सुविधा येथे असून नवीन उद्योगांसाठी चांगली संधी आहे. हीच वैशिष्ट्ये राज्याच्या बाबतीतही असून येथील पायाभूत सुविधा, कुशल मनुष्यबळ आणि उद्योगस्नेही सरकारमुळे मोठ्या प्रमाणात देशी व परदेशी गुंतवणूकदार येथे गुंतवणुकीसाठी येत आहेत. या मालिकेत देशातील २४ तज्ज्ञ संस्थांसोबत राज्य शासनाने पुण्यात तब्बल ४००० कोटी रुपयांचे सामंजस्य करार केले. यातून सुमारे ५००० रोजगारनिर्मिती होणार आहे.**

**- प्रतिनिधी**

दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेत यंदा महाराष्ट्राने जोरदार कामगिरी केली. परिषदेमध्ये राज्यात सुमारे ३ लाख ५३ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे सामंजस्य करार करण्यात आले. राज्यात परतल्यानंतरही गुंतवणूकदारांचा ओघ सुरू आहे. हा राज्यातील पायाभूत सुविधांवर गुंतवणूकदारांचा विश्वास दर्शवितो. या मालिकेत ८ फेब्रुवारी रोजी पुण्यातील वाकड येथील वाकड येथील हॉटेल टिपटॉप येथे देशातील २४ तज्ज्ञ संस्थांसोबत सामंजस्य करार करण्यात आले. या माध्यमातून सुमारे ५ हजार रोजगार उपलब्ध होतील. 'महाराष्ट्र राज्य निर्यात पुरस्कारा'च्या वितरण कार्यक्रमात हे करार झाले. यानिमित्त उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी विपीन शर्मा, उद्योगविकास आयुक्त दीपेंद्रसिंह कुशवाह, अपर उद्योग आयुक्त प्रकाश वायचळ, अपर उद्योग संचालक संजय कोरबू, उद्योग सह संचालक शैलेश रजपूत आदी उपस्थित होते.

### राज्यात नवीन उद्योगांन संधी

उद्योगमंत्री सामंत म्हणाले, पुण्यामध्ये औद्योगिक क्षेत्राचा विकास वेगाने होत आहे. विविध प्रकारच्या उद्योगांसाठी आवश्यक पायाभूत सुविधा येथे असून नवीन उद्योगांसाठी चांगली संधी आहे. पुण्याची क्षमता राज्यासह देशाला कळावी यासाठी येथे 'महाराष्ट्र राज्य निर्यात पुरस्कारा'चे आयोजन करण्यात आले. यापुढे अशाप्रकारचा 'उद्योजकांचा मेळा' प्रत्येक जिल्ह्यात भरविण्यात येईल. त्यामुळे त्या जिल्ह्यात उद्योगस्नेही वातावरण तयार होईल, विविध उद्योजक आकर्षित होऊन तेथील उद्योगामध्ये वाढ होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### भविष्यातील डेटा सेंटर हब

अल्ट्रामेगा प्रकल्पासोबत सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगाला चांगल्या सुविधा देणे गरजेचे आहे. उद्योजक उद्योग करीत असताना त्यांसाठी निर्यात ही महत्त्वाची असून हीच बाब विचारात घेऊन 'निर्यात धोरण २०२३' जाहीर करण्यात आले आहे. या धोरणाच्या माध्यमातून उद्योजकांना अधिक सुविधा देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. नवीन माहिती तंत्रज्ञान धोरणामुळे राज्यात मोठ्या प्रमाणात डेटा सेंटर निर्माण होत असून आगामी काळात जगातील डेटा सेंटरचे हब म्हणून महाराष्ट्र राज्य ओळखले जाईल, असा विश्वास सामंत यांनी व्यक्त केला.

### देशातील पहिले एआय धोरण राज्यात

आगामी काळात देशातील पहिले कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण आणण्यासोबतच कृत्रिम बुद्धिमत्ता पार्क निर्माण करण्याबाबत विचार सुरू आहे. राज्यात कृत्रिम बुद्धिमत्ता पार्क निर्माण करताना संरक्षण, आरोग्य, क्रीडा, कृषी आदी क्षेत्रांचा विचार करण्यात येईल. कृत्रिम बुद्धिमत्तेसोबत इलेक्ट्रिकल वाहन, हायड्रोजन या क्षेत्राच्या विकासाबाबतही प्रयत्न करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

### गडचिरोलीमध्ये १ लाख कोटीचे प्रकल्प

उद्योजकांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला पाहिजे, यासाठी उद्योजकांशी सतत चर्चा करण्यात येत आहे. शासनाच्यावतीने त्यांना उद्योगपूरक






### मैत्रीवर सर्व परवानग्या

**- डॉ. हर्षदीप कांबळे, प्रधान सचिव, उद्योग**

डॉ. हर्षदीप कांबळे म्हणाले, राज्यात परकीय गुंतवणूक, उद्योगामध्ये वाढ व्हावी, याकरिता उद्योग विभागाच्या वतीने काम करण्यात येत आहे. उद्योग सुरू करण्यासाठी लागणाऱ्या परवान्यासाठी 'मैत्री' संकेतस्थळ सुरू करण्यात आले असून आवश्यक त्या सर्व परवानग्या विहित मुदतीत देण्यात येत आहेत. राज्यात निर्यात धोरणाच्या अनुषंगाने सूचना असल्यास उद्योग विभागाला कळविण्याचे आवाहन कांबळे यांनी केले.

सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. त्यामुळे राज्यात परकीय गुंतवणूक वाढत असून उद्योगात मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्ह्यात १ लाख कोटी रुपयांचे प्रकल्प सुरू असून येत्या काळात गडचिरोली उद्योगनगरी म्हणून ओळखली जाईल, असेही उद्योगमंत्री म्हणाले.

**आदर्श घेऊन उद्योगांची उभारणी व्हावी**

पुरस्कारार्थींचे अभिनंदन करून सामंत म्हणाले, पुरस्काराला अनन्यसाधारण महत्त्व असून पुरस्कारप्राप्त व्यक्ती, संस्था यांचा आदर्श घेऊन राज्यातील इतरांनी उद्योग उभारले पाहिजेत. त्या उद्योगाच्या माध्यमातून रोजगारनिर्मिती झाली पाहिजे, हा पुरस्कार देण्यामागचा हेतू असतो. महाराष्ट्र राज्य निर्यात पुरस्काराचे स्वरूप अधिक व्यापक करण्यासाठी उद्योजकांची समिती गठित करण्याची सूचना केली. पुरस्काराचे प्रस्ताव समितीकडे देण्यात यावे, प्रस्तावाच्या अनुषंगाने समितीच्या प्राप्त सूचना विचारात घेऊन आगामी काळात पुरस्काराचे वितरण करण्यात येईल




याप्रसंगी सामंत यांच्या हस्ते 'एक्सपोर्ट पॉलिसी २०२३' या पुस्तिकेचे



### उत्पादन निर्यातीवर भर

**- मा.श्री. दीपेंद्रसिंह कुशवाह, विकास आयुक्त (उद्योग)**

दीपेंद्रसिंह कुशवाह यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. ते म्हणाले, राज्यात माहिती तंत्रज्ञान धोरण आणि निर्यात धोरणाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. निर्यातीला प्रोत्साहन देण्यासाठी जिल्हानिहाय निर्यात समिती गठित करून जिल्हा निर्यात आराखडा तयार करण्यात आला आहे. या माध्यमातून प्रत्येक जिल्ह्यातील उत्पादन निर्यात करण्यावर भर देण्यात येत आहे. दहा कलमी कार्यक्रम आखून जिल्हानिहाय निर्यातक्षम उपक्रम निश्चित करण्यात आले आहेत.

प्रकाशन तसेच निर्यातभिमुख उत्पादनाच्या प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. त्यांनी दालनांना भेट देऊन उत्पादनाची माहिती घेतली. सामंत यांनी 'महाटेक २०२४' या लघु व मध्यम उद्योजकांच्या प्रदर्शनालाही भेट दिली. यावेळी महाटेकचे संचालक विनय मराठे, सुमुख मराठे, प्रकल्प संचालक संतोष नांदगावकर, महाव्यवस्थापक सुधाकर थत्ते, पुणे प्रकल्प संचालक महेन्द्र घारे आदी उपस्थित होते.



केंद्राच्या लोकहितकारी अर्थसंकल्पात सर्वसामान्यांचा विचार

# अर्थव्यवस्था फास्टट्रॅकवर

**केंद्रातील मोदी सरकारच्या दुसऱ्या टर्ममधील अखेरचा अर्थसंकल्प अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी गेल्या महिन्यात सादर केला. बजेटमध्ये यंदा कोणतीही करवाढ प्रस्तावित नाही, तर सर्वसामान्य नागरिकांना डोळ्यासमोर ठेवून मांडलेला हा अर्थसंकल्प आहे. केंद्राने सूर्योदय योजनेसाठी १० हजार कोटींची तरतूद केली असून, यातून तब्बल १ कोटी घरांना दरमहा ३०० युनिट मोफत वीज मिळेल. अपारंपरिक ऊर्जा निर्मितीवर भर देण्यात आला आहे. उद्योगांना उभारणी देण्यासाठी विशेष तरतूद करण्यात आली आहे. आयात निर्यातीसाठी असणारी क्लिष्टता दूर करण्यात आली आहे, तर पायाभूत प्रकल्पांसाठी मोठ्या प्रमाणात निधी राखीव ठेवण्यात आला आहे. जगभरात मंदी असताना भारताची अर्थव्यवस्था फास्टट्रॅकवर आणणारा, सर्वसामान्यांचे हित जपणारा असा हा अर्थसंकल्प आहे.**

**- हेमंत देसाई**

ताज्या केंद्रीय अर्थसंकल्पात प्रधानमंत्री सूर्योदय योजनेसाठी नव्याने दहा हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या योजनेमुळे देशभरातील एक कोटी कुटुंबांना दरमहा मोफत ३०० युनिटपर्यंत वीज मिळणार आहे आणि त्यामुळे वर्षाला १८ हजार रुपयांपर्यंत प्रत्येकाची बचत होऊ शकेल. तसेच अतिरिक्त ऊर्जेची वितरण कंपन्यांना विक्रीही करता येणार आहे. सौर ऊर्जेमुळे विद्युत वाहने चार्ज करणे, मोठ्या प्रमाणात नवउद्यमींना संधी आणि निर्मिती मांडणी व देखरेख यामध्ये तांत्रिक कौशल्य असलेल्या युवकांसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत, हे अत्यंत स्वागतार्ह आहे. भारताने २०३० पर्यंत अपारंपरिक ऊर्जास्रोतांपासून ५०० गिगावॅट ऊर्जानिर्मितीचे लक्ष्य ठेवले आहे. तसेच २०७० पर्यंत शून्य कार्बन उत्सर्जनासाठी आपण बांधील आहोत. देशांतर्गत पर्यटनाला चालना देण्यासाठी लक्षद्वीपसह विविध बेटांवर बंदरजोडणी, पायाभूत सुविधा आणि पर्यटनाच्या दृष्टीने विविध प्रकल्प हाती घेतले जात आहेत. प्रतिष्ठित पर्यटनकेंद्रांचा सर्वसमावेशक विकास करण्यासाठी जागतिक स्तरावर त्यांना प्रसिद्धी दिली जाणार आहे. त्यासाठी राज्य सरकारांनाही प्रोत्साहित केले जाणार आहे. विकासाची विशिष्ट दृष्टी असल्यामुळेच ही पावले टाकत पावले टाकली जात आहेत, हे नाकारून चालणार नाही. यामागे केवळ अर्थमंत्रीच नाहीत, तर अर्थखात्यातील ज्येष्ठ अधिकाऱ्यांनी विविध खात्यांशी समन्वय ठेवून, एक उत्तम धोरणात्मक आराखडा निश्चित केला आहे.

इथे उत्पादन क्षेत्राबद्दल विस्ताराने सांगितले पाहिजे. कोविड महामारीमुळे संघटित क्षेत्रातील कारखान्यांची संख्या आणि त्यामधील स्थिर गुंतवणुकीवर प्रतिकूल परिणाम झाला; परंतु नफ्यामध्ये मात्र भरच पडली, हे लक्षात घेतले पाहिजे. केंद्र सरकारच्या सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी विभागाने २०२०-२१ आणि २०२१-२२ ची उद्योगधंद्यांविषयीची वार्षिक आकडेवारी दिली आहे. २०२०-२१ मध्ये कोविड सुरू झाला होता आणि त्यामुळे रोजगारास तडाखा बसला; परंतु २०२१-२२ मध्ये रोजगार इतका वाढला की तो कोविडपूर्व अवस्थेपेक्षाही जास्त प्रमाणात होता. २०१९ मध्ये कारखान्यांमध्ये एकूण एक कोटी ६६ लाख कर्मचारी कामाला होते; परंतु कोविड सुरू होताच, देशातील एकूण अडीच लाख कारखान्यांमधील कर्मचाऱ्यांची ही संख्या एक कोटी ६० लाखांवर आली. याच कारखान्यांमधील मजुरांची संख्या एक कोटी एकतीस लाखांवरून एक कोटी २६ लाखांवर आली. अर्थात २०२१-२२ मध्ये कर्मचारी आणि कामगारांच्या संख्येत पुन्हा वाढ झाली. सार्वजनिक आणि खासगी दोन्ही मिळून कॉर्पोरेट क्षेत्रात



जो रोजगार होता, तोदेखील महामारीचे संकट कमी झाल्यावर २०२१-२२ मध्ये पुन्हा वाढला. खरे तर २०२१-२२ मध्येदेखील कोविडचे संकट होतेच, तरीदेखील कारखानदारीच्या क्षेत्रात अधिक रोजगार आणि नफा दिसला. म्हणूनच या क्षेत्राचे महत्त्व नाकारता येणार नाही.

केंद्र सरकारने आयात-निर्यातीसाठी लागणारी कागदपत्रांची संख्या कमी करून, ती आता फक्त तीन एवढीच केली आली आहे. भारत सरकारच्या १४ सेवांसाठी एक खिडकी योजना सुरू करण्यात आली आहे. गुंतवणूकदारांना मार्गदर्शन व मदत करण्यासाठी 'गुंतवणूकसुलभ विभागा'ची निर्मिती करण्यात आली आहे. पोर्टलच्या माध्यमातून उद्योग परवान्यासाठी आवेदन प्रक्रिया, तसेच औद्योगिक सेवा २४ तास देण्यात येत आहेत. औद्योगिक परवान्याच्या वैधतेत तीन



*छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे नूतन जिल्हाधिकारी मा.श्री.दिलीप स्वामी, भा.प्र.से. यांचे स्वागत करताना मा.श्री.बी.टी.यशवंते, उद्योग सहसंचालक तथा कार्यकारी संचालक, एमसीईडी, छत्रपती संभाजीनगर स्वागत करताना दिसत आहेत.*

वर्षापर्यंत वाढ करण्यात आली आहे. संरक्षण क्षेत्रातील उत्पादनांच्या महत्त्वपूर्ण घटकांची यादी औद्योगिक परवान्यातून वगळण्यात आली आहे. नवीन वीज जोडणीसाठी लागणारे ना हरकत प्रमाणपत्र व परवानगी आदी प्रक्रिया सार्थपणे बाद करण्यात आल्या आहेत. गेल्या काही वर्षांत केंद्र सरकारने टाकलेली ही पावले आहेत. व्यापार सुलभतेसाठी करप्रणाली सुटसुटीत करण्यात आली आहेत. बहुतांश क्षेत्रांतील उत्पादन शुल्क कमी झाले आहे. तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात गुंतवणूक वाढीसाठी रॉयल्टीवर असलेला प्राप्तिकर ४५ टक्क्यांवरून दहा टक्के इतका घटवण्यात आला आहे. संरक्षण क्षेत्राच्या आधुनिकीकरणासाठी परदेशी गुंतवणूक १००% यापूर्वीच खुली करण्यात आली आहे.

एका जगप्रसिद्ध संस्थेने केलेल्या अहवालानुसार, २०२५-२६ पर्यंत भारताच्या उत्पादन क्षेत्रात एक ट्रिलियन डॉलर्स इतकी उलाढाल होईल. त्यामध्ये गुजरातचा नंबर पहिला असेल आणि त्यानंतर महाराष्ट्र व तामिळनाडूचा नंबर असेल. भारताच्या उत्पादन क्षेत्रात २०२०-२१ मध्ये १७ अब्ज डॉलर्स इतकी विदेशी थेट भांडवल गुंतवणूक झाली. मेक इन इंडिया, उत्पादनसंलग्न प्रोत्साहन योजना, आत्मनिर्भर भारत या धोरणांचा फायदा होत आहे असे दिसते. वाहन, इलेक्ट्रॉनिक्स, वस्त्र या उद्योगांना त्यामुळे विशेष चालना मिळत आहे. ही क्षेत्रे रोजगारप्रधान आहेत. भारतमाला परियोजना प्रकल्प तसेच राष्ट्रीय लॉजिस्टिक्स धोरण यामुळे उद्योग क्षेत्रात नवीन संधी निर्माण होत आहेत. सध्या देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादनात मॅन्युफॅक्चरिंग किंवा उत्पादन क्षेत्राचा सतरा टक्के वाटा आहे. येत्या सहा ते सात वर्षांत तो २१ टक्क्यांपर्यंत जाईल, अशी अपेक्षा आहे. ईझ ऑफ डुइंग बिझिनेसबाबत करण्यात आलेली प्रगती, देशातील एकूण उदार आर्थिक धोरण आणि पायाभूत सुविधांवर दिलेला भर यामुळे हे शक्य होण्याची चिन्हे आहेत.

*(या लेखाचे लेखक प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ व ज्येष्ठ पत्रकार आहेत. त्यांचा ई-मेल hemant.desai001@gmail.com आहे.)*



यशोगाथा - नीता अंबानी, संस्थापक, रिलायन्स फाउंडेशन

# अंबानी कुटुंबीयांचा मजबूत कणा

**नीता अंबानी यांचे नाव येताच रिलायन्स इंडस्ट्रीजचे प्रमुख आणि आशियातील सर्वांत श्रीमंत व्यक्ती मुकेश अंबानी यांच्या पत्नी ही ओळख डोळ्यांसमोर येते. मात्र, नीता यांची ओळख एवढ्यापुरतीच मर्यादित नाही. नीता यांचे स्वतःचे साम्राज्य आहे. यात रिलायन्स फाउंडेशनपासून ते धीरूभाई अंबानी इंटरनॅशनल स्कूल, आयपीएलची मुंबई इंडियन्स टीम, फुटबॉल लीग आणि नव्याने सुरू झालेल्या नीता-मुकेश अंबानी कल्चरल सेंटरचा समावेश आहे. अंबानी कुटुंबीयांच्या चढ-उताराच्या काळातील त्या भक्कम आधार आहेत. कधी काळी ८०० रुपयांवर शिक्षिकेची नोकरी करणाऱ्या नीता आज अंबानी कुटुंबीयांचा मजबूत कणा आहेत. - प्रतिनिधी**

नीता अंबानी म्हणजे लग्नापूर्वीच्या नीता दलाल. त्यांचा जन्म १ नोव्हेंबर १९६३ रोजी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव रवींद्रभाई दलाल तर आईचे नाव पूर्णिमा दलाल. रवींद्रभाई दलाल बिर्ला कंपनीत कार्यरत होते. लहानपणी नीता यांचे नाव नयनतारा होते. ते खूप मोठे असल्याने त्याचे नीता असे नामांतर करण्यात आले. मध्यमवर्गीय गुजराती कुटुंबातून आलेल्या नीता यांचे शालेय शिक्षण रोज मॅनर गार्डन स्कूलमधून झाले. पुढे त्यांनी नरसी मोनजी कॉलेज ऑफ कॉमर्स अँड इकॉनॉमिक्समधून बॅचलर पदवी घेतली. त्यांनी इंटिरिअर डिझायनरचा कोर्सही केला आहे.

### नृत्याचे परफॉर्मन्स पाहून विवाह

नीता यांच्या कुटुंबात संगीत आणि शास्त्रीय नृत्याची आवड होती. त्यांची आई प्रसिद्ध गुजराती नृत्यांगणा होत्या. नीता ८ वर्षांची असताना आईने त्यांना नृत्य शिकवायला सुरुवात केली. त्यांनी भरतनाट्यमचे रितसर शिक्षण घेतले. खरं तर त्यांना याच क्षेत्रात करिअर करायचे होते, तर त्यांच्या आईची इच्छा होती की नीता यांनी चार्टर्ड अकाउंटंट व्हावे. एके दिवशी एका सांस्कृतिक कार्यक्रमात त्यांनी नृत्य सादर केले. रिलायन्सचे संस्थापक आणि चेअरमन धीरूभाई अंबानी आणि त्यांच्या पत्नी कोकिलाबेन देखील या कार्यक्रमाला उपस्थित होत्या. दोघेही नीताच्या नृत्याने इतके प्रभावित झाले की त्यांनी नीता यांना आपली सून बनवण्याचे ठरवून टाकले. धीरूभाईंनी आयोजकांकडून त्यांच्याबद्दल माहिती घेतली आणि पत्ता विचारून नीता यांना संपर्क साधला. धीरूभाई यांनी स्वतः नीता यांच्या घरी फोन केला. योगायोगाने तो नीता यांनीच उचलला. धीरूभाई बोलतोय असे सांगताच कोणी गंमत करतंय म्हणून नीता यांनी मी एलिझाबेथ टेलर बोलतेय असे सांगून फोन ठेऊन दिला. धीरूभाईंनी पुन्हा फोन केला पण यावेळी नीताच्या वडिलांनी फोन उचलला आणि त्यांनी धीरूभाईचा आवाज ओळखला. त्यांनी नीताला भेटण्याची इच्छा व्यक्त केली.

### विवाहानंतरही केली नोकरी

नंतर अंबानी कुटुंब नीता यांना बघण्यासाठी त्यांच्या घरी गेले. त्यावेळी नीता यांनी मुकेश यांना लग्न करण्यापूर्वी एक अट घातली. ती म्हणजे विवाहानंतरही त्यांना काम करण्यापासून कोणी रोखणार नाही. अंबानी कुटुंबाने ही अट मान्य केली आणि ८ मार्च १९८५ मध्ये मुकेश आणि नीता यांचा विवाह झाला. त्यांना आकाश आणि ईशा ही जुळी मुले आहेत, तर अनंत हा धाकटा मुलगा आहे. लग्नानंतरही नीता यांनी वर्षभर शाळेत ८०० रुपये पगारावर शिक्षिका म्हणून काम केले. एका मुलाखतीत मुकेश अंबानी यांनी सांगितले होते की, नीता दरमहा मिळणारा पगार त्यांच्या हातात ठेवायच्या.

### रिलायन्स इंडस्ट्रीत मिळाला प्रवेश

शिक्षिकेची नोकरी सुरू असतानाच रिलायन्सने गुजरातच्या जामनगरच्या रिफायनरीत टाउनशिप विकसित करण्याचे काम हाती घेतले. येथून नीता अंबानी रिलायन्स इंडस्ट्रीजमध्ये रुजू झाल्या. त्यांनी टाऊनशिपचे दैनंदिन काम हाताळण्यास सुरुवात केली. त्यानंतर २००३ मध्ये धीरूभाई अंबानी इंटरनॅशनल स्कूलच्या स्थापनेपासून त्यांचा सहभाग होता. त्या शाळेच्या संस्थापक आणि अध्यक्ष आहेत.




येथून त्यांच्यातील यशस्वी उद्योजिका समोर आली. त्या रिलायन्स इंडस्ट्रीजच्या कार्यकारी मंडळाच्या सदस्य पदापर्यंत पोहोचल्या आहेत.

### रिलायन्स फाउंडेशनची स्थापना

रिलायन्स इंडस्ट्रीजला सामाजिक क्षेत्रात ओळख देण्याचे काम रिलायन्स फाउंडेशनने केले. त्याची संपूर्ण कल्पना नीता अंबानी यांचीच होती. त्याची सुरुवात त्यांनी २०१० मध्ये केली. रिलायन्स फाउंडेशन शिक्षण आणि क्रीडा क्षेत्रात काम करते. त्यामुळे देशातील ६.६ कोटी लोकांच्या जीवनात गुणात्मक बदल झाला आहे. यासोबतच फाउंडेशन कला आणि संस्कृतीला क्षेत्रातही भरभरून काम करत आहे. अमेरिकेतील प्रसिद्ध मासिक 'टाऊन अँड कंट्री' ने त्यांना त्यांच्या समाजसेवेच्या कार्यासाठी टॉप २० सामाजिक कार्यकर्त्यांच्या यादीत स्थान दिले आहे. या यादीत स्थान मिळवणाऱ्या त्या एकमेव भारताय महिला आहेत.

### नीता अंबानी यांची लक्झरी जीवनशैली

**दररोज ३ लाख रुपयांचा चहा -** नीता अंबानी यांचा दिवस महागड्या चहाने सुरू होतो. त्या सकाळचा चहा जपानच्या सर्वांत जुन्या क्रॉकरी ब्रँड नोरिटेकने बनवलेल्या कपमध्ये पितात. या एका कपाची किंमत तीन लाख रुपये आहे.

**महागड्या कारच्या शौकीन -** नीता यांना कारची आवड आहे. त्यांच्या ताफ्यात मेबेक ६२ ही सुमारे १० कोटीची कार आहे. ती मुकेश यांनी खास लंडनहून भेट म्हणून आणली आहे. ही कार भारतात आणणारे मुकेश हे पहिले व्यक्ती आहेत.




**स्टाइलिश शूज -** नीता एकदा घातलेले पादत्राने पुन्हा घालत नाहीत. गार्सिया, जिमी चू, पेल्मोरा, पॅड्रो, मार्लिन हे त्यांचे आवडीचे शूज आणि सँडल ब्रँड आहेत. एका जोडाची किंमत ५ लाख रुपयांपासून सुरू होते.

**महागडे दागिने -** नीता यांना पारंपरिक सोने आणि कुंदनाचे दागिने आवडतात. महत्त्वाच्या कार्यक्रमात त्या हिऱ्यांचे दागिने घालतात. त्यांच्या अंगठ्याची सुरुवातीची किंमत ५ ते ७ लाख रुपयांपासुन होते.

**घड्याळांचा संग्रह -** नीता महागड्या घड्याळीच्याही शौकीन आहेत. त्यांच्याकडे बलगरी, कॅरीटायर, गुसी, रॉडो, क्लेन आणि फॉसील सारख्या ब्रँडची घड्याळे आहेत. या घड्याळांची किंमत १० ते २० लाखांच्या दरम्यान आहे.

**४० लाखांची साडी -** नीता अंबानी यांच्याकडे महागड्या साड्यांचे कलेक्शन आहे. त्यांच्याकडे असणाऱ्या विवाह पातू ब्रँडच्या एका साडीची किंमत ४० लाख रुपये आहे. ही साडी जवळपास ३६ महिला कारागिरांनी मिळून एका वर्षात बनवली आहे. या साडीची 'गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड'मध्येही नोंद झाली आहे. साडीचे वजन सुमारे ८ किलो आहे.

**लिपस्टिक -** नीता अंबानी यांच्या मेकअप किटमध्ये लाखो रुपयांची लिपस्टिक आहेत. विशेष ऑर्डरवर बनवलेल्या लिपस्टिकची किंमत सुमारे ४० लाख रुपये आहे.

**हँडबॅग -** नीता यांच्याकडे शनेल, गोयार्ड आणि जिमी चू सारख्या जगातील सर्वांत महागड्या ब्रँड्सच्या हँडबॅग आहेत. हिऱ्यांनी जडलेल्या या बॅगची किंमत ४ लाख रुपयांपासून सुरू होते.

**खाजगी विमान -** नीता अंबानी यांच्याकडे स्वतःचे खाजगी विमान देखील आहे. हे मुकेश अंबानी यांनी त्यांच्या वाढदिवशी भेट दिले होते. याची किंमत सुमारे ४१५ कोटी रुपये आहे.

### तणावमुक्तीसाठी योगा

नीता स्वतःला फिट ठेवण्यासाठी अनेक नियम कटाक्षाने पाळतात. आहार आणि व्यायाम यावर लक्ष देतात. रोज सकाळी ४० मिनिटे व्यायाम, योगा आणि पोहतात. काम संपल्यानंतर संध्याकाळीही ३० मिनिटे व्यायाम आणि योगा करतात. दिवसाची सुरुवात बदाम आणि अक्रोड खाऊन करतात, तर दुपार आणि रात्रीच्या जेवणात जास्तीत जास्त हिरव्या भाज्या आणि सूपचा समावेश करतात. योगामुळे तणावमुक्त राहतात.



यशोगाथा : देविता सराफ
सीईओ आणि चेअरपर्सन, व्हीयू टेक्नॉलॉजीस्

# २४ व्या वर्षात सुरू केला स्मार्ट टीव्हीचा व्यवसाय, ४ वर्षांत १००० कोटींची उलाढाल

**असे म्हणतात की, संयमाचे फळ गोड असते. व्हीयू टेक्नॉलॉजीज्च्या संस्थापक, सीईओ आणि चेअरपर्सन देविता सराफ यांच्याकडे बघितल्यावर याची खात्री पटते. झेनिथ कॉम्प्युटर्स या नामांकित कंपनीचे संचालक राजकुमार सराफ यांची कन्या देविता यांनी पारंपरिक व्यवसायात न उतरता थोडी वेगळी वाट निवडली. वयाच्या २४ व्या वर्षी टीव्ही आणि संगणक एकत्र करून व्हीयू (VU) स्मार्ट टीव्हीचे उत्पादन सुरू केले. सुरुवातीच्या ८ वर्षांत फक्त ३० कोटींचा व्यवसाय झाला. मात्र, त्यांनी संयम न ढळू देता काम सुरूच ठेवले आणि पुढील ४ वर्षांत त्यांनी १००० कोटींच्या उलाढालीचा पल्ला गाठला. आज देशभरात ८० वितरक आणि १५०० स्टोअर्स आणि जवळपास सर्वच ऑनलाइन प्लॅटफॉर्मद्वारे व्हीयू टीव्ही ३० लाख घरात पोहोचला आहे. - प्रतिनिधी**

आयआयएफएल वेल्थ आणि हुरून इंडियाने अलीकडेच जाहीर केलेल्या ४० आणि त्यापेक्षा कमी वयाच्या सेल्फमेड श्रीमंतांच्या यादीत एकमेव महिला ३९ वर्षांच्या देविता सराफ यांचा समावेश होता. या यादीत त्या १६ व्या स्थानावर होत्या. फॉर्च्युन इंडियाच्या २०१९ च्या यादीत भारतातील ५० शक्तिशाली महिलांमध्येही त्यांना स्थान मिळाले. इंडिया टुडेने २०१८ मध्ये व्यवसाय जगतातील ८ सर्वांत शक्तिशाली महिलांमध्ये देविता सराफ यांना स्थान दिले आहे. प्रसिद्धीपासून दूर राहणाऱ्या देविता व्हीयू टेक्नॉलॉजीज्च्या सीईओ आणि चेअरपर्सन आहेत.

### झेनिथ कॉम्प्युटर्सचा पाया

उत्तर प्रदेशातील मारवाडी कुटुंबात जन्मलेल्या देविता यांना व्यवसायाची भक्कम कौटुंबिक पार्श्वभूमी असली तरी त्यांनी स्वतःचे विश्व तयार केले आहे. भारतातील प्रसिद्ध संगणक ब्रँड झेनिथ कॉम्प्युटर्सचे मालक राजकुमार सराफ यांची ती मुलगी आहे. लहानपणी त्या वडिलांसोबत कंपनीत जायच्या. येथूनच व्यवसायाची प्रेरणा मिळाली. वयाच्या १६ व्या वर्षी व्यवसायाच्या युक्त्या शिकण्यास सुरुवात केली. खरं तर वडिलांच्या व्यवसायालाही त्यांना पुढे नेता आले असते. मात्र, देविताला नेहमीच काहीतरी वेगळे करायचे होते. त्यामुळेच त्यांनी कौटुंबिक व्यवसायात उतरणे टाळले. आंतरराष्ट्रीय बाजारपेठ समजून घेण्यासाठी कॅलिफोर्नियातून एमबीए केले. शिक्षण पूर्ण





केल्यानंतर, त्यांनी आपल्या पिढीच्या एक पाऊल पुढे जाण्याचा निर्णय घेतला आणि असे काही सुरू केले ज्यामुळे टेलिव्हिजन क्षेत्राची व्याख्याच बदलली.

### बदलत्या तंत्रज्ञानाचा स्मार्ट टीव्ही

२००६ मध्ये तंत्रज्ञान झपाट्याने बदलत होते. गुगल आणि ॲपलसारख्या कंपन्या मोबाईल आणि कॉम्प्युटरमधील दरी कमी करण्यासाठी धडपडत होत्या. देविता यांनी ही संधी साधली आणि संगणकाचे सीपीयू आणि टीव्हीच्या संगमातून स्मार्ट टीव्हीचे उत्पादन करण्याचा निर्णय घेतला. हा तो काळ होता



**आव्हानांना घाबरू नका, सामना करा**

**- देविता सराफ,**
**सीईओ आणि चेअरपर्सन, व्हीयू टेक्नॉलॉजीज्**

नव्या पिढीला व्यवसायात उतरायचे असेल तर जोखीम पत्करण्यास घाबरू नका. व्यवसायात स्वतःला सिद्ध करण्यासाठी आव्हानांचा सामना करावाच लागेल. जाणीवपूर्वक कामाला सुरुवात केली तर उशिरा का होईना त्याचा फायदा नक्कीच मिळेल. फक्त तुमच्यासोबत आर्थिक बॅकअप ठेवा, जेणेकरून जोखीम घेताना भीती वाटणार नाही. महिलांचे केवळ सौंदर्यासाठीच नव्हे तर त्यांच्या प्रतिभेचेही कौतुक केले पाहिजे.

जेव्हा लोक स्मार्ट टीव्हीचा फारसा विचारही करत नव्हते. देविताने काळाच्या पुढे जात वयाच्या अवघ्या २५ व्या वर्षी २००६ मध्ये VU Televisions या कंपनीची स्थापना केली आणि लोकांना घराघरात थिएटरसारखा अनुभव देणारा टीव्ही पोहोचवला. या स्मार्ट टीव्हीमध्ये यूट्यूब, ओटीटी प्लॅटफॉर्मसह डीटूएच चॅनेलचाही आनंद घेता येतो.

### जगाला आव्हान देण्यासाठी प्रीमियम उत्पादने

व्यवसायाबाबत नवीन माहिती घेण्यासाठी देविता अमेरिकेत गेल्या. विदेशी कंपन्या प्रीमियम उत्पादने बनवतात, तर भारतीय कंपन्या स्वस्त उत्पादनांवर अवलंबून असल्याचे निरीक्षण त्यांनी नोंदवले. त्यामुळे जागतिक बाजारपेठेला टक्कर देण्यासाठी त्यांनी उच्च दर्जाची उत्पादने बनविण्यास सुरुवात केली. हे टीव्ही मल्टीटास्किंग कामासाठी वापरता येतात. याशिवाय, त्यांची कंपनी अंड्रॉईडवर चालणारे हाय डेफिनेशन टीव्ही देखील बनवते. मोठ्या स्क्रीनसह, कंपनीकडे कॉर्पोरेट वापरासाठी टीव्ही देखील आहे. आजघडीला त्यांचे टीव्ही २२ हजार ते ३.३० लाख रुपयापर्यंतचे आहेत.

### आठ वर्षांनंतर गवसला राजमार्ग

२००६ मध्ये व्यवसायाची सुरुवात केली असली तरी त्या काळात भारतात इंटरनेटचे फार प्रस्थ नव्हते. उपलब्ध असणारे इंटरनेट महागडे होते. स्मार्ट टीव्हीसाठी इंटरनेट हे प्रामुख्याने लागते. त्यामुळे त्या काळात हे उत्पादन लोकांपर्यंत नेणे आणि त्यांना याचे महत्त्व पटवून देणे हे मोठे आव्हान होते. त्यामुळे यशासाठी तब्बल ८ वर्षे वाट पाहावी लागली. मात्र, त्यांनी संयम सोडला नाही. एवढ्या पुढे आल्यावर मागे वळण्याचाही प्रश्नच नव्हता. २०१४ मध्ये देशात इंटरनेट स्वस्त झाले. तंत्रज्ञानाला मागणी वाढली. या काळात त्यांच्या टीव्हीलाही गती मिळाली. पहिल्या ८ वर्षांत कंपनीने ३० कोटी कमावले. २०१७ मध्ये कंपनीची उलाढाल सुमारे ५४० कोटी रुपये होती. आता कंपनीची उलाढाल १००० कोटींवर पोहोचली आहे. आज या टीव्हीचे भारतभरात ३० लाखांहून अधिक ग्राहक आहेत. कंपनी जगातील ६० देशांमध्ये टीव्ही विकते.

### मुलगी समजून गांभीर्याने घेत नव्हते.

अनेक आव्हांनाचा सामना करत देविताने कंपनीला इथपर्यंत आणले. एका मुलाखतीत देविताने सांगितले, त्या बिझिनेसच्या संदर्भात डीलर किंवा निर्मात्यांना भेटायची तेव्हा लोकं त्यांना मुलगी समजून फार गांभीर्याने घेत नसत. काहींना वाटायचे की मुलगी एवढा मोठा व्यवसाय कसा सांभाळणार. देविताच्या मते, जेव्हा तुम्हाला पुढे जायचे असते तेव्हा तुम्ही अशा गोष्टींकडे दुर्लक्ष करतात. मात्र, आता लोकांची विचारसरणी बदलत असल्याचे त्यांचे मत आहे.

### पंतप्रधान मोदींनीही केले कौतुक

२०१७ मध्ये देविताने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत तरुण सीईओंसोबतच्या बैठकीत भाग घेतला होता. यामध्ये या सीईओंना न्यू इंडियासाठी त्यांच्या कल्पना देण्यास सांगण्यात आले होते. या कार्यक्रमात देविताने मेक इन इंडियावर आपले विचार मांडले. नंतर मोदींनीही त्यांच्या भाषणात देविताची कल्पना सांगितली होती. अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी देविता यांना भारताची इवांका म्हटले होते. ■■







यशस्वी व्यावसायिका-शुभांगी पाटील, संचालक, पनाश ब्युटी पार्लर

# ब्युटी पार्लरने बहरले आयुष्याचे सौंदर्य

**शुभांगी पाटील यांना लहानपणापासून नटण्या-मुरडण्याची आवड होती. घरातल्या बाहुल्यांचाही त्या मेकअप करायच्या. विवाहानंतर मुंबईला आल्या. येथे काही काळ स्क्रीन प्रिंटिंगचा व्यवसाय केला. नंतर ब्युटी पार्लरचा कोर्स करून स्वतःचे 'शुभा ब्युटी पार्लर' सुरू केले. मेकअप करण्याची बालपणाची हौस व्यवसायात रूपांतरित केली. आधी पतीच्या उद्योगासाठी गुजरात तर नंतर नोकरीनिमित्त पिंपरी-चिंचवडला स्थलांतरित झाल्या. पार्लरचे नाव 'पनाश ब्युटी पार्लर' केले. ब्युटी पार्लरचे प्रशिक्षण देण्यासही सुरुवात केली. यात ५०० हून अधिक मुली प्रशिक्षण घेऊन स्वतःच्या पायावर उभ्या आहेत. हिरकणी विकास प्रतिष्ठानच्या माध्यमातून महिलांच्या समस्या सोडवितात. ब्युटी पार्लरच्या व्यवसायाने त्यांच्या आयुष्यालाही सौंदर्य प्राप्त झाले आहे. त्यांचे कर्तृत्व प्रेरणादायी आहे.**

**- निशिगंधा उमेश कणकवलीकर**

अमेरिकेच्या युनिसिटी संस्थेने डॉ. उमेश कणकवलीकर सरांचे लोणावळा येथे प्रशिक्षण आयोजित केले होते. प्रशिक्षणानंतर फोटोसेशन आणि ऑटोग्राफ सेशन झाल्यावर आम्ही पुण्याच्या दिशेने निघणार, इतक्यात एक सुंदर महिला स्मितहास्य करत मला म्हणाली, 'निशिगंधाजी, आपण सरांना अनमोल साथ देत आहात. हे पाहून मन भरून आलं आहे. क्षणातच आमची ओळख मैत्रीत रूपांतरित झाली. आम्ही सोबतच प्रवास केला. त्या दरम्यान तिच्या कारकीर्दीविषयी अधिक माहिती मिळाली. अलीकडेच तिला भारतभर लोकप्रिय अशा 'गृहलक्ष्मी' मासिकातर्फे 'मिसेस इंडिया' हा पुरस्कार मिळाला. तेव्हाच मी ठरवलं की उद्योजक महिला विशेषांकामध्ये या हरहुन्नरी मैत्रिणीची मुलाखत प्रकाशित करायची. चला तर, जाणून घेऊया एका उद्योजिकेची यशोगाथा.

मी सौ. शुभांगी विष्णू पाटील बोलतेय. माझा जन्म २१ सप्टेंबर, १९७३ रोजी जळगाव जिल्ह्यातील रावेर तालुक्यातील पाल या थंड हवेच्या ठिकाणी झाला. माझे वडील श्री. दिनकर पाटील एमएसईबीमध्ये नोकरी करायचे. माझी आई सौ. शालिनी ही फॅशन डिझायनर होती. आम्ही सुखवस्तू होतो. माजी राष्ट्रपती सौ. प्रतिभाताई पाटील माझ्या आजोबांच्या क्लासमेट होत्या. त्यांचे आमच्या घरी येणे-जाणे होते. त्यामुळे त्यांची प्रतिमा माझ्या मनावर कायम कोरलेली होती. आमच्या घराण्याला नामवंत कवयित्री बहिणाबाई चौधरी यांचा वारसा लाभला आहे, याचा आम्हाला अभिमान आहे. या दोन्हीही व्यक्ती आमच्या कुटुंबाच्या प्रेरणास्थान आहेत.

आम्ही चार भावंडं आहोत. मला दोन बहिणी सौ. चेतना, सौ. निलिमा आणि निलेश नावाचा भाऊ आहे. आम्हा भावंडांचं एकमेकांवर प्रेम आहे. लहानपणी माझे भरपूर लाड झाले; पण भावंडं झाल्यावर माझे लाड आपोआपच कमी झाले. ही गोष्ट मला प्रकर्षाने जाणवू लागली आणि मग तिथून जो संघर्ष सुरू झाला सतत चालूच आहे. माझ्या वडिलांना फोटोग्राफीची, तसेच चित्रपट पाहण्याची प्रचंड आवड होती. ते दर रविवारी आम्हाला चित्रपट दाखवायचे. त्या चित्रपटातील सिने-तारकांना पाहून त्यांनी केलेल्या नट्टा-पट्टाच्या मी प्रेमातच पडायचे. तेव्हापासून मला मेकअपची आवड निर्माण झाली. घरी स्वतःला, बाहुल्यांना आणि मैत्रिणींना मेकअप करण्याचा खेळ मी खेळू लागले. तिथेच माझ्यातील ब्युटीशियनचा जन्म झाला.

आम्ही 'सोविएत-नारी' आणि 'गृहशोभा' या मासिकांचे वर्गणीदार होतो. या मासिकांमध्ये वाचकांचे प्रश्न आणि तज्ज्ञांची उत्तरे हे माझे आवडते सदर होते. सदर वाचून मी त्यांची कात्रणे एका वहीत चिकटवून ठेवायची. या सवयीचा मला पुढील आयुष्यात वैयक्तिक आणि व्यावसायिक दृष्टिकोनातून खूप फायदा झाला. मला अभ्यासाची फारशी आवड नव्हती, तरी मी बी. एससी. पर्यंतचे शिक्षण घेतले. मी अठराव्या वर्षी लग्न होऊन मुंबईला आले. माझे पती ठाणे येथे कलर-केम या विख्यात कंपनीमध्ये कामाला होते. लग्नानंतर शिक्षणासोबत स्वतःच्या पायावर उभं राहण्यासाठी मी स्क्रीन प्रिंटिंगचा कोर्स केला. मला स्क्रीन प्रिंटिंगची मोठी कामं मिळाली; पण गरोदरपणात पायावर उभं राहून काम करणं कठीण झालं. त्यामुळे मी त्या उद्योगाकडे पाठ फिरवली; पण माझा उद्योजिका बनण्याचा ध्यास मला स्वस्थ बसू देईना. म्हणून मी ब्युटी

पार्लरचा कोर्स केला. १९९४ साली मी डोंबिवलीमध्ये ‘शुभा ब्युटी पार्लर’ नावाने रजिस्टर्ड ब्युटी सलून सुरू केलं. या संस्थेची मी कल्याणमध्ये वर्षभरासाठी दुसरी शाखा सुरू केली. या क्षेत्राची आवड असल्यामुळे मी भरघोस यश मिळवलं. माझ्या पतीने नोकरी सोडून उंबरगाव, गुजरात येथे स्वतःची कंपनी सुरू केली. आम्ही सहकुटुंब, सहपरिवार तिथे राहू लागलो. तिथे पण मी ब्युटी पार्लर सुरू केलं. माया परांजपे या माझ्यासाठी आदर्श व्यक्तिमत्त्व आहेत. माझी लहानपणापासूनची इच्छा होती, म्हणून मी माया परांजपे यांच्याकडून ब्युटी पार्लर क्षेत्रातील अभ्यासक्रम पूर्ण केला. अरोमा थेरपी, ब्युटी थेरपी, हेअर टेक्निक्स, पंचकर्म इत्यादी कला-कौशल्ये मी विकसित केली. ‘सेडेस्को’ हा इंटरनॅशनल ख्यातीचा पोस्ट-ग्रॅज्युएशनचा कोर्स मी शिकले. ब्युटी थेरपी या क्षेत्रातील लंडन आणि स्वित्झर्लंडमधून नामांकित डिग्री प्राप्त केली.

कालांतराने माझ्या मिस्टरांना टाटा समूहात चांगली नोकरी मिळाली, म्हणून त्यांनी उद्योग बंद केला. आम्ही पुण्यात पिंपरी-चिंचवड येथे स्थलांतरित झालो. माझा मुलगा विक्रांत मला म्हणाला की, शुभा हे नाव जुन्या पद्धतीचं वाटतं. आजच्या आधुनिक काळात तुझ्या उद्योगाचं काहीतरी आगळंवेगळं नाव असावं. त्यानेच मला ‘पनाश (Panache) ब्युटी पार्लर’ हे नाव सुचवलं. पनाशचा अर्थ मुकुटातील ऐटबाज कलगी तुरा. मी माझा उद्योग थाटामाटात कौशल्यपूर्ण पद्धतीने आणि आत्मविश्वासाने करते. म्हणून हे नाव माझ्या उद्योगाला साजेसं आहे, असं मलाही वाटलं आणि या नावावर आम्ही शिक्कामोर्तब केला. त्यावेळेस ‘काटों से खींच के ये आंचल, तोड के बंधन बांधे पायल। कोई ना रोको दिल की उडान को, दिल वो चला हा हा हा हा हा, आज फिर जीने की तमन्ना है।’ हे गाणं गाऊन मी माझा आनंद व्यक्त केला.

मी आमच्याकडे आलेल्या महिला ग्राहकांची मैत्रीणच होते. कळत-नकळत मी त्यांचं समुपदेशन, अर्थात कौन्सिलिंगही करते. माझी ही कार्यपद्धती महिलांमध्ये लोकप्रिय झाली आहे. मला ही कला वाचनातून अवगत झाली. लहानपणापासून आमच्या घरातील वातावरणही सल्लामसलतीचं होतं. माझे वडील, माझे आजोबा गावकऱ्यांच्या शंकांचे निरसन करायचे आणि त्यांच्या समस्या सोडवायचे. त्या घटनांमधून खूप शिकले. महिला माझ्याकडे त्यांचे वैयक्तिक प्रॉब्लेम्स घेऊन येतात. मी शांतपणे ते ऐकून घेते आणि त्यांचे प्रॉब्लेम्स सोडवण्यात मदत करते. कधीकधी मी त्यांची नैराश्यातून सुटका करते. या सर्व गोष्टी माझ्या उद्योगाला पूरक ठरतात. मी देखील एक चांगली ग्राहकसेवा म्हणून या उपक्रमाकडे लक्ष देते. एक सखी दुसऱ्या सखीला माझ्यापर्यंत घेऊन येते. अशा रीतीने माझे नेटवर्क दिवसेंदिवस वाढत आहे. याच धर्तीवर मी आणखी एक महत्त्वाचं पाऊल उचललं, ते म्हणजे मी स्वतः ब्युटी पार्लरचे क्लासेस सुरू केले. आजवर मी ५०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना प्रशिक्षित केलं आहे. माझ्या या पनाश उद्योगामुळे रोजगारनिर्मितीही झाली आहे.

मला लहानपणापासूनच वाचनाची आवड आहे. माझ्या घरात माझ्या क्षेत्राशी निगडित १०० पेक्षा जास्त पुस्तकांची लायब्ररी आहे. ‘मी विजेता होणारच!’ या पुस्तकाचा मला माझ्या जीवनात खूप फायदा झाला आहे. सरांकडून मला कायमस्वरूपी प्रोत्साहन आणि प्रेरणा मिळत असते. उद्योग क्षेत्रात सल्ला हा तज्ञ व्यक्तीकडूनच घेतला पाहिजे. अलीकडेच मी उमेश सरांकडून आर्थिक सल्ला घेतला, ज्यामुळे माझे मोठे नुकसान टळले. त्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे. मी पूर्णतः शाकाहारी आहे. मला अध्यात्माची पण आवड आहे. मी शिवभक्त आहे. मी दररोज पहाटे ब्रह्ममुहूर्तावर उठून माझ्या दिनचर्येची सुरुवात मेडिटेशनने करते. घरातील कामं आटपून योगा करते. त्यानंतर सकाळी १० ते सायंकाळी ८ वाजेपर्यंत पार्लरला जाते. आई, पत्नी, गृहिणी, मैत्रीण आणि उद्योजिका हे सर्व रोल मी चांगल्या पद्धतीने सांभाळते. माझ्या कुटुंबाला माझा अभिमान आहे. मी माझ्या माहेरच्या आणि सासरच्या नातेवाइकांशी छान पद्धतीने स्नेहसंबंध जोपासले आहेत. कितीही काम पडलं तरी मी थकत नाही.

मी ‘हिरकणी विकास प्रतिष्ठान’ नावाची संस्था स्थापन केली आहे. निराधार स्त्रियांना स्वतःच्या पायावर उभे करणे हे माझे उद्दिष्ट आहे. आम्ही या अंतर्गत केंद्र आणि राज्य शासनाच्या योजना राबवतो. माझ्याकडे सेन्ट्रल गव्हर्नमेंटचे ब्युटी पार्लरचे क्लासेस पण आहेत. सध्या आम्ही महिलांना हॉटेल मॅनेजमेंटचा कोर्स फ्रीमध्ये देत आहोत. वाजवी दरात उत्तम ग्राहक सेवा दिल्यामुळे माझ्या उद्योगाची यशोशिखराकडे वाटचाल सुरू आहे.

मला एकटीला पर्यटन करायला आवडते. माझं आवडतं ठिकाण ऋषिकेश. तिथे मी सतत जात असते. तिथे ध्यानधारणा केल्याने मला मनःशांती लाभते. या माझ्या यात्रेच्या काळात माझे घरचे मला सांभाळून घेतात, हे माझ्यासाठी कौतुकास्पद आहे. प्रत्येकाने एकमेकांना निःस्वार्थीपणे मदत केली, तर कोणाला कशाची कमी राहणार नाही. एकांतात प्रवास करत असताना मी ‘आजकल पांव जमीन पर नहीं पड़ते मेरे। बोलो देखा है कभी तुमने मुझे उड़ते हुए।’ या गाण्याचा आनंद लुटते. मला गाणी ऐकायला आवडतात. गृहलक्ष्मी मासिकाच्या माध्यमातून मला ‘सबटायटल - ब्युटिफुल स्कीन’ आणि ‘मिसेस इंडिया २०२३’ असे दोन पुरस्कार मिळाले. तसेच नुकताच मला उद्योगक्षेत्रातील ‘आदर्श महिला सन्मान पुरस्कार २०२३’ मिळाला. मला अभिनयाचे काम करण्याच्या ऑफर आल्या, तेव्हा मी ‘आज मैं ऊपर, आसमां नीचे। आज मैं आगे, जमाना है पीछे।’ हे गाणं गाऊ लागले. अलीकडेच मी माझ्यातील कलागुणांना वाव मिळावा म्हणून ॲक्टिंगचा क्लास सुरू केला आहे. सध्या मी श्री. संदीप पंडित सरांकडून अभिनयाचे धडे घेत आहे.

माझा २९ वर्षांचा थोरला मुलगा विक्रांत, हा बीई होऊन आयटी क्षेत्रात कार्यरत आहे. तसेच माझी धाकटी मुलगी करिश्मा ही २५ वर्षांची आहे. तिने एमएस केलं आहे. ती स्वीडनच्या सँडविक या आंतरराष्ट्रीय कंपनीत नोकरी करते. आमच्या कुटुंबात आर्थिक स्वातंत्र्य आहे; कारण आम्ही चौघेही उत्पन्न कमवतो. आमच्या कुटुंबात मी एकटीच नोकरी न करता खंबीरपणे स्वतंत्र उद्योग करते, याचा मला स्वाभिमान आहे. माझ्या कार्याला माझ्या कुटुंबाचा खंबीर पाठिंबा आहे, सहकार्य आहे म्हणून मी माझ्या कुटुंबीयांची आभारी आहे. ‘सौंदर्य’ या विषयावर पुस्तक लिहिण्याचं आणि स्वतःचं यू-ट्यूब चॅनल सुरू करण्याचं माझं स्वप्न आहे.

माणसं जमवायची नसतात, तर माणसं कमवायची असतात, या तत्त्वाचा मी सदैव अवलंब करते. या जगात अशक्य असं काहीच नाही. आपल्यात अशक्य ते शक्य करण्याची शक्ती असली पाहिजे. अपयश जरी आलं, तरी ते हसत-खेळत पेलण्याची हिंमत असली पाहिजे. मी माझ्या उद्योगावर अतोनात प्रेम करते. प्रेम हा करार नाही, तर ते एक अस्तित्व आहे, आपणच आपल्याला दिलेले एक वचन आहे. उद्योजक मासिकाच्या महिला विशेषांकात माझी मुलाखत प्रकाशित होणार आहे, हे जेव्हा मला कळलं तेव्हा माझा आनंद गगनात मावेनासा झाला आणि मी गाणं गाऊ लागले, ‘पंछी बनू उड़ती फिरू मस्त गगन में। आज मैं आझाद हूँ दुनिया के चमन में।’ कारण मी विजेती होणारच!!

*(या लेखाच्या लेखिका पूर्वी राष्ट्रीयीकृत बँकेत नोकरी करायच्या. आता त्या एक प्रशिक्षक आणि सामाजिक उद्योजिका आहेत. त्यांचे ‘मीच!’ नावाचे पुस्तक प्रकाशित झाले आहे. ८ मार्च, २०२२ या जागतिक महिला दिनी, लहान ते महान प्रवास केलेल्या एका सामर्थ्यशाली, आयकॉनिक भारतीय महिलेला भेटण्याचे माझे स्वप्न मी पूर्ण केले. email - nishamissionvijeta@yahoo.com)* ■■



## पंतप्रधानांच्या आवाहनाला मिहिका परांजपे यांचा प्रतिसाद

# अमेरिकी नागरीकांना मराठमोळा पाहुणचार

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकी दौऱ्यात तेथे स्थायिक झालेल्या भारतीयांनी किमान १० अमेरिकी लोकांना भारत भेटीवर आणण्याचे आवाहन केले होते. एका भारतीय टूर कंपनीसाठी अमेरिकेत कार्यरत मिहिका परांजपे यांनी मोदींच्या आवाहनाला प्रतिसाद देत जानेवारी महिन्यात १० अमेरिकी नागरिकांना महाराष्ट्राच्या 'स्पेशल रिट्रीट'वर आणले. त्यांचा मराठमोळा पाहुणचार केला. टूर दरम्यान विदेशी पाहुणे महाराष्ट्राची संस्कृती, इतिहास, अध्यात्म, धार्मिक आस्था, शास्त्रीय संगीत, खाद्यपदार्थ, पोशाख यांच्याशी एकरूप झाले. इथला पाहुणचार पाहून भारावले. पुढील वर्षी पुन्हा अशाच सहली आयोजित करण्याचा परांजपे यांचा मानस आहे. त्यांच्या या उपक्रमामुळे जगभरातील पर्यटकांची पावले भारत भ्रमंतीसाठी वळतील याचा विश्वास वाटतो. - प्रसाद घारे**

माहिती-तंत्रज्ञान, दूरसंचार, संगणक, बौद्धिक संपदा, कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग, इंडस्ट्री ४.० या सध्याच्या काळातील अत्याधुनिक क्षेत्रात भारतीय तरुणाईने भारताचा तिरंगा जागतिक पातळीवर फडकवला आहे. याची अनेक उदाहरणे सांगता येतील. गेल्या काही वर्षांत भारताने ज्या वेगाने प्रगतीच्या महामार्गावर घोडदौड चालू केली आहे ते पाहता आगामी पंधरा-वीस वर्षे ही भारताचीच राहणार आहेत हे जगभरातील अर्थतज्ज्ञ, अभ्यासक, विचारवंत सांगू लागले आहेत. भारताचे जागतिक महासत्ता होण्याचे स्वप्न अजून बरेच दूर असले तरी आज जगातील पाचव्या क्रमांकाच्या अर्थव्यवस्थेवरून तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होण्याच्या दिशेने दमदार वाटचाल चालू आहे. विश्वगुरू ही अस्सल भारतीय संकल्पना प्रत्यक्षात आणण्याच्या दिशेने भारताचे एक एक पाऊल पडत आहे असा विश्वास एकशे चाळीस कोटी भारतीयांमध्ये निर्माण होत आहे.

भारत आज आधुनिकातील आधुनिकतेचा अंगीकार करीत असतानाच आपण पाच हजार वर्षांची थोर परंपरा सांगणारा सनातनातील सनातनी देश सुद्धा आहोत हे अजिबात लपवून ठेवत नाही. भारतीयांना अनेक वर्षांपासून अमेरिका आणि युरोपीयन संस्कृतीचे आकर्षण आहे ते आजही कायम आहे मात्र आता अमेरिकन आणि युरोपीयन लोकांना भारतीय संगीत, कला, संस्कृती, परंपरा, जीवनपद्धती, कुटुंबव्यवस्था, खाद्यसंस्कृती, संस्कृत भाषा व भारतातील अन्य प्रादेशिक भाषा,आयुर्वेद, योग यांचे मोठ्या प्रमाणावर आकर्षण वाटू लागले आहे. म्हणूनच अनेक अमेरिकन, युरोपीयन आणि जगभरातील अन्य देशातील नागरिकांची पाऊले भारताकडे वळताना दिसतात. हा बदल आश्वासक आणि सुखावणारा आहे. म्हणूनच 'मेरा देश बदल रहा है, आगे बढ रहा है' असे प्रत्येक भारतीय म्हणत आहे. भारतीयांच्या या सुरात परदेशस्थ/अनिवासी भारतीयांनी देखील सूर मिसळायला सुरवात केली आहे. (जगातील बहुतेक देशात भारतीय लोक नोकरी, शिक्षण, व्यवसायानिमित्त स्थायिक झाले आहेत. अशा परदेशस्थ/अनिवासी भारतीयांची संख्या सुमारे दोन कोटी इतकी आहे.) ही गोष्ट नक्कीच उत्साह वाढवणारी आहे. अमेरिकेत पंचवीस वर्षांहून अधिक काळ वास्तव्य असणारे मूळ पुणेकर दाम्पत्य श्री अरूण आणि मिहिका परांजपे यांनी जानेवारी २०२४ च्या दुसऱ्या आठवड्यात दहा अमेरिकन नागरिकांना ( सात महिला आणि तीन पुरुष) भारतीय संस्कृती, परंपरा, संगीत, योग, आयुर्वेद, गडकिल्ले दाखवण्यासाठी पुण्यात आणले होते. या आगळ्यावेगळ्या रिट्रीटचा अमेरिकन नागरिकांनी मनसोक्त आनंद घेतला. त्याचबरोबर नऊवारी, सहावारी साड्या, तबला, तानपुरा आणि संवादिनी अशा वाद्यांची, दागदागिने, पुस्तकांची भरपूर खरेदी या पाहुण्यांनी केली. लोणावळ्याजवळील भाजे लेण्यामध्ये त्यांनी गायत्री मंत्राचा जप केला. या विलक्षण अनुभवाने त्यांचे पाय पुण्यातून निघत नव्हते.

या आगळ्या रिट्रीटच्या आयोजिका मिहिका परांजपे म्हणाल्या, भारताचे लोकप्रिय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी हे दोन वर्षांपूर्वी अमेरिकेत आले होते.



त्यावेळी आयोजित एका कार्यक्रमात त्यांनी अमेरिकेत स्थायिक झालेल्या भारतीय नागरिकांना असे आवाहन केले की, प्रत्येक भारतीयाने पाच, दहा अमेरिकन नागरिकांना भारत दाखवण्यासाठी आणावे. माननीय पंतप्रधानांच्या या आवाहनानुसार आम्ही वर्षभरापूर्वी या स्पेशल रिट्रीटची आखणी केली आणि त्यानुसार जानेवारीच्या दुसऱ्या आठवड्यात दहा अमेरिकन नागरिकांना घेऊन पुण्यात आलो होतो. या रिट्रीटचा अमेरिकन नागरिकांनी मनसोक्त आनंद घेतला.

मिहिका व अरुण परांजपे यांच्या अमेरिकेतील 'ब्लिस टूर्स ' या संस्थेने ही रिट्रीट आयोजित केली होती. पुण्याजवळील वडगाव मावळ या निसर्गरम्य परिसरातील 'नेचर नेस्ट' या अतिशय सुंदर अशा रिसॉर्ट मध्ये 'योग तरंग म्युझिक ॲण्ड वेलनेस या नावाने ही रिट्रीट' पार पडली.

रिट्रीटच्या सुरुवातीला अमेरिकन महिला पर्यटकांनी हातांवर सुंदर मेंदी लावून घेतली. पारंपारिक गणेश वंदना गाऊन कार्यक्रमाचा श्रीगणेशा करण्यात आला. त्यानंतर या पाहुण्यांनी महाराष्ट्रातल्या कोळीनृत्याच्या तालावर नाचत भारतातील वेगवेगळ्या प्रांतीय नृत्याचा आनंद लुटला. भारतीय परंपरेनुसार कोणत्याही कार्यक्रमाची सुरुवात ही आद्य देवता गणपती स्तवनाने करायची प्रथा त्यांना फारच भावली. विशेष म्हणजे श्री गणेश, महालक्ष्मी, सरस्वती, भगवान विष्णू देवतांच्या मंदिरात जाऊन देवीची ओटी भरून त्यांनी मनोमन प्रार्थना केली.

या खास कार्यक्रमासाठी आलेल्या दहा अमेरिकन पर्यटकांना भारतीय शास्त्रीय संगीताबद्दल पंडित विकास कशाळकर, सौ सानिका कुलकर्णी आणि पंडित मिलिंद तुळणकर यांनी मार्गदर्शन केले. पंडित विकास कशाळकर व सौ. सानिका कुलकर्णी यांनी प्रत्यक्ष गायनातून त्यांना शास्त्रीय संगीताचे धडे दिले. जलतरंग या दुर्मीळ वाद्याचे गुरू पंडित मिलिंद तुळणकर आणि पंडित रामदास पळसुले यांच्या मैफिलीत सारे अमेरिकन रंगून गेले. योगाभ्यास, ध्यान /मेडिटेशन याबरोबरच डॉ. वेदिका साधले यांनी दिनचर्या आणि आयुर्वेदामध्ये असलेल्या वनस्पतींचे उपयोग याचे महत्त्व समजावून सांगितले.

जलतरंग या दुर्मीळ वाद्याचे प्रतिभावंत वादक पंडित मिलिंद तुळणकर यांच्या अतिशय मोहक जलतरंग वादनाने तसेच यासंबंधीच्या अतिशय रोचक माहितीने हे अमेरिकन पाहुणे मोहित झाले होते. तुळणकर यांनी यावेळेस मोरचंग व सारंगी या वाद्याबद्दल विशेष माहिती दिली. श्री. गणेश तानवडे यांनी तबला वादनाची पद्धत, यश सोमण यांनी पखवाज आणि ढोलक तर धवल जोशी यांनी बासरी वादन केले. यामुळे परदेशी पाहुण्यांना भारतीय वादकांच्या कलागुणांची ओळख झाली.

लोणावळ्याजवळील लोहगड, विसापूर या किल्ल्यावर जाऊन ट्रेकिंगचा एक निराळाच आनंद परदेशी पाहुण्यांनी अनुभवला. या गडांवर गेल्यावर महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास त्यांना समजावून सांगण्यात आला. हा तीनशे-साडेतीनशे वर्षांपूर्वीचा इतिहास त्यांच्यासमोर जिवंत करून सांगितल्याने त्यांनाही स्फुरण चढले. भाजे येथील लेण्यांमध्ये गायत्री मंत्राचा जप करताना ते मंत्रमुग्ध झाले.

नारायणीधाम येथील गायींना चारा देताना हिंदू धर्मात गायीला गोमाता का म्हणतात, तिची मनोभावे पूजा का केली जाते, हिंदू व्यक्ती गायीचे मांस का खात नाहीत यासंबंधी परदेशी पाहुण्यांना सविस्तर माहिती जाणकारांनी दिली. यामुळे अमेरिकेत गेल्यावर आपण देखील गोमांस खाणार नाही असा निश्चय काही जणांनी बोलून दाखविला. महाराष्ट्रातील गावरान मेवा म्हणजे चिकू, पेरू, सीताफळ यासारखी ताजी मधुर फळे बागेत जाऊन तोडून खाण्याचा आनंद काही औरच असतो हा आनंद देखील त्यांनी घेतला. शेतातल्या उसाचा ताजा रस पिऊन अमेरिकन तृप्त झाले.

पुण्यातील रिट्रीटनंतर परदेशी पाहुण्यांनी जगातील सात आश्चर्यांपैकी एक असणाऱ्या ताजमहालाला भेट दिली. ऋषिकेश येथे गंगा नदीच्या आरतीचा मनोभावे आनंद लुटला. यावेळेस त्यांनी भारतीय पोशाख



परिधान केला होता.

अमेरिकन, युरोपीयन किंवा अन्य देशातील लोकांच्या मनात भारताविषयीचा अतिशय चुकीचा इतिहास आणि अनेक गैरसमज पेरण्यात आले आहेत. त्यामुळेच त्यांचा भारताकडे बघण्याचा दृष्टिकोन नकारात्मक झालेला आहे. हा दृष्टिकोन बदलण्यासाठी परदेशी पर्यटकांसाठी अशा प्रकारच्या भारत भेटींचे आयोजन करण्याची आवश्यकता आहे. यामुळेच त्यांना भारतातील निसर्गसौंदर्य, मान-सन्मान, आदरातिथ्य, संस्कृती, कला, संगीत यांची जवळून ओळख होण्यास मदत होईल. अशा प्रत्यक्ष भेटीतून भारत नेमका कसा आहे हे कळण्यास मदत होणार आहे. अमेरिका ही महासत्ता असली तरी तेथे 'यूपीआय पेमेंट्स सिस्टीम' अस्तित्वात नाही. यूपीआयद्वारे दररोज कोट्यवधी भारतीय मोबाईलवरून काही सेकंदात एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पैसे पाठवतात, बिल पेमेंट्स करतात. लहान, मोठ्या खरेदीसाठी रोख रक्कम वापरत नाहीत याचे अमेरिकन पाहुण्यांना खूपच आश्चर्य वाटले. यामुळेच 'स्लमडॉग' या चित्रपटातून भारताबद्दलची जी प्रतिमा अमेरिकन लोकांसमोर समोर होती, ती पूर्णतः पुसली जाण्यास मदतच झाली. आता हेच अमेरिकन पाहुणे त्यांच्या अमेरिकन बांधवांना भारत बदलत आहे हे आत्मविश्वासाने सांगतील. यासाठीच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेतील भारतीयांसाठी केलेले आवाहन किती महत्त्वाचे होते याचा प्रत्यय या रिट्रीटमुळे नक्कीच आला असेल. यासाठी श्री. आणि सौ. परांजपे या दाम्पत्याचे कौतुक करायला हवे. या रिट्रीटनंतर महाराष्ट्रातील तसेच विशेषतः पुण्यातील गणेशोत्सव, सवाई गंधर्व महोत्सव, महाराष्ट्रातील, देशातील मंदिरे, तीर्थक्षेत्र आणि हिमालयातील गिर्यारोहण याचा विचार करून पुढील कार्यक्रम आयोजित करण्याचा आमचा विचार आहे.

२०२४-२०२५ या वर्षात अमेरिकेतील पर्यटकांसाठी अशा विशेष सहली आयोजित करण्याचा आमचा प्रयत्न आहे, असे मिहिका परांजपे आवर्जून सांगत होत्या.

मिहिका परांजपे आणि अरुण परांजपे नोकरी, व्यवसायानिमित्त साधारणपणे पंचवीस-तीस वर्षांपूर्वी अमेरिकेत स्थायिक झाले. श्री. अरूण परांजपे हे अमेरिकेतील आघाडीच्या आयटी कंपनीत वरिष्ठ पदावर काम करतात तर मिहिका परांजपे गेली अनेक वर्ष केसरी टूर्स आणि वीणा वर्ल्ड यांच्या माध्यमातून अमेरिकेत येणाऱ्या भारतीय पर्यटकांना (प्रामुख्याने मराठी पर्यटक) प्रेमाने अमेरिका दाखवतात. अमेरिकेतील राहण्याची, जेवणाची, फिरण्याची, प्रेक्षणीय स्थळ दाखवण्याची आणि अन्य व्यवस्था अतिशय चोख करतात. यामुळेच केसरी टूर्स आणि वीणा वर्ल्डच्या अमेरिकेतील टूर्सना मराठी पर्यटक पसंती देताना दिसतात. याचबरोबर मिहिका परांजपे व्हायब्रेशन आणि साउंड थेरपीच्या माध्यमातून कॅन्सर व अन्य आजारांशी झगडणाऱ्या रुग्णांवर उपचार करतात. भारतातदेखील या थेरपीद्वारे उपचार करण्याचा त्यांचा विचार आहे असे त्यांनी आवर्जून सांगितले.

ज्या देशाचा मुकुट हिमालय आहे, जिथे गंगा, यमुना, नर्मदा या नद्या वाहतात, जिथे विविधतेत एकता नांदते, 'सत्यमेव जयते' हा ज्यांचा नारा आहे असा आमचा भारतदेश तो महान होता, महान आहे आणि महान राहील.

देशातील १४० कोटी भारतीयांचा रंग, रूप, वेश, भाषा जरी अनेक असल्या तरी आपण सारे भारतीय एक आहोत. हे आपण भारतीयांनी जगाला अनेक दाखवून दिले आहे. अशा या महान परंपरा लाभलेल्या देशाची ओळख जगभरातील पर्यटकांना करून द्यायला हवी असे जगभरात स्थायिक झालेल्या भारतीयांनी ठरवले तर भारत नेमका कसा आहे हे परदेशी पर्यटकांना कळेल. श्री. व सौ. परांजपे यांनी कृतीतून हे दाखवून दिले आहे. त्यांनी टाकलेल्या या पावलामुळे जगभरातील पर्यटकांची पावले भारत भ्रमंतीसाठी वळतील असा विश्वास व्यक्त करतो आणि थांबतो.

*(या लेखाचे लेखक मुक्त पत्रकार असून त्यांचे लेख नियतकालिकांतून प्रकाशित होत असतात. त्यांचा भ्रमणध्वनी ९३७३००५४४८ असून ई-मेल* **prasad.ghare@gmail.com** *आहे.)*



यशोगाथा :
रोशनी नाडर, चेअरपर्सन,
एचसीएल टेक्नॉलॉजीस्

# वय वर्षे ४२, संपत्ती ८४,३३० कोटी

**एचसीएल टेक्नॉलॉजीज्च्या चेअरपर्सन रोशनी नाडर-मल्होत्रा यांना परिचयाची गरज नाही. व्यवसायाच्या क्षेत्रात त्यांनी यशाचा झेंडा रोवला आहे. त्या भारतातील सर्वांत श्रीमंत महिला आहेत. एखाद्या लिस्टेड आयटी कंपनीचे व्यवस्थापन करणाऱ्या पहिल्या महिला म्हणूनही त्यांचा नावलौकिक आहे. टीव्ही क्षेत्रापासून करिअरची सुरुवात करणाऱ्या रोशनी ८४,३३० कोटींच्या संपत्तीच्या मालक आहेत. २०२३ मध्ये फोर्ब्सच्या जगातील सर्वांत शक्तिशाली महिलांच्या यादीत त्या ६० व्या स्थानावर आहेत. त्यांची यशोगाथा नवउद्योजकांसाठी प्रेरदणादायी आहे.**

**- प्रतिनिधी**

देशातील सर्वांत शक्तिशाली, श्रीमंत, निर्णयक्षमता, नेतृत्वगुण असणाऱ्या महिलांचा उल्लेख होतो त्यावेळी आपसूकच एचसीएल टेक्नॉलॉजीज्च्या चेअरपर्सन रोशनी नाडर यांचे नाव अग्रक्रमावर येते. खरं तर रोशनी यांना कोणत्याही ओळखीची गरज नाही. मात्र, त्यांची आणखी एक ओळख म्हणजे त्या संगणक क्षेत्रातील आघाडीच्या एचसीएल टेक्नॉलॉजीज्चे संस्थापक शिव नाडर आणि किरण नाडर यांचे एकुलते एक अपत्य आहेत. एचसीएल ही भारतातील तिसऱ्या क्रमांकाची सॉफ्टवेअर निर्यातक कंपनी आहे. शिव नाडर यांनी १९७६ मध्ये कंपनीची स्थापना केली होती.

### टीव्ही विश्वात करिअरची सुरुवात

रोशनी नाडरचा जन्म १९८२ मध्ये दिल्लीत झाला. त्यांचे शालेय शिक्षण नवी दिल्लीच्या वसंत व्हॅली स्कूलमधून झाले. त्यांना तंत्रज्ञानात विशेष रस नव्हतात्यामुळे २००३ मध्ये नॉर्थवेस्टर्न युनिव्हर्सिटीमधून कम्युनिकेशन्समध्ये बॅचलर डिग्री मिळवली. यूकेमधील स्काय न्यूज़मध्ये टीव्ही न्यूज प्रोड्युसर म्हणून काम केले. ३ वर्षांनी केलॉग स्कूल ऑफ मॅनेजमेंटमधून सोशल एंटरप्राइझ मॅनेजमेंट आणि स्ट्रॅटेजीवर लक्ष केंद्रित करून बिझिनेस ॲडमिनिस्ट्रेशनमध्ये मास्टर्स मिळवले. हे करतानाच अनेक कंपन्यांमध्ये न्यूज प्रोड्युसर म्हणून काम सुरू ठेवले.

### एचसीएलमध्ये प्रवेश

२००९ मध्ये भारतात परतल्यानंतर त्यांना एचसीएल कॉर्पोरेशनचे सीईओ पद देण्यात आले. एका वर्षाच्या आत त्यांना एचसीएलच्या कार्यकारी संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून पदोन्नती मिळाली. २०१३ मध्ये त्या एचसीएल टेक्नॉलॉजीज्च्या संचालक मंडळात सहभागी झाल्या तर ५ वर्षात कंपनीच्या उपाध्यक्ष झाल्या. जुलै २०२० मध्ये त्यांनी एचसीएलच्या अध्यक्षपदाची धुरा सांभाळली. एचसीएल कॉर्पोरेशनच्या सीईओ होण्यापूर्वी त्या शिव नाडर फाउंडेशनच्या विश्वस्त म्हणून काम करत होत्या. गरीब व गरजूंसाठी चालविल्या जाणाऱ्या एका अन्य ट्रस्टच्या अध्यक्ष म्हणूनही त्या काम बघतात.

### वन्यजीव, खेळाची आवड

रोशनी नाडरचा २०१० मध्ये शिखर मल्होत्रासोबत विवाह झाला. शिखर हे एचसीएल हेल्थकेअरचे उपाध्यक्ष म्हणून काम करतात. शिखर आणि रोशनी यांना अरमान आणि जहाँ ही दोन मुले आहेत. शिखर हे शिव नाडर फाउंडेशनचे विश्वस्तही आणि शिव नाडर स्कूलचे संस्थापक सीईओ देखील आहेत. शिखर यांनी रोशनी नाडरसोबत २०१८ मध्ये द हॅबिट्स ट्रस्टची स्थापना केली. वन्यजीव आणि संवर्धनाव्यतिरिक्त, त्यांना खेळाची, विशेषतः फुटबॉलची आवड आहे.

### सर्वांत शक्तिशाली महिलांपैकी एक

रोशनी २०२३ च्या फोर्ब्सच्या जगातील सर्वांत शक्तिशाली महिलांच्या यादीत ६० व्या स्थानावर होत्या. २०१९ मध्ये ५४ व्या तर २०२० मध्ये ५५ व्या स्थानावर होत्या. त्यांची एकूण संपत्ती ८४,३३० कोटी रुपये असून सर्वांत श्रीमंत भारतीय महिला आहेत. त्यांना २०१७ मध्ये बॅबसन कॉलेजने लुईस इन्स्टिट्यूट कम्युनिटी चेंजमेकर पुरस्काराने सन्मानित केले. होरिस या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या थिंक टँकने २०१९ चा इंडियन बिझनेस लीडर म्हणून त्यांचा गौरव केला. ■■



यशोगाथा : फाल्गुनी नायर,
संस्थापक व सीईओ, न्याका, ई-कॉमर्स कंपनी

# २० वर्षे बँकेची नोकरी, ५० व्या वर्षी न्याकाची स्थापना, २१,६०० कोटींची संपत्ती

**देशात व्यावसायिक क्षेत्रात महिलांचे वर्चस्व वाढत आहे. भारतीय व्यावसायिक महिलांचे नाव जगभरात मोठ्या आदराने घेतले जात आहे. यात सर्वांत पुढे असणारे एक नाव म्हणजे फाल्गुनी नायर. फाल्गुनी न्याका या ई-कॉमर्स कंपनीच्या संस्थापक, अध्यक्ष, व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत. जवळपास २ दशके गुंतवणूक, बँकिंग आणि ब्रोकिंगमध्ये काम केल्यानंतर वयाच्या ५० व्या वर्षी त्यांनी न्याकाची सुरुवात केली. कंपनी आघाडीच्या ब्रँड्सचे सौंदर्य प्रसाधने विकते. पहिल्या दिवसापासून कंपनी फायद्यात आहे. या जोरावर नायर भारतातील सर्वांत श्रीमंत महिला सीईओ ठरल्या असून त्यांची एकूण संपत्ती २१,६०० कोटी रुपये आहे, तर न्याकामध्ये १६०० हून अधिक लोकांना रोजगार मिळाला आहे.**

**- प्रतिनिधी**

फाल्गुनी नायर यांचा १९ फेब्रुवारी १९६३ ला मुंबईत एका समृद्ध गुजराती कुटुंबात जन्म झाला. व्यवसाय हा गुजराती लोकांमध्ये रुजलेला आहे. फाल्गुनी यांनीही कुटुंबीयांकडून व्यवसायाचा वारसा स्वीकारला. सुरुवातीच्या काळात त्यांनी वडिलांच्या बेअरिंग्स कंपनीचे व्यवस्थापन पाहिले. यात त्यांच्या कामाची छाप सोडली. हे सुरू असतानाच सिडनहॅम कॉलेज ऑफ कॉमर्स अँड इकॉनॉमिक्समधून वाणिज्य शाखेत पदवी घेतली.

### २० वर्षे बँकिंगमध्ये

फाल्गुनी नायर यांच्या करिअरची सुरुवात एएफ फर्ग्युसन कंपनीत व्यवस्थापन सल्लागार म्हणून झाली. १९९३ मध्ये त्या कोटक महिंद्रा ग्रुपमध्ये सामील झाल्या आणि पुढील २० वर्षे येथे काम केले. २००५ मध्ये त्या कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालक झाल्या आणि २०१२ पर्यंत या पदावर होत्या. नोकरीत असताना त्यांनी प्रतिष्ठित इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अहमदाबाद येथे पदव्युत्तर पदवी मिळविली. येथेच आताचे कोहलबर्ग क्रॅव्हिस रॉबर्ट्स इंडियाचे सीईओ संजय नायर यांची भेट झाली. भेटीचे रूपांतर मैत्री, प्रेम आणि मग विवाहात झाले. १९८७ मध्ये त्यांचा विवाह झाला. एमबीए करतानाच त्यांना स्वतःचा व्यवसाय करण्याची इच्छा शांत बसू देत नव्हती. यामुळे वयाच्या ५० व्या वर्षी त्यांनी ही पैसा आणि प्रतिष्ठा असणारी नोकरी सोडली आणि २०१२ मध्ये एफएसएन ई-कॉमर्स व्हेंचर्सच्या बॅनरखाली न्याका या मल्टी-ब्रँड ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मची सुरुवात केली. त्यांना अद्वैत आणि अंचित ही दोन मुले आहेत. दोघेही आईच्या व्यवसायाच्या महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. अद्वैतकडे न्याका फॅशन तर अंकित रिटेल आणि ई-कॉमर्स विभागांचे नेतृत्व करतो.

### ऑनलाइन उत्पादनांची विक्री

फाल्गुनी यांनी भारतीय महिलांची सौंदर्य वाढवण्यासाठी असणारी धडपड हेरली. या क्षेत्रात व्यवसायाची मोठी संधी असल्याचे त्यांच्या लक्षात आले आणि २०१२ मध्ये ब्युटी-वेलनेस उत्पादने विकणाऱ्या न्याकाची सुरुवात केली. हा व्यवसाय पहिल्या दिवसापासून यशस्वी झाला आणि न्याका लवकरच फॅशन उत्पादनांसाठी एक व्यासपीठ म्हणून लोकप्रिय कंपनी बनली. २०१४ मध्ये सिक्योईया कॅपिटल इंडियाने न्याकामध्ये १ दशलक्ष अमेरिकी डॉलर्सची गुंतवणूक केली. यानंतर अनेक गुंतवणूकदारांनी कंपनीत पैसे गुंतवले. हळूहळू कंपनीचा विस्तार होऊ लागला. कंपनीत १६०० हून अधिक लोकांना कामाची

संधी मिळाली आहे. येथे लॅक्मे, काया स्कीन क्लिनिक, लॉरेल यासारख्या आघाडीच्या ब्रँड्सचे सौंदर्य उत्पादने मिळतात. याशिवाय कंपनीचे देशभरात १७ ऑफलाइन स्टोअर्स असून त्यांचा विस्तार होत आहे. कंपनीकडे ८५० पेक्षा जास्त क्युरेटेड ब्रँड आणि ३५,००० उत्पादने आहेत.

### अडथळ्यांचा होता मार्ग

फाल्गुनीने अशा क्षेत्रात प्रवेश केला जेथे भारतातील आणि परदेशातील मोठ्या ब्रँड्सचा आधीच दबदबा होता. पण, फाल्गुनीने काहीतरी नवीन करून या स्पर्धात्मक व्यवसायात स्वतःला स्थापित करण्यासाठी धडपड सुरू केली. त्यांच्या मेहनतीला फळ मिळाले आणि ८ वर्षांनी म्हणजेच मार्च २०२० मध्ये न्याकाने युनिकॉर्न पदवी मिळवली. सौंदर्यप्रसाधने व्यवसायाच्या क्षेत्रातील ही देशातील सर्वांत मोठी कंपन्यांपैकी एक झाली आहे. न्याका टाटा क्लिकशी थेट स्पर्धा करत आहे. एवढेच नाही तर आशियातील सर्वांत श्रीमंत व्यक्ती मुकेश अंबानी यांच्या नेतृत्वाखालील रिलायन्सच्या नवीन ब्युटी ब्रँड टिरालाही न्याका थेट स्पर्धा देत आहे.

### आयपीओने झाली कंपनीची भरभराट

कंपनीचे बाजार भांडवल ५६ हजार कोटींच्या पुढे गेले आहे. २०२१ मध्ये कंपनी शेअर बाजारात लिस्ट झाली. कंपनीच्या आयपीओला गुंतवणूकदारांचा चांगला प्रतिसाद मिळाला. याच्या आयपीओतून गुंतवणूकदारांना चांगला फायदा मिळाला आणि गेल्या वर्षीच्या तिसऱ्या तिमाहीत कंपनीचा महसूल १५०७ कोटी रुपयांवर पोहोचला. त्यापूर्वीच्या याच तिमाहीत कंपनीचा महसूल १२३०.८२ कोटी रुपये होता. आर्थिक वर्ष २०२३-२४ च्या दुसऱ्या तिमाहीत कंपनीने ७.८ कोटी रुपयांचा नफा कमावला आहे.

### सर्वांत श्रीमंत महिला सीईओ

फाल्गुनी नायर या सर्वांत श्रीमंत भारतीय महिला सीईओ ठरल्या आहेत. त्यांची एकूण संपत्ती २१,६०० कोटी रुपये आहे. हुरून इंडियाने भारतातील सर्वोच्च सेल्फमेड महिला उद्योजक म्हणून त्यांचा गौरव केला. ब्लूमबर्ग बिलियनेयर्स इंडेक्समध्ये स्थान मिळविणाऱ्या त्या सातव्या भारतीय महिला ठरल्या आहेत. २०१२ मध्ये उद्योग सुरू केल्यानंतर २०२३ मध्ये अवघ्या ११ वर्षात फाल्गुनी २.६५ अब्ज डॉलर्सच्या संपत्तीसह फोर्ब्सच्या श्रीमंत यादीत ८८ व्या स्थानावर आल्या. फोर्ब्सच्या रिअलटाइम श्रीमंतांच्या यादीत केवळ १३ अब्जाधीश भारतीय महिला आहेत. यामध्ये फाल्गुनी नायर यांचा समावेश आहे. त्या भारतातील सर्वांत श्रीमंत महिला सीईओ आहेत.

■ ■



*संत रोहिदास चर्मद्योग व चर्मकार विकास महामंडळ नागपूर, व महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र व सामाजिक न्याय विभाग यांच्या माध्यमातून शासन आपल्या दारी अंतर्गत लीडकॉम आपल्या दारी आयोजित कार्यक्रमाला मा.धम्मज्योती गजभिये, IPoS, व्यवस्थापकीय संचालक, लिडकॉम, मुंबई; मा.डॉ.सिद्धार्थ गायकवाड, प्रादेशिक उपायुक्त स.क.वि.नागपूर; मा.सुकेशनी तेलगोटे, सहाय्य आयुक्त, स.क.नागपूर; मा.श्री. प्रदीप इंगळे, विभागीय अधिकारी MCED, नागपूर; मा.श्री.सुनील ढगे, विभागीय अधिकारी, लिडकॉम, नागपूर; मा.श्री.हेमंत वाघमारे, केंद्र प्रमुख तथा राज्य समन्वयक, MCED उपकेंद्र हिंगणा रोड, नागपूर; मा.श्रीमती काकडे, जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले महामंडळ, मा.बिघाणे, चर्मकार सेवा संघ, नागपूर; श्रीमती मीना भागवतकर, श्री. कानोडे, उद्योजिका; श्री. उत्कर्ष कानोडे, उद्योजक व आदी मान्यवरांच्या उपस्थितीत तसेच समाज कल्याण विभाग नागपूर, बार्टी केंद्र नागपूर, एमसाईडी नागपूरचे सर्व अधिकारी, कर्मचारी आणि चर्मकार समाजबांधव या सर्वांच्या उपस्थित एक दिवसीय कार्यशाळा संपन्न झाली, तर यावेळी श्री. श्रीकांत कुलकर्णी, प्रकल्प अधिकारी यांनी आभार व्यक्त केले.*



अलका कुबल, यशस्वी अभिनेत्री, निर्माता, दिग्दर्शक अन् व्यावसायिकाही

# रिअल लाईफमधील नायिका

**३२५ हून अधिक चित्रपटांची नायिका, डझनभर चित्रपटांची निर्मिती आणि टीव्ही मालिका, जाहिरातीत मॉडेलिंग... सदाबहार अभिनेत्री अलका कुबल-आठल्ये यांची एवढीच ओळख पुरेसी नाही, तर अभिनयासोबत त्या व्यवसायातही स्वतःचे वेगळे स्थान निर्माण करून आहेत. स्वतःचा प्लॉट विकताना आलेल्या अनुभवातून त्यांनी मालमत्ता खरेदी-विक्रीचा व्यवसाय सुरू केला, तर थिएटर, मॉल आणि हॉलची उभारणीही केली. भविष्यात स्वतःचा स्टुडिओ उभारायचा आहे. ही ओळख, हे यश सहजासहजी मिळालेले नाही. कठोर तपस्या आणि अनेक संकटांतून मार्ग काढत त्या इथपर्यंत पोहोचलेल्या आहेत. त्या रील लाईफप्रमाणेच रिअल लाईफमध्येही नायिका आहेत. मराठी चित्रपटसृष्टीचा इतिहास त्यांच्या उल्लेखाशिवाय अपूर्ण राहणार आहे. - डॉ. उमेश कणकवलीकर**

२००५ साली तळेगावच्या पेट्रोलपंपवर माझी आणि सौ. अलका कुबल यांची ओळख झाली. 'मी विजेता होणारच!' या लोकप्रिय कार्यक्रमामुळे त्या मला ओळखत होत्या. योगायोगाने माझ्या आणि त्यांच्या कारचा नंबर ७०० होता. पुढे आमच्या ओळखीचे रूपांतर मैत्रीत झाले. 'उद्योजक' महिला विशेषांकासाठी विचार करत असतानाच मला अलकाजींचा व्हॉटसॲपवर मेसेज आला की, 'आयुष्याच्या प्रत्येक वळणावर सगळं आपलंच होत गेलं असतं, तर जगण्याची गंमत आणि देवाची किंमत कधीच समजली नसती. देव काहीतरी देईल म्हणून मंदिरात जाऊ नये, तर देवाने आपल्याला बरंच काही दिलं आहे, म्हणून मंदिरात जावं.' त्याच क्षणी मी निर्णय घेतला, की मी अलका कुबल यांची मुलाखत घेणारच! लागलीच त्यांना फोन केला. त्यांनीही माझ्या प्रस्तावाचे सहर्ष स्वागत केले. त्यांच्या लातूरच्या प्रवासादरम्यान मी त्यांची मुलाखत घेऊन कार्य सिद्धीस नेले. चला तर, मी शब्दांकन केलेल्या त्यांच्या मुलाखतीचा आनंद लुटूया.

मी अलका कुबल-आठल्ये बोलतेय! माझा जन्म २३ सप्टेंबर, १९६५ रोजी गणेश गल्ली, लालबाग, मुंबई येथे झाला. माझी आई सौ. सुमती ही शिक्षिका होती. मी लहान असतानाच माझे वडील श्री.लाडू कृष्णा कुबल स्वर्गवासी झाले. माझ्या आईने शिस्तबद्ध पद्धतीने आमच्यावर केलेले संस्कार हे लाखमोलाचे ठरले. माझी आई शाळेतील नोकरी संभाळून उदरनिर्वाहासाठी पार्ट-टाइम साडी विकण्याचे कामही करायची. चार भावंडांमधील मी सर्वांत लहान. माझे दोन भाऊ आणि बहीण सकाळी शाळेत जायचे, त्यामुळे माझी आई मला घरात कुलूप लावून शाळेत शिकवायला जायची. या एकांतात मी अभिनय आणि नृत्य करायची. तिथेच माझ्यातील कलाकाराचा जन्म झाला. मी 'नटसम्राट' या नाटकापासून बालकलाकार म्हणून सुरुवात केली. नटसम्राटचे २५०, तर 'संध्या- छाया' या नाटकाचे १०० प्रयोग केले. यशवंत दत्त, शांता जोग या दिग्गज कलाकारांबरोबर काम करण्याची मला सुवर्णसंधी लाभली.

मी दहावीत असताना मला 'चक्र' चित्रपटात काम करण्याची संधी मिळाली. माझ्या आवडत्या अभिनेत्री स्व. स्मिता पाटील या चित्रपटातील नायिका होत्या. माझी दहावीची परीक्षा होती, त्यामुळे आईने या चित्रपटात काम करण्यास मनाई केली. पण मी हट्टच धरला, की मला स्मिता पाटील यांच्यासोबत काम करायचे आहे. त्या चित्रपटामुळे मला स्मिता पाटील यांचे बारकाईने निरिक्षण करण्याची संधी लाभली. त्याचा मला पुढील कारकीर्दीत कायमस्वरूपी फायदा झाला. स्मिता पाटील एक महान कलाकार असूनही त्यांच्याकडे अहंकाराचा लवलेशही नव्हता. त्यांनी मला माणूसकीचा धडा शिकवला.

अकरावी-बारावीमध्ये मी नाट्यस्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी बजावली. मी सोळा वर्षांची असताना 'रामू चनणा' या राजस्थानी चित्रपटात हिरोइन म्हणून पहिल्यांदा काम केले. त्यानंतर मी 'पोरींची धमाल, बापाची कमाल' या मराठी चित्रपटात निळू फुले, सीमा देव यांच्यासोबत काम

केले. 'लेक चालली सासरला' या चित्रपटापासून माझी मराठी चित्रपट सृष्टीतील यशस्वी वाटचाल सुरू झाली. हा चित्रपट हुंड्यासाठी वधूला जाळण्याच्या समस्येवर असल्यामुळे या चित्रपटाने महाराष्ट्रात खळबळ उडवली. हा चित्रपट सिल्व्हर ज्युबिली हिट झाला. त्यानंतर 'स्त्रीधन' या चित्रपटातील माझ्या भूमिकेला उत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार मिळाला. 'तुझ्यावाचून करमेना' हा माझा अशोक सराफ यांच्यासोबतचा पहिला आणि माझ्या कारकीर्दीतील तिसरा चित्रपट. त्या वेळेस अशोक सराफ यांनी शंभरहून अधिक चित्रपटांमध्ये काम करून नावलौकिक कमवला होता. या चित्रपटात मला पुन्हा महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार मिळाला.

खरे तर मी अभिनय शिकण्यासाठी कोणताच कोर्स केला नव्हता किंवा कुठल्याही संस्थेकडून प्रशिक्षण घेतले नव्हते. ज्या दिग्दर्शकांसोबत आणि ज्येष्ठ कलाकारांसोबत मी काम केले, त्यांच्याकडूनच मी अभिनयाचे धडे घेतले. संवाद लक्षात कसे ठेवावेत, संवादफेकी कशी करावी, कोणत्या शब्दांवर जोर द्यावा, अभिनय कसा सादर करावा आणि सर्वांत महत्त्वाचे आपल्या भूमिकेशी समरस होऊन ती भूमिका गांभीर्याने कशी सादर करावी, हे मी काळाच्या ओघात शूटींग दरम्यान शिकत गेले. चित्रपट क्षेत्रात रंगीत तालीम, सराव इत्यादी बाबींना वाव नसतो. चित्रपट हा एकदाच शूट केला जातो. त्यामुळे आपण आपल्या अभिनयाशी एकरुप होणे खूप गरजेचे असते. इथे चूक करून चालत नाही. आपल्याला १००% जीव ओतून काम करावे लागते. चित्रपट हा इतिहास रचत असतो कारण आपल्या मृत्यूनंतरही प्रेक्षक तो चित्रपट पाहात असतात.




असा एक काळ होता, की अशोक सराफ आणि लक्ष्मीकांत बेर्डे यांची लाट आली होती. त्या काळात श्री. सतिश रणदिवे यांनी 'रिक्षावाली' या चित्रपटात अजिंक्य देव या नायकाबरोबर मला नायिकेची प्रमुख भूमिका दिली. हा चित्रपट गाजला. त्यानंतर लक्ष्मीकांत बेर्डे यांच्यासोबत 'शुभ बोल नाऱ्या' हा चित्रपट प्रेक्षकांच्या पसंतीस उतरला. 'माहेरची साडी' या चित्रपटात अजिंक्य देव माझा भाऊ होता. अशा निरनिराळ्या भूमिकांमुळे नामवंत कलाकारांबरोबर घरगुती स्नेहसंबंध विकसित झाले, जे आयुष्यभर शिदोरी म्हणून उपयोगी पडले. चित्रपटसृष्टीतील सतिश रणदिवे, श्रीनिवास भणगे, कुमार सोनी, गिरीश घाणेकर अशा नामवंतांची मी आभारी आहे कारण माझ्यातील कौशल्य हेरून, माझ्यावर विश्वास ठेवून त्यांनी मला प्रत्येक वेळेस वेगवेगळ्या भूमिका दिल्या. आजवर मी ३२५ पेक्षा जास्त चित्रपटांमध्ये भूमिका केल्या आहेत, ज्या प्रेक्षकांच्या पसंतीस उतरल्या आहेत. मी रसिक प्रेक्षकांची शतशः आभारी आहे.

मी वर्षाला बारा ते पंधरा चित्रपटात काम करत होते. माझ्या कारकीर्दीतील तिसावा चित्रपट होता, 'माहेरची साडी', ज्याने मला मराठी चित्रपट क्षेत्रात यशोशिखरावर विराजमान केले. या चित्रपटाने मला जनतेच्या मनामनात आणि घराघरात पोहोचवले. माहेरच्या साडीने माझी जी प्रतिमा घडवली ती आजवर मला उपयोगी ठरत आहे. या भूमिकेचा दैदिप्यमान असा ठसा उमटला गेला, जो अजरामर ठरला. 'माहेरची साडी' या चित्रपटाच्या पुण्याईमुळे आजही मी महिन्याला चार ते पाच इव्हेंट करत असते. या भूमिकेमुळे मला महिला प्रेक्षकांचे भरभरून प्रेम मिळाले. या अभूतपूर्व यशाचे श्रेय मी आदरणीय श्री. विजय कोंडके यांना देते. हा चित्रपट अंदाजे सव्वादोन वर्ष चित्रपटगृहांमध्ये टिकून राहिला. या चित्रपटाने त्या काळात १२ कोटींचा उद्योगधंदा करत गोल्डन ज्युबिली साजरी केली. महाराष्ट्रातील प्रत्येक शहरात, तसेच जत्रांमध्ये हा चित्रपट झळकला. या चित्रपटानंतर पुढील दोन दशकं मी मराठीतील 'लेडी सुपरस्टार' म्हणून गाजले.

१९९१ साली माझ्या जीवनात श्री. समीर आठल्ये यांचे आगमन झाले. चित्रपट-निर्माते अरुण गोडबोले यांच्या सोबत मी चार-पाच चित्रपटांमध्ये काम केले. तिथे माझी सिनेमॅटोग्राफर समीर आठल्ये यांची ओळख झाली. ती ओळख पुढे प्रेमविवाहामध्ये रुपांतरित झाली. त्यांनी आजवर अंदाजे अडीचशे चित्रपटांचे पडद्यामागचे काम केले आहे. २८ एप्रिल, १९९२ ला आमचे लग्न झाले. विवाहानंतर गरोदरपणात आठव्या महिन्यापर्यंत मी दिवस-रात्र काम केले आणि निर्मात्यांचे चित्रपट पूर्ण केले. आपल्यामुळे चित्रपटांचा खोळंबा नको, नुकसान नको याची मी जबाबदारी घेतली. मला पहिली मुलगी झाली. प्रसुतीनंतर अवघ्या दोन महिन्यांतच मी पुन्हा शूटींग सुरू केले. मी माझ्या तान्हुलीला घेऊन शुटींगला जायचे, कारण आई म्हणून मला तिच्यावर अन्याय करायचा नव्हता. तिचे नाव ईशानी. ती पायलट आहे. माझे जावईसुद्धा पायलट आहेत. माझी दुसरी मुलगी कस्तुरी ही डॉक्टर आहे. लवकरच ती नेत्रतज्ज्ञ होईल. माझ्या दोन्ही मुलींच्या शिक्षणावरील गुंतवणूक ही मोठी होती. त्यामुळे मी कधीच कंफर्ट झोनमध्ये राहिले नाही. मी सतत कामात व्यस्त राहते. त्यामुळे मी स्वस्थ आणि मस्त जगते.

२००४ साली मी चित्रपट निर्मिती क्षेत्रात पाऊल टाकले. 'शुभलक्ष्मी चित्र' आणि 'मनोरंजन चित्र' या दोन बॅनर अंतर्गत 'कस्तुरी प्रोडक्शन' कंपनीच्या नावाने मी चित्रपट निर्मिती क्षेत्रात कामकाज सुरू केले. 'सुहासिनीची सत्वपरीक्षा' हा माझा पहिला चित्रपट २००५ साली प्रदर्शित झाला. हा चित्रपट पाच आठवड्यांसाठी चित्रपटगृहांमध्ये झळकला. आम्ही एकूण पाच चित्रपटांची निर्मिती केली. यातील तीन चित्रपटांत मी नायिकेच्या भूमिकेत झळकले. धनगर समाजासाठी 'धनगरवाडा' आणि तृतीय पंथींसाठी 'आम्ही का तिसरे?' हे दोन चित्रपट आम्ही सामाजिक दृष्टिकोनातून प्रकाशित केले. या चित्रपटाला महाराष्ट्र शासनाचा क्रिटिक अवॉर्ड मिळाला; पण बॉक्स ऑफीसवर हे चित्रपट चालले नाहीत ही खंत आहे. त्यामुळे आर्थिक फटकाही सहन करावा लागला. मी चित्रपट

वितरणाचे धडे घेतले. त्या धर्तीवर वर्षभर मी महाराष्ट्रातील जत्रांमध्ये जाऊन चित्रपटांचे प्रमोशन केले. मी तिकीट विंडोवर प्रत्यक्ष हजर राहून माझी स्वाक्षरी असलेले फोटो प्रेक्षकांना द्यायचे. चित्रपटाचे तिकीट विकत घेतलेल्या प्रेक्षकांना असे मी सहा लाख फोटो वाटले. त्या काळात काही लोकांनी माझ्यावर टिकाही केली; पण चित्रपट जास्तीतजास्त लोकांपर्यंत पोहोचावा या शुद्ध हेतूने मी ही युक्ती लढवली. यामुळे आमच्या चित्रपट निर्मितीच्या संस्थेने चित्रपट निर्मितीच्या खर्चापेक्षा कित्येक पटींनी जास्त नफा कमवला. त्यानंतर माझ्या या शैलीमुळे माझे पुढील तीन ते चार चित्रपट लोकप्रिय करण्यात मला यश मिळाले. या सर्व घटनांमुळे मला चित्रपट निर्मिती करण्याचे बळ मिळाले. सिने पत्रकार ललिता ताम्हाणे यांनी वृत्तपत्रांमधून माझ्या जत्रांमधून पुरस्कृत केलेल्या चित्रपट सृष्टीतील कारकीर्दीचा आढावा वेळोवेळी प्रकाशित केला. ललिता ताम्हाणे या आम्हा सर्व कलाकारांचे स्नेहसंबंध जोपासण्यात मोलाची कामगिरी बजावत होत्या. या सर्व संघर्षाचा फायदा असा झाला की मोठमोठ्या कंपन्यांचे रुरल मार्केटिंगचे आणि जाहिरातींचे कोट्यावधी रुपयांचे काम माझ्याकडे आले. माझी मैत्रीण मोहिनी पटेल हिने या कार्यात मला मोलाची साथ दिली. तिनेच माझा हा उद्योग सांभाळला. त्यामुळे रोजगारनिर्मितीसुद्धा झाली.

मराठी वाहिन्या घरोघरी पोहोचल्या. जत्राही कमी झाल्या. टुरिंग-टॉकीजची लोकप्रियता कमी झाली. मी सुद्धा काळासोबत कार्यपद्धतीत बदल केले. 'काळूबाईच्या नावानं चांगभलं' हा चित्रपट महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात कानाकोपऱ्यात लोकप्रिय झाला. त्यानंतर माझी देवीच्या रुपातील प्रतिमा जनसमुदायाला आवडू लागली. 'आई माझी काळूबाई' ही सोनी वाहिनीवरील सिरिअल लोकांच्या पसंतीस उतरली. 'शेर शिवराय' या चित्रपटात मला भवानी मातेची भूमिका करण्याचा मान मिळाला. माझी 'धुरळा' या चित्रपटातील एक मद्यपान करणाऱ्या राजकारणी महिलेची भूमिका लोकांना खूप आवडली. मला महाराष्ट्र शासनाचा मानाचा व्ही. शांताराम पुरस्कार, राज्य सांस्कृतिक पुरस्कार या सारखे अनेक मोठे पुरस्कार प्राप्त झाले. माझ्या आणि समीर यांच्या पुरस्कारांनी आमचे घर भरलेले आहे. आमच्या सोनेरी आठवणींचा हा ठेवा आम्ही जतन केला आहे.

रंजना देशमुख ही माझी आवडती अभिनेत्री आहे. तसेच सुलोचना दीदी, जयश्री गडकर, सीमा देव यांच्या भूमिकांतून मी खूप काही शिकले. अशोक सराफ, लक्ष्मीकांत बेर्डे, निळू फुले, रमेश भाटकर, विजय चव्हाण ही सगळी मंडळी म्हणजे माझ्या आयुष्यातील खरेखुरे मित्र, ज्यांनी मला सतत अभिनयाचे धडे दिले. आमची मैत्री नुसती पडद्यावरचीच नाही, तर पडद्यामागची देखील आहे. माझी थोरली बहीण, शिल्पा मसुरकर ही तीस वर्ष माझ्यासोबत हेअरड्रेसर म्हणून कार्यरत होती. मला तिची मैत्रिणीसारखी साथ मिळाली. माझे मेकअपमॅन महादेव दळवी यांनी मला पस्तीस वर्ष भावासारखी मोलाची साथ दिली आहे. अनिल सुतार हे माझ्या ड्रायव्हींगची धुरा उत्तमरीत्या सांभाळतात. माझ्या चित्रपट कंपनीची टीम हेच माझं कुटुंब आहे. ही सगळी मंडळी माझी खूप काळजी घेतात. कोणतेही स्नेहसंबंध हे 'गिव्ह अँड टेक' पद्धतीवर अवलंबून असतात. माझी कैलासवासी आई, माझ्या सासूबाई स्व. सुलभा, माझे सासरे स्व. मुकुंद आठल्ये आणि माझे पती श्री. समीर आठल्ये यांची मला मोलाची साथ लाभली. शरद आणि वसंत कुबल या माझ्या दोन्ही भावांनीही मला मोलाची साथ दिली.

माझ्या माहेरचे गावचे घर कोकणात कणकवली येथे आणि सासरचे गावचे घर रत्नागिरी येथे आहे, जिथे मी अधूनमधून जात असते. वाचन, ड्रायव्हींग आणि पर्यटन हे माझे आवडते छंद आहेत. मी कामानिमित्त अंदाजे वीस लाख किलोमीटरचा प्रवास केला आहे. मध्यंतरीच्या काळात माझा भीषण अपघात झाल्यामुळे मला दोन मणके रिप्लेस करावे लागले. त्याच काळात मला आपले कोण आणि परके कोण ही माणसांची ओळख झाली. शस्त्रक्रियेमुळे दोन-तीन महिने मी अंथरुणाला खिळून होते. त्या काळात काही लोकांना गैरसमज झाला की आता मी कायम व्हिलचेअरचा आधार घेणार. म्हणून काही लोकांनी कामासाठी ॲडव्हान्स दिलेली रक्कम परत घेतली. पूर्वी मी बॅडमिंटन खूप खेळायचे; पण अपघातामुळे माझे खेळणे बंद झाले. प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावर मी पुन्हा नव्या जोमाने कार्यरत झाले. ॲडव्हर्टायझिंग क्षेत्रात मला दहा वर्षांचा अनुभव आहे. आमचा मड आयलंड येथील प्लॉट विकताना जागेचे व्यवहार कसे करायचे याचे ज्ञान मिळाले. त्या जोरावर आता मी मुंबई- पुण्यासारख्या ठिकाणी मोठ्या लँड डिलींगच्या व्यवसायात कार्यरत आहे. दै. तरुण भारतचे पत्रकार श्री. विजयकुमार दळवी माझे मानलेले बंधू आहेत. ते संकटसमयी माझ्यासाठी धावून येतात. त्यांच्या सोबतीने आम्ही चंदगड, कोल्हापूर येथे थिएटर्स, हॉल आणि मॉल उभारले आहेत.

कष्टाने उभे केलेले विश्व सहजासहजी नष्ट होत नाही, हेच त्रिवार सत्य आहे. माणसाने आपले जुने दिवस कधीच विसरू नये. आपण आपल्यावर प्रेम करणाऱ्या रसिक प्रेक्षकांवर, चाहत्यांवर त्यांच्यासारखेच प्रेम करावे. कोणत्याही कामात झोकून देऊन काम करावे. आपण यशाच्या शिखरावर जरी असलो, तरी सदैव आपली पावले जमिनीवरच ठेवावीत. आपल्या निर्मात्यांना, दिग्दर्शकांना, सहकाऱ्यांना आपल्यामुळे त्रास होईल असे वागू नये. यश कधीही डोक्यात जाऊ देऊ नये, असे मला नवउद्योजकांना सुचवावेसे वाटते. मी सदैव वास्तविकतेत जगले. कोणाकडूनही कसली अपेक्षा बाळगली नाही. माझा स्वकर्तृत्वावर ठाम विश्वास आहे. मी जीवनात कधीच घाबरले नाही. कारण मी कधीच चुकीचे काम केले नाही. जे पैसे कमवले ते योग्य ठिकाणी गुंतवले, जेणेकरून भविष्यात कोणाकडेही हात पसरावे लागू नयेत. आजही मी वर्षाला चार ते पाच चित्रपटात काम करते. माझे स्वप्न आहे, की मला मुंबईत भव्यदिव्य अद्ययावत स्टुडिओ उभारायचे आहेत. चंदगड येथेही मला एक स्टुडिओ उभा करायचा आहे. लवकरच माझी ही दोन्ही स्वप्नं पूर्ण होतील कारण मला विश्वास आहे की मी विजेती होणारच!

जीवनात रडणं साहजिक आहे आणि हसणं स्वाभाविक आहे; पण सुखदुःख पचवणं वास्तविक आहे. बालकलाकार म्हणून सुरू झालेला अलकाजींचा हा अखंड प्रवास परिघाला छेदून केंद्रबिंदूपर्यंत जावा अशा टीम उद्योजककडून शुभेच्छा!

*(या मुलाखतीचे शब्दांकन करणाऱ्या लेखकाची २५ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. तसेच त्यांनी आजवर मी विजेता होणारच! या कार्यक्रमाचे ३५०० हून अधिक प्रयोग सादर केले आहेत. आर्ट ऑफ विनिंग नावाने ते प्रशिक्षण देतात. ते नामांकित कंपन्यांचे प्रशिक्षक आहेत. त्यांनी सामाजिक बांधीलकीतून पुणे येथे शिष्यकुल या संस्थेची उभारणी केली आहे. त्यांचा e-mail : nishamissionvijeta@yahoo.com असून त्यांचे भ्रमणध्वनी ९८२०२९२०७२ / ९०२९३७३१११ आहेत.)*

■ ■



यशोगाथा :
शलोका मेहता-अंबानी,
संचालक, रोझी ब्लू फाउंडेशन

# लक्ष्मीपतीची उद्यमशील सूनबाई

**अंबानी कुटुंबात नीता अंबानी यांच्यानंतर सर्वाधिक चर्चेत असणाऱ्या महिला सदस्य म्हणजे परिवारातील मोठी सून श्लोका मेहता. रिलायन्स इंडस्ट्रीजचे सर्वेसर्वा मुकेश अंबानी यांचा मोठा मुलगा आकाश यांच्या श्लोका या पत्नी. मात्र, अंबांनीची सून एवढीच त्यांची ओळख नसून त्या स्वतः एक उद्योजिका आहेत. देशातील सर्वांत मोठ्या हिरे कंपन्यांपैकी एक असणाऱ्या रोझी ब्लूच्या संचालक तर 'कनेक्ट फॉर' या स्वंयसेवी संस्थेच्या संस्थापक आहेत. दक्षिण आणि पश्चिम भारतात मॅकडोनाल्डची फ्रेंचायझी असणाऱ्या हार्डकॅसल रेस्टॉरंट्सशी देखील जोडलेल्या आहेत. देशातील सर्वांत श्रीमंत व्यक्तीच्या सूनबाई तरुण वर्गातील स्टाईल आयकॉन आहेत.**

**- प्रतिनिधी**

श्लोका मेहताचा जन्म ११ जुलै १९९० रोजी मुंबईत झाला. त्यांचे वडील रसेल अरुणभाई मेहता हे भारतातील प्रमुख हिरे व्यापाऱ्यांपैकी एक आहेत. श्लोका रसेल यांची सर्वांत लहान कन्या. त्यांच्या आईचे नाव मोना आहे. मेहता कुटुंब मूळचे भावनगर, गुजरातचे आहे. श्लोकाला एक मोठा भाऊ विराज आणि मोठी बहीण दिया आहे.

### अंबानींच्या शाळेत घेतले शिक्षण

अंबानी आणि मेहता कुटुंबीय एकमेकांना बऱ्याच काळापासून ओळखीचे होते. त्यांच्यात कौटुंबिक मैत्रीही आहे. श्लोका आणि आकाश अंबानी धीरूभाई अंबानी इंटरनॅशनल स्कूलमध्ये एकत्र शिकले. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर आकाशने १२ वीत असतानांच श्लोकासमोर प्रेमाचा प्रस्ताव ठेवला. श्लोकाने तो स्वीकारला. त्यानंतर तिने पालकांना या नात्याबद्दल सांगितले. २००९ मध्ये श्लोकाने न्यू जर्सी येथील प्रिन्सटन विद्यापीठात पुढील शिक्षणासाठी प्रवेश घेतला. त्यानंतर लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिकल सायन्समधून लॉमध्ये मास्टर्स केले. ते जवळपास ९ वर्षे एकमेकांना डेट करत होते. यानंतर २४ मार्च २०१८ रोजी गोव्यातील एका पंचतारांकित रिसॉर्टमध्ये त्यांचे एंगेजमेंट झाली, तर ९ मार्च २०१९ रोजी आकाश आणि श्लोकाने जीओ वर्ल्ड सेंटरमध्ये पारंपारिक हिंदू समारंभात लग्न केले.

### वडिलांच्या कंपनीत संचालक

भारतात परतल्यानंतर श्लोका यांना वडिलांची कंपनी रोझी ब्लूमध्ये संचालक म्हणून बढती मिळाली. त्या जुलै २०१४ पासून रोझी ब्लूच्या संचालक आहेत. रोझी ब्लू ही देशातील सर्वांत मोठ्या हिरे कंपन्यांपैकी एक आहे. श्लोका हार्डकॅसल रेस्टॉरंट्सशी देखील जोडलेली आहे. हार्डकॅसलकडे दक्षिण आणि पश्चिम भारतात मॅकडोनाल्डची फ्रेंचायझी आहे. श्लोकाने मनीती मोदींसोबत 'कनेक्ट फॉर' ही एक ऑनलाइन स्वयंसेवा फाउंडेशनचीही सह-स्थापना केली आहे. ही संस्था गरजूंना शिक्षण, अन्न, निवारा आदी सुविधा पुरवते. तसेच स्वयंसेवकांना गरज असेल तेव्हा विविध संस्थांशी जोडते. श्लोकाची एकूण संपत्ती १३० कोटी रुपये आहे.

### ४ कोटीच्या कारची मालकीन

श्लोका मेहताला प्राण्यांवरही खूप प्रेम आहे. त्या फिटनेसची विशेष काळजी घेतात. नियमित व्यायाम, योगा, जॉगींग, स्विमींग करतात. त्यांना महागड्या कारचीही आवड आहे. श्लोकाकडे ४ कोटी रुपयांची बेंटले कार आहे. यासोबतच श्लोकाकडे मिनी कूपर आणि मर्सिडीज सारख्या आलिशान गाड्या आहेत.

महिला उद्योजकांसाठी विशेष धोरण-२०१७

# उद्योजकतेला चालना देण्यासाठी महिला धोरण!



**आर्थिक विकासामध्ये महिलांचे योगदान अतिशय महत्त्वाचे आहे. आजही महिलांना लिंगभेद, समाजात दिले जाणारे गौण स्थान, तांत्रिक व व्यवस्थापकीय ज्ञानाचा अभाव, उद्योग सुरू करण्यासाठी अपुरे आर्थिक स्रोत, गुंतवणूक साहाय्य, परवडणाऱ्या योग्य, सुरक्षित व्यावसायिक जागा नाहीत अशा अनेक अडचणी आहेत. या बाबी लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने महिलांच्या विकासासाठी आणि राज्याच्या औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी ''महिला उद्योजकांसाठी विशेष धोरण-२०१७'' जाहीर केले आहे. 'उद्योजक'च्या वाचकांसाठी या धोरणातील काही ठळक मुद्दे येथे देत आहोत. जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर हे धोरण महिलांना सक्षम करण्यासाठी निश्चितच उपयुक्त ठरेल.**

**- प्रतिनिधी**

महिला उद्योजकांच्या वाढीसाठी राज्यात आश्वासक व्यावसायिक वातावरण निर्माण करणे व तांत्रिक, परिचालनात्मक तसेच आर्थिक साहाय्य पुरवून राज्यातील महिलांना अधिक रोजगाराच्या संधी निर्माण करण्याच्या दृष्टिकोनातून राज्यातील महिला उद्योजकांसाठी विशेष धोरण-२०१७ ला शासन मान्यता देण्यात येत आहे. या विशेष धोरणाची व विशेष प्रोत्साहन योजनेची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे.

**महिला उद्योजकाची व्याख्या :**

- एकल मालकी घटक ''महिला उद्योजकांचे १०० टक्के भाग भांडवल.
- भागीदारी घटक ''भागीदारी घटक ज्यामध्ये १०० टक्के भाग भांडवल.
- सहकारी क्षेत्र ''सहकार कायद्यांतर्गत ज्या सहकारी संस्थेमध्ये १०० टक्के महिला उद्योजकांचा समावेश असलेली संस्था.
- खासगी किंवा सार्वजनिक मर्यादित घटक : ज्या घटकांमध्ये महिला उद्योजकांचे किमान १०० टक्के भाग भांडवल असेल अशी कंपनी.
- स्वयंसाहाय्यता बचत गट ''जे बचत गट नोंदणीकृत असून, सदर व्याख्येतील क्रमांक ३ आणि ४ नुसार स्थापित झालेले आहेत. (उद्योगांच्या उपरोक्त नमूद केलेल्या घटकांमध्ये किमान ५० टक्के महिला कामगार असलेल्या उपक्रमांना योजनेअंतर्गत प्रोत्साहनासाठी पात्र समजण्यात येईल.)

**विशेष प्रोत्साहन योजनेची व्याप्ती :** सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम विकास (MSMED) अधिनियम-२००६ अंतर्गत उत्पादनासाठी उद्योग आधार धारण करणारे व सामूहिक प्रोत्साहन योजना-२०१३ तील पात्र उपक्रम प्रस्तुत विशेष प्रोत्साहन योजनेसाठी पात्र असतील.

**विशेष प्रोत्साहन योजनेचे स्वरूप :**

**अ) विशेष प्रोत्साहन योजना :** योजनेअंतर्गत पात्र घटकांना सामूहिक प्रोत्साहन योजना-२०१३ चे सर्व निकष व अटी लागू राहतील.

**ब) सामूहिक प्रोत्साहन योजना-२०१३ अंतर्गत अतिरिक्त**

**सवलती :** अ व ब विभागातील उद्योजकांसाठी क विभागातील सवलती लागू राहतील. क व ड विभागातील उद्योजकांसाठी ड+ विभागातील सवलती लागू राहतील. ड+ व विनाउद्योग जिल्हा विभागातील उद्योगांसाठी नक्षल प्रभावित विभागातील सवलती लागू होतील.

**क) भांडवली अनुदान :** नवीन व विस्तारीत पात्र सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांना तालुका वर्गीकरणानुसार अनुज्ञेय स्थिर भांडवली गुंतवणुकीच्या १५ टक्के ते ३५ टक्के दराने रु. २० ते १०० लाख मर्यादेपर्यंत भांडवली अनुदान देण्यात येईल. प्रस्तुत भांडवली अनुदान घटकाचे उत्पादन सुरू झाल्यापासून ५ समान वार्षिक हफ्त्यांमध्ये वितरित करण्यात येईल.

केंद्र शासन, राज्य शासन तसेच त्यांचे उपक्रम यांच्यामार्फत इतर योजनेअंतर्गत भांडवली अनुदान मिळत असलेल्या घटकांना संबंधित योजनेचा लाभ अनुज्ञेय होईल परंतु एकत्रित भांडवली अनुदानाची रक्कम जास्तीत जास्त ५० टक्क्यांच्यावर अनुज्ञेय राहणार नाही.

**ड) वीज दर अनुदान :** नवीन व विस्तारित पात्र सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम हे वापरलेल्या विजेवरील भरणा करण्यात आलेल्या वीज दराच्या अनुदानासाठी पात्र असतील. विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रातील जिल्हे तसेच कोकण विभागातील रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांमधील उद्योगांना प्रत्येक युनिट विजेमागे रु. २/- व राज्यातील इतर जिल्ह्यांतील उद्योगांना प्रत्येक युनिट विजेमागे रु. १/- एवढी सवलत, प्रत्यक्ष उत्पादन सुरू झाल्यानंतर ५ वर्षे कालावधीसाठी अनुज्ञेय असेल. वीज शुल्क सवलत ही सामूहिक प्रोत्साहन योजना-२०१३ अंतर्गत उद्योग विभागाच्या अर्थसंकल्पीय तरतुदीतून दिली जाईल. वीज दर अनुदानाची ही सवलत सामूहिक प्रोत्साहन योजना-२०१३ अंतर्गत देय असलेल्या वीज दर सवलतीऐवजी देय राहील.

**ई) व्याज दर अनुदान :** कोणत्याही संस्थेकडून किंवा भारत सरकारच्या एखाद्या योजनेअंतर्गत प्राप्त होणारी व्याजातील सवलत व दंड/चक्रवाढ व्याज वजा करून, वित्तीय संस्थेचा प्रत्यक्ष व्याज दर किंवा ५ टक्के यापैकी जे कमी असेल त्या दराने व्याज अनुदान गणित केली जाईल. दरवर्षी देय व्याज अनुदानाचे प्रमाण हे संबंधित वर्षामधील भरणा झालेल्या वीज वापराच्या देयकांच्या दुपटीपेक्षा जास्त असणार नाही.

**३. कामगार कल्याण साहाय्य :** पात्र उद्योगातील महिला कामगारांसाठी कर्मचारी भविष्य निर्वाह निधी/राज्य कामगारल कल्याण योजनेतील कंपीच्या योगदानाच्या ५० टक्क्यांपर्यंतची रक्कम ५ वर्षांच्या कालावधीसाठी अनुदानास पात्र असेल.

**४. बाजारपेठ विकास व विपणन साहाय्य :**

**अ) मुद्रा विकसन :** सूक्ष्म व लघु उद्योगातील महिला उद्योजकांनी आपल्या उत्पादनांचे विपणन होण्यासाठी मुद्राचिन्ह विकसित करण्यासाठी केलेल्या खर्चांच्या रकमेच्या ५० टक्के व कमाल रु. १.०० कोटी पर्यंत शासन साहाय्य देईल.

**ब) प्रदर्शनांमध्ये सामील होण्यासाठी प्रोत्साहन :** प्रदर्शनांमध्ये सहभागी होण्यास प्रोत्साहन देण्यासाठी राज्यस्तरीय प्रदर्शनांमध्ये सहभागी होण्यासाठी रु. ५०,०००/- किंवा प्रदर्शनातील गाळ्याच्या भाड्याच्या ७५ टक्के रक्कम व आंतरराष्ट्रीय प्रदर्शनासाठी रु. ३ लाख एवढी मर्यादेत सवलत देण्यात येईल.

**५. समर्पित जागा निर्माण करणे :**

**अ) अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक :** मॉल/व्यावसायिक केंद्र/

| अ. क्र. | साप्रोयो-२०१३ नुसार तालुक्यांचे वर्गीकरण | भांडवली अनुदान (स्थिर भांडवल गुंतवणुकीचे %) | विशेष भांडवली अनुदानाची कमाल मर्यादा (रुपये लाखांत) |
|---|---|---|---|
| १. | अ व ब | १५% | २० |
| २. | क | १५% | २० |
| ३. | ड | २०% | २५ |
| ४. | ड+ | २५% | ५० |
| ५. | उद्योग नसलेले जिल्हे व नक्षल प्रभावीत विभाग | ३५% | १०० |

बाजारपेठेच्या जागी महिला उद्योजकांसाठी २५ टक्के अधिमूल्य घेऊन १० ते १५ टक्के अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक राखीव ठेवण्यात येईल. सदर चटई क्षेत्र निर्देशांक महिला उद्योजकांना समितीने ठरविलेल्या परवडण्यायोग्य दराने देण्यात येईल.

**ब) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे भूखंडांचे आरक्षण :** जिथे आवश्यक असेल, तिथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, लघु व सूक्ष्म उपक्रमासाठी विशेष विभाग विकसित करेल. अशा विशेष विभागांमध्ये समर्पित सामाईक सोयीसुविधा असतील.

**क) जागा राखून ठेवणे :** सार्वजनिक ठिकाणी म्हणजेच मॉल, रेल्वे स्थानके, बस स्थानके, विमानतळ, सीएफसी समूह, चित्रपटगृहे, पादचारी पूल, भुयारी मार्ग, उड्डाण पूल व व्यापार केंद्रांमध्ये उत्पादने प्रदर्शित करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना जागा आरक्षित ठेवण्यास परवानगी देतील.

**ड) उबवन केंद्र :** महिला उद्योजकांसाठी राज्यातील सर्व उबवन केंद्रांमध्ये (Incubation Centre) ३० टक्के आरक्षण ठेवण्यात येईल व त्याद्वारे महिला उद्योजकांना प्रोत्साहन देण्यात येईल.

**६. स्पर्धात्मकता वाढविणे :**

**अ) समूह विकास केंद्र :** महाराष्ट्र राज्य औद्योगिक समूह विकास कार्यक्रमाच्या (MSI-CDP) (एमएसआय-सीडीपी) अंतर्गत महिला उद्योजकांच्या पात्र उद्योगांची किमान १० समूह विकास केंद्रे स्थापन करण्यास राज्य शासन प्रोत्साहन देईल. प्रकल्प खर्चांच्या ९० टक्के रक्कम अनुदान रूपाने साहाय्य म्हणून देण्यात येईल.

**ब) महाराष्ट्र सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम व महिला विकसन संस्था :** सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांना साहाय्य करण्यासाठी एक समर्पित संस्था स्थापन करण्याचे महाराष्ट्र शासनाच्या विचाराधीन आहे. महिला उद्योजकांना प्रोत्साहन द्यायची गरज लक्षात घेऊन महाराष्ट्र सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम व महिला विकसन संस्था म्हणून ती विकसित करण्यात येईल.

**क) समूहांसाठी पायाभूत सुविधा विकसन योजना :** केंद्र व राज्य शासनाच्या समूह विकास योजनेंतर्गत मंजुरी मिळालेल्या समूहांमध्ये, जिथे किमान ५० टक्के महिला सभासद असतील,

महत्त्वाच्या पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी १०० टक्के अनुदान देऊन औद्योगिकीकरणाला प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासन समूह विकसनाचा मार्ग अनुसरेल.

**ड) पुरस्कार व कौतुक उद्योग दिवस :** महिती तंत्रज्ञान पुरस्कारांच्या धर्तीवर व्यवसायातील सर्वोत्तमतेसाठी महिला उद्योजकांना वेगळ्या संवर्गामध्ये पुरस्कार देण्यात येतील.

**इ) 'मैत्री'मध्ये विशेष महिला कक्ष :** महिला उद्योजकांच्या अडचणी सोडविण्यासाठी व त्यांना मदत करून संबंधित सर्व माहिती उपलब्ध करून देण्यासाठी 'मैत्री' अंतर्गत एक खिडक योजनेमध्येस राज्य शासन "महिला कक्ष" स्थापन करेल.

**६.१) साहस भांडवल निधी :** महिला व बाल कल्याण विभाग महिला उद्योजकांसाठी रु. ५० कोटांचा विशेष साहस निधी तयार करेल.

**६.२) उद्योजकता व कौशल्य विकास :** राज्य शासनातर्फे कौशल्य विकास योजना राबविण्यात येईल जेणे करून महिला लाभार्थींना त्यांचे ज्ञान अद्ययावत करून घेता येईल. महाराष्ट्र उद्योजकता विकास संस्था आवश्यकतेनुसार Entrepreneurship Development Institute (EDI), अहमदाबाद व एनएसडीसी यांच्याशी सल्लामसलत करून उद्योजकता विकास कार्यक्रम विकसित करतील. सदर प्रशिक्षणाकरिता दरवर्षी कमीत कमी रु. ३ कोटी इतकी तरतूद उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच महिला कर्मचाऱ्यांना उत्पादन सुरू झाल्यानंतर सुरूवातीची तीन वर्षे दर वर्षी रु. ३०००/- प्रशिक्षणाची मदत करण्यात येईल.

**७)** प्रस्तुत विशेष प्रोत्साहन योजनेच्या विविध सवलतींबाबत सविस्तर कार्यपद्धतीबाबत आदेश स्वतंत्ररीत्या निर्गमित करण्यात येतील.

**८. राज्यस्तरीय समन्वय समिती :** महिला उद्योजकता विशेष धोरणातील विविध बाबींसंदर्भात शासन निर्णय दिनांक ०१.०१.२०१३ सामूहिक प्रोत्साहन योजना-२०१३ च्या परि.९ अन्वये गठित राज्यस्तरीय समन्वय समितीमार्फत विविध सवलतंच्या पात्रता निकष व वाटपाची कार्यपद्धती व त्यात सुधारणा करणेबाबत निर्णय घेण्यात येईल.

**९.** उपरोक्त महिला उद्योजकांसाठी विशेष प्रोत्साहन योजनेच्या अनुषंगाने अपेक्षित आवर्ती निधी चालू आर्थिक वर्ष २०१७-१८ करिता रु. १५.२१ कोटी अपेक्षित असून, पुढील पाच वर्षाकरिता अंदाजे एकूण रु. ६४८.११ कोटी इतका अपेक्षित आहे. सदर खर्च उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या मंजूर अर्थसंकल्पातून करण्यात येईल. प्रस्तुत विषयी वित्तीय तरतुद अर्थसंकल्पीय अधिवेशनात करण्यात येईल व निधी मंजुरीचे आदेश यथावकाश निर्गमित करण्यात येतील.

**११. योजनेची वैधता :** सदर महिला उद्योग धोरण शासन निर्णयाच्या दिनांकापासून ५ वर्षांच्या कालावधीसाठी अथवा शासनाच्या पुढील आदेशापर्यंत वैध राहील.

या योजनेची तपशीलवार माहिती महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१७१२१४१४३६०१५३१० असा आहे. हे महिला धोरण महाराष्ट्र शासनाच्या उपरोक्त संकेत स्थळावरून साभार घेतले असून 'उद्योजक' मासिकाच्या वाचकांसाठी सादर करण्यात येत आहे. ■ ■


**THE STATEMENT ABOUT OWNERSHIP AND PARTICULARS ABOUT NEWSPAPER "UDYOJAK" TO BE PUBLISHED IN THE FIRST ISSUE OF EVERY YEAR**

*(AS PER THE PRESS AND REGISTRATION OF BOOKS ACT SECTION 19-D, RULE NO. 8 & FORM IV)*

| | | |
|---|---|---|
| 1) Name of Publication | : | UDYOJAK |
| 2) Place of Publication | : | Maharashtra Centre for Entrepreneurship Development (MCED), A-38, MIDC, Railway Station, Aurangabad-431005. |
| 3) Period of its Publication & Language | : | Monthly, Marathi |
| 4) Printer's Name | : | S.K.Borde |
| Address | | A-38, MIDC, Railway Station, Aurangabad-431005. |
| Nationality | | Indian |
| 5) Editor's Name | : | B.T. Yeshwante |
| Address | | A-38, MIDC, Railway Station, Aurangabad-431005. |
| Nationality | | Indian |
| 6) Publisher's Name | : | S.K.Borde |
| Address | | A-38, MIDC, Railway Station, Aurangabad-431005. |
| Nationality | | Indian |
| 7) Name & Address of individuals who own the newspaper & partners of shareholders holding more than one percent of the capital. | : | Maharashtra Centre for Entrepreneurship Development (MCED), A-38, MIDC, Railway Station, Aurangabad-431005 (M.S.) |

I, S.K.Borde hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

Date :- 29/02/2024
Place :- Chhatrapati Sambhaji Nagar (Aurangabad) (M.S.)

Sd/-
Signature of Publisher




### फुले मागासवर्ग विकास महामंडळ आणि एसटीपीआयमध्ये सामंजस्य करार

# अनुसूचित जातीच्या युवक-युवतींसाठी ५० जागा राखीव

**राज्यातील अनुसूचित जाती घटकांतील युवक-युवती तसेच नवउद्योजकांसाठी महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. नागपूर येथे सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क ऑफ इंडिया सेंटरच्या उद्घाटन प्रसंगी महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या. आणि सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क ऑफ इंडियाच्या नागपूर सेंटर यांच्यात महत्त्वपूर्ण सामंजस्य करार झाला आहे. याअंतर्गत नागपूर सेंटरमधील ५० जागा अनुसूचित जातीच्या युवक-युवतींसाठी राखीव ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. - प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय अधिनस्त असलेले सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क ऑफ इंडियाचे नागपूर येथे सेंटर सुरू करण्यात आले आहे. सेंटरचे उद्घाटन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते ११ फेब्रुवारी रोजी करण्यात आले. यावेळी इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय चे सहसचिव संकेत भोंडवे, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. अमोल शिंदे, सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क ऑफ इंडिया (पुणे) चे संचालक डॉ. संजयकुमार गुप्ता, सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क ऑफ इंडिया (पुणे) चे महासंचालक अरविंद कुमार, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाचे महाव्यवस्थापक प्रशांत गेडाम, जितेंद्र देवकाते उपस्थित होते.

#### मागासवर्गीय तरुणांना रेड कार्पेट

याप्रसंगी महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या. आणि सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क ऑफ इंडियाच्या नागपूर सेंटर यांच्यात महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आला. करारानुसार नागपूर सेंटरमधील ५० जागा अनुसूचित जातीच्या युवक-युवतींसाठी राखीव ठेवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे मागासवर्गीय समाजातील नव उद्योजकांना महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या वतीने रेड कार्पेट उपलब्ध झाले आहे. राज्यात प्रथमच सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी क्षेत्रात शासन स्तरावरून महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या माध्यमातून पाऊल पडले आहे.

#### रोजगारनिर्मितीसाठी पोषक

नव उद्योजकीय स्टार्ट-अपला पाठिंबा देण्यासाठी आणि आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी अनुसूचित जातीतील ५ युवक-युवतींना महात्मा फुले महामंडळाच्या पीएम-अजय योजनेंतर्गत प्रत्येकी ५० हजार रुपयांप्रमाणे एकूण २ लाख ५० हजार रुपयांचे अर्थसहाय्य यावेळी गडकरी यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. गडकरी यांनी महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या या उपक्रमाचे स्वागत केले आहे. नव उद्योजक घडण्यास यामुळे मदत होणार असून हजारो युवकांना प्रेरणा व रोजगार उपलब्ध होईल, असा आशावाद मंत्री गडकरी यांनी यावेळी व्यक्त केला.

#### हॅपिनेस इंडेक्सवर एसटीपीआयचे काम

महामंडळाचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. अमोल शिंदे यांनी हे महामंडळ हे हॅपिनेस इंडेक्सवर काम करीत असल्याचे सांगितले. तसेच या महामंडळामार्फत उद्योग रोजगार मित्र हे कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. राज्यात जिल्हा पातळीवर येणाऱ्या काळात महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ व महाप्रितच्या माध्यमातून व्यापक प्रमाणात उपक्रम राबविण्यात येणार आहेत. तसेच स्टार्टअपच्या माध्यमातून तरुणांच्या संकल्पनांना पाठबळ देऊन त्यांना आर्थिक सहाय्य देऊन, त्यांचा उद्योग व्यवसाय वाढीसाठी महामंडळ कटिबद्ध असल्याचे शिंदे यांनी यावेळी सांगितले.



## मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रमातून उद्योजक बनण्याची संधी

# धोरण रोजगारनिर्मितीचे, उद्दिष्ट प्रगत महाराष्ट्राचे

**''नोकरी मागणाऱ्यांपेक्षा नोकरी देणारे व्हा'', असे नेहमी सांगितले जाते. मात्र, मार्गदर्शन व गुंतवणुकीसाठी पैशांचा अभाव असल्याने अनेकांचे उद्योजक होण्याचे स्वप्न प्रत्यक्षात उतरत नाही. ते सत्यात उतरविण्यासाठी मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम म्हणजेच सीएमईजीपी मोलाची भूमिका बजावत आहे. मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम (सीएमईजीपी) या योजनेस मा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदेजी व मा. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसजी यांच्या नेतृत्वाखालील युती सरकारने या योजनेत सुधारणा करण्याबाबतचा निर्णय नुकताच घेतलेला आहे. या योजनेअंतर्गत निर्मिती व उत्पादन क्षेत्रासाठी ५० लाख, तर सेवा व कृषिपूरक प्रकल्पांसाठी २० लाख रुपयांपर्यंतचे अर्थसहाय्य केले जाते. योजनेचे लक्षांक सहापटीने वाढविण्यात आले आहेत. यावर्षी ५४१ कोटींची तरतूद करण्यात आली असून, याचा लाभ सुमारे ३०,००० घटकांना होणार आहे. या सुधारित तरतुदींचा आढावा या लेखात घेण्यात आला आहे. या योजनेस मोठ्या प्रमाणात अनुदानही उपलब्ध आहे, तर वाट कशाची बघता... आपले स्वप्न साकारण्यासाठी, स्वतःचा स्वयंरोजगार उभारण्यासाठी आजच मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रमाचा (सीएमईजीपी) लाभ घ्या व उद्योजक बनण्याचे स्वप्न साकार करा.**

**- संतोष बोर्डे**

राज्याच्या नवीन औद्योगिक धोरण-२०१९ अंतर्गत अनेक नावीन्यपूर्ण योजना व कार्यक्रम महाराष्ट्र शासनाने हाती घेतले आहेत. सूक्ष्म व लघु उपक्रमांना चालना देण्यासाठी तसेच राज्यात व्यापक प्रमाणात रोजगाराच्या संधी स्थानिक ठिकाणी उपलब्ध होण्यासाठी मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम योजना जाहीर केली आहे.

राज्यातील शहरी व ग्रामीण क्षेत्रातील सुशिक्षित युवक-युवतींची वाढती संख्या व उद्योग, व्यवसाय क्षेत्रात राज्यात विविध क्षेत्रांत उपलब्ध होत असलेल्या स्वयंरोजगाराच्या व रोजगाराच्या नवीन संधी विचारात घेऊन उद्योजकतेला चालना देणारी व सर्जनशीलतेला कालानुरूप वाव देणारी सर्वसमावेशक 'मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम' ही योजना दिनांक १ ऑगस्ट २०१९ च्या शासन निर्णयान्वये सुरू करण्यात आली आहे.

### मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम योजना (CMEGP)

### Chief Minister Employment Generation Programme

### स्वयंरोजगारास देई आधार, हेच आपले सरकार!

**उद्देश :** राज्यातील युवक/युवतींच्या सर्जनशीलतेला वाव मिळून राज्यात स्वयंरोजगारास पूरक वातावरण तयार करणे, त्याद्वारे राज्यात ग्रामीण तसेच शहरी क्षेत्रात सूक्ष्म, लघु उपक्रमांद्वारे व्यापक रोजगाराच्या संधी

निर्माण होण्यासाठी शासनाच्या आर्थिक सहाय्यातून प्रकल्प उभारणीस हातभार लावणे.

**दिनांक ०१/०८/२०१९ च्या शासन निर्णयामधील तरतूद :**

**पात्रता अटी :** - राज्यात स्थानिक अधिवास असलेल्या व किमान १८ ते ४५ वयोगटातील स्वयंरोजगार करू इच्छिणारे उमेदवार. विशेष प्रवर्गासाठी (अनुसूचित जाती/जमाती/महिला/अपंग/माजी सैनिक) ५ वर्षांची अट शिथिल.

- रु.१० लाखांवरील प्रकल्पांसाठी किमान शैक्षणिक पात्रता ७ वी पास व रु.२५ लाखांवरील प्रकल्पांसाठी किमान १० वी पास.

- अर्जदाराने यापूर्वी अनुदान समाविष्ट असलेल्या राज्य तसेच केंद्र शासनाच्या/महामंडळांच्या योजनेतून लाभ घेतलेला नसावा.

**प्रकल्प मर्यादा किंमत :** - उत्पादन व निर्मिती प्रकल्पांसाठी कमाल रु. ५० लाख व सेवा/कृषिपूरक उद्योग प्रवर्गातील प्रकल्पांसाठी कमाल रु. १० लाख.

**योजना अंमलबजावणी यंत्रणा :** अ) शहरी भागासाठी : जिल्हा उद्योग केंद्र ब) ग्रामीण भागांसाठी : जिल्हा खादी व ग्रामोद्योग कार्यालय एकत्रित समन्वय व सनियंत्रण, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.

**पात्र मालकी घटक :** वैयक्तिक मालकी, भागीदारी, वित्तीय संस्थांनी मान्यता दिलेले स्वयंसहाय्यता गट.

**प्रकल्प खर्च उभारणी व राज्य शासनाचे आर्थिक सहाय्य (मार्जिन मनी-अनुदान) :**

**बँक/वित्तीय संस्था यांचा सहभाग :** मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम योजनेंतर्गत स्वयंगुंतवणूक व राज्य शासनाचे (अनुदान स्वरूपातील) आर्थिक सहाय्य या व्यतिरिक्त आवश्यक ६० ते ७५ टक्के कर्ज पुरवठा बँकांमार्फत उपलब्ध होईल. राज्यातील राष्ट्रीयकृत बँका, शेड्युल्ड बँका, खाजगी बँका, सुधारित तरतुदींनुसार काही जिल्ह्यांतील मध्यवर्ती सहकारी बँका, इत्यादीमार्फत बँक कर्ज उपलब्ध होईल.

**लाभार्थी निवड :** मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम योजनेची संपूर्ण ऑनलाइन पद्धतीने अंमलबजावणी होईल. यासाठी विशेष सीएमईजीपी पोर्टल अर्जदारांसाठी उपलब्ध असेल. अर्जदारांनी अर्ज केल्यानंतर जिल्हा स्तरावरील स्थापित कार्यबल समितीच्या छाननीअंती मान्यता दिलेले प्रस्ताव संबंधित बँकांना शिफारस करण्यात येतील. बँकांमार्फत प्रकल्पांची आर्थिक व्यवहार्यता तपासून प्रकल्प मंजुरी व कर्ज मंजुरीबाबत बँक निर्णय घेईल. बँक मंजुरीच्या अनुषंगाने मंजुर प्रकल्प किमतीस पात्र असणारे अनुदान संबंधित कर्ज खात्यात राज्य शासनाच्या तरतुदीतून वितरित होईल. राज्य शासनाचे अनुदान ३ वर्षे कालावधीसाठी लॉक इन राहील. प्रकल्प यशस्वीरीत्या अंमलबजावणी झाल्याची खात्री लावल्यानंतर राज्य शासनाचे अनुदान वितरित होईल. संपूर्ण प्रक्रिया ही ऑनलाइन असल्याने अर्जदारांना कार्यालयात भेटी देण्याची आवश्यकता नाही.

**प्रशिक्षण :** योजनेअंतर्गत कर्ज प्रस्ताव मंजुर झालेल्या अर्जदारांसाठी निःशुल्क निवासी स्वरूपाचे उद्योजकीय प्रशिक्षण शासनमान्य संस्थांच्या सहयोगाने आयोजित करण्यात येईल. सदर प्रशिक्षण, उत्पादन प्रवर्गातील प्रकल्पांसाठी २ आठवडे व सेवा, कृषिपूरक उद्योग, व्यवसायांसाठी १ आठवडा मुदतीचे असेल. कर्ज वितरणापूर्वी सदर प्रशिक्षण पूर्ण करणे आवश्यक राहील. सदर प्रशिक्षणात उद्योजकीय व्यक्तिमत्त्व विकसित होणारे, क्षमतावृद्धी व आत्मविश्वास वाढविणारे, विविध विषयतज्ज्ञांचे मार्गदर्शन, उद्योग भेटी, यशस्वी उद्योजकांचे मार्गदर्शन इ. प्रमुख बाबींचा समावेश असेल.

**(अ) सर्वसाधारण आवश्यक कागदपत्रे :**

- जन्म दाखला/शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र/वयाचा पुरावा; - शैक्षणिक पात्रतेसंबंधीची कागदपत्रे/प्रमाणपत्रे; - आधार कार्ड; - नियोजित उद्योग/व्यवसाय जागेबाबतचे दस्ताऐवज, भाडेकरार (साध्या कागदावरील प्राथमिक संमती), बँक मंजुरीनंतर नोंदणीकृत भाडेकरार बँकेस सादर करावा लागेल; - जातीचे प्रमाणपत्र (एस.सी./एस.टी.प्रवर्गासाठी); - विशेष प्रवर्गासाठीचे पूरक प्रमाणपत्र (अपंग, माजी सैनिक); - वाहतुकीसाठी परवानगी व वाहन चालविण्याचा परवाना; - स्वसाक्षांकित विहित नमुन्यातील वचनपत्र (Undertaking)

**(ब) संगणकीय प्रणालीवर (CMEGP PORTAL) आवश्यक माहिती नोंदविल्यास प्रकल्प संकीर्ण अहवाल तयार होईल. त्याची प्रत उपरोक्त कागदपत्रांसोबत अर्जासमवेत सादर करावी.**

**मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम - अर्ज व प्रकल्प उभारणींतर्गत टप्पे :**

जिल्हा स्तरावर CMEGP पोर्टलवर महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांचेकडे ऑनलाइन अर्ज सादर.

- महाव्यवस्थापकांच्या अध्यक्षतेखाली प्रस्तावांची छाननी, प्राथमिक पात्र प्रस्तावांची यादी.

- जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समितीमार्फत प्रस्तावांची अंतिम निवड व विविध बँकांना कार्यक्षेत्रनिहाय कर्ज प्रस्तावांची शिफारस.

- बँकस्तरावर प्रस्तावाची आवश्यक ती शहानिशा कर्ज प्रस्ताव मंजुरीबाबत बँकेकडून अंतिम निर्णय.

प्रस्तावास बँक मंजुरी असल्यास बँकेकडून सादर शासनाच्या अनुदान (मार्जिन मनी) प्रस्तावाची उद्योग संचालनालयाकडून छाननी व मंजुरी. उद्योग संचालनालयाच्या मान्यतेनंतर नोडल बँकेद्वारा संबंधित बँकेस अनुदान वितरण निर्देश.

अर्जदारांनी स्वतःची ५ ते १० टक्के रक्कम उपलब्ध केल्यावर व आवश्यक प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर मंजुर रकमेचे पूर्ण कर्ज वितरण.

- प्रकल्प उभारणी व कार्यान्वयन

- ३ वर्षे प्रकल्प यशस्वीपणे अंमलबजावणी झाल्यानंतर शासनाच्या अनुदानाचे अर्जदाराच्या कर्ज खात्यात समायोजन (Settlement of Claim).

**सुधारित शासन निर्णय ११/११/२०२२ :** मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय सुकाणू समितीने केलेल्या शिफारशीनुसार, मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम योजनेबाबत दिनांक ०१/०८/२०१९ रोजीच्या शासन निर्णयामधील तरतुदींमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात आल्या आहेत.

**मुद्दा क्र.१ (ब) पात्र मालकी घटक :** उपरोक्तप्रमाणे पात्रता धारण करणारे वैयक्तिक मालकी, भागीदारी, वित्तीय संस्थांनी मान्यता दिलेले बचत गट.

**सुधारित तरतूद :** उपरोक्तप्रमाणे पात्रता धारण करणारे वैयक्तिक मालकी,

भागीदारी, वित्तीय संस्थांनी मान्यता दिलेले बचत गट यांचेसह एकल मालकी कंपनी (ओपीसी) व मर्यादित दायित्व संस्था (एलएलपी).

**मुद्दा क्र. २ (२.१)** 'मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रमा'मध्ये पात्र उद्योग/व्यवसायांतर्गत प्रकल्प किंमत कमाल मर्यादा सेवा उद्योग तसेच कृषिपूरक उद्योग/व्यवसायासाठी रुपये २०.०० लाख व उत्पादन प्रकाराच्या प्रवर्गातील प्रकल्पासाठी प्रकल्प किंमत मर्यादा रुपये ५०.०० लाख राहील.

**सुधारित तरतूद :** 'मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रमा'मध्ये पात्र उद्योग/व्यवसायांतर्गत प्रकल्प किंमत कमाल मर्यादा सेवा उद्योग तसेच कृषिपूरक उद्योग/व्यवसायासाठी रुपये २०.०० लाख व उत्पादन प्रकाराच्या प्रवर्गातील प्रकल्पासाठी प्रकल्प किंमत मर्यादा रुपये ५०.०० लाख राहील.

**मुद्दा क्र. २ (२.२) प्रकल्प खर्चाचे वर्गीकरण :** 'मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम' अंतर्गत प्रकल्प उभारणीचा खर्च वर्गीकरण पुढीलप्रमाणे असेल. घटकाचा प्रवर्ग/प्रभाग - अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/महिला/अपंग/माजी सैनिक/इतर मागास वर्ग/विमुक्त व भटक्या जमाती/अल्पसंख्याक

**सुधारित तरतूद :** 'मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम' अंतर्गत प्रकल्प उभारणीचा खर्च वर्गीकरण पुढीलप्रमाणे असेल.

**घटकाचा प्रवर्ग/प्रभाग :**

| घटकाचा प्रवर्ग/प्रभाग | घटकाची स्वगुंत-वणूक | देय अनुदान (मार्जिन मनी) | | बँक कर्ज | |
|---|---|---|---|---|---|
| **घटकाचा प्रभाग** | --- | **शहरी** | **ग्रामीण** | **शहरी** | **ग्रामीण** |
| अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/महिला/अपंग/माजी सैनिक/इतर मागास वर्ग/विमुक्त व भटक्या जमाती/अल्पसंख्याक | ५% | २५% | ३५% | ७०% | ६०% |
| उर्वरित प्रवर्ग | १०% | १५% | २५% | ७५% | ६५% |

**मुद्दा क्र. ३ (३.२.१) वित्तीय संस्था (बँक) :** 'मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम' अंतर्गत कर्ज प्रस्ताव जिल्हा कार्यबल समितीच्या मंजुरीने संबंधित बँकाकडे कर्ज मंजुरीसाठी शिफारस करण्यात येतील. सरकारी बँका, तसेच खाजगी क्षेत्रातील शड्युल्ड बँका - येस बँक, एचडीएफसी बँक, आयसीआयसीआय बँक इ. प्रमुख बँका सहयोगी संस्था म्हणून कार्यरत राहतील.

**सुधारित तरतूद :** 'मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम' अंतर्गत कर्ज प्रस्ताव जिल्हा कार्यबल समितीच्या मंजुरीने संबंधित बँकाकडे कर्ज मंजुरीसाठी शिफारस करण्यात येतील. सरकारी बँका, तसेच खाजगी क्षेत्रातील शेड्युल्ड बँका - येस बँक, एचडीएफसी बँक, आयसीआयसीआय बँक, सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड (शेड्युल्ड बँक) या व्यतिरिक्त ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक,, अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, अकोला जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, भंडारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, गडचिरोली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक इ. प्रमुख बँका सहयोगी संस्था म्हणून कार्यरत राहतील.

**मुद्दा क्र. ३ (३.२.२) :** योजनेच्या अंमलबजावणीसाठी येणाऱ्या खर्चाबाबत तरतूद.

**सुधारित तरतूद :** 'मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम' योजनेच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी योजनेअंतर्गत विशेष आयटी व समन्वय कक्षासाठीचा खर्च तसेच जिल्हा, विभागीय व मुख्यालय स्तरावर प्रवास खर्च, पुरस्कार, कार्यशाळा/शिबीर/प्रदर्शन, स्टेशनरी, संगणक व प्रिंटर दुरुस्ती इ. तसेच उद्योग संचालनलायच्या अधिनस्त कार्यालयात सीएमईजीपी योजनेच्या विविक्षित कामासाठी सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पद्धतीने उपलब्ध करून घेण्याकरिता अनुषंगिक खर्च इत्यादी आवश्यक सर्व बाबींकरिता स्वतंत्र उद्दिष्टनिहाय उद्दिष्ट शिर्षांची स्वतंत्र सूची निर्माण करण्यात येईल.

**उद्योग विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या सूक्ष्म, लघु घटकांसाठी इतर महत्त्वपूर्ण योजना/उपक्रम :**

१) प्रधानमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम, २) सुधारित बीज भांडवल योजना, ३) जिल्हा उद्योग केंद्र योजना, ४) महाराष्ट्र राज्य सूक्ष्म, लघु उपक्रम समूह विकास योजना, ५) केंद्र शासनाची सूक्ष्म, लघु उपक्रम समूह विकास योजना, ६) महिला उद्योजकता प्रोत्साहन योजना, ७) डॉ. बाबासाहेब आंबेडकर अनुसूचित जाती/जमाती उद्योजकता प्रोत्साहन योजना, ८) निवासी/अनिवासी उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम, ९) काथ्या प्रोत्साहन योजना, १०) औद्योगिक अविकसित भागातील उद्योगांना प्रोत्साहन देणारी सामूहिक प्रोत्साहन योजना -२०१९. ११) माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञान पूरक सेवा तसेच उद्योगक्षेत्रनिहाय/संवर्गनिहाय इतर योजना. १२) उद्योगांच्या अडीअडचणी तसेच आवश्यक परवाने/दाखले ऑनलाइन उपलब्ध होण्यासाठी मैत्री कक्ष सुविधा उपक्रम.

मागच्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी (CMEGP) योजनेचे लक्षांक पाचपटीने वाढविण्यात आले आहेत. यावर्षी ५५० कोटींची तरतूद करण्यात आली असून याचा लाभ सुमारे २५,००० घटकांना होणार आहे.

**अधिक माहिती व संपर्कासाठी :**

**राज्यस्तरीय संनियंत्रण :**

**विकास आयुक्त (उद्योग),** उद्योग संचालनालय, नवीन प्रशासकीय इमारत, २रा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई - ४०० ०३२.

**राज्यस्तरीय समन्वय :**

**हेल्पलाइन नंबर :** २२ २२०२ ३९१२.

**महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र** (संबंधित जिल्हा)

**जिल्हा खादी व ग्रामोद्योग अधिकारी** (संबंधित जिल्हा)

**संकेतस्थळ -** www.maha-cmegp.gov.in

www.di.maharashtra.gov.in

*(या लेखाचे लेखक 'उद्योजक' मासिकाचे व्यवस्थापकीय संपादक व 'उद्योजक' विभाग प्रमुख म्हणून एमसीईडी मुख्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे कार्यरत आहेत. त्यांचा ई-मेल udyojakmagazine2@gmail.com असून भ्रमणध्वनी ९४०३०७८७७९ आहे.)*

कोडिंग, एआयचा वापर, जगभरात संचार

# सेवा क्षेत्राला तंत्रज्ञानाचे वरदान



**जगभरात सेवा उद्योगाचे महत्त्व वाढत आहे. कोरोनानंतर तर याला अधिकच महत्त्व प्राप्त झाले. काळानुरूप या क्षेत्रातही विज्ञान-तंत्रज्ञानाने शिरकाव केला असून कोडिंग, सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या वापरामुळे या उद्योगाला वरदान मिळाले आहे. त्यामुळे काम करणे सोपे झाले आहे. आपल्या घरात बसून जगभरात कामाची संधी उपलब्ध झाली आहे. आयटी, आरोग्य, पर्यटन, अंतराळ संशोधन, बँकिंग, ऊर्जा, शिक्षण आणि माध्यम क्षेत्रांत या सेवा प्रदान करता येतात.**

**- सुवर्णा कोलारकर**

बदलत्या तांत्रिक घडामोडी आणि लोकांच्या विकसित जीवनशैलीशी जुळवून घेत सेवा उद्योगात अलीकडच्या वर्षांत उल्लेखनीय परिवर्तन झाले आहे. या बदलामुळे सेवा क्षेत्रामध्ये नवीन पर्याय निर्माण झाले आहेत, जे करिअर घडवू पाहणाऱ्यांसाठी हे एक रोमांचक आणि गतिमान क्षेत्र बनले आहे. येथे, आम्ही आगामी सेवा उद्योग पर्यायांचा शोध घेत आहोत, या क्षेत्रातील फायद्यांवर प्रकाश टाकत आहोत आणि नवीन पिढीला सेवा उद्योगात करिअर करण्याचा विचार करण्याचे कौतुक आणि आवाहन देऊन समाप्ती करतो.

**सेवा उद्योगात नवीन पर्याय : १. तंत्रज्ञान-चालित भूमिका :** तंत्रज्ञानाच्या एकात्मतेने सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट आणि कोडिंग करिअरसारखे मार्ग खुले केले आहेत, जे विविध क्षेत्रांतील डिजिटल कौशल्याची वाढती मागणी प्रतिबिंबित करते. या भूमिका केवळ स्पर्धात्मक पगारच देत नाहीत, तर अत्याधुनिक प्रकल्पांवर काम करण्याची संधी देखील देतात. **२. रिमोट वर्क मॅनेजमेंट :** रिमोट वर्क अधिक प्रचलित होत असताना, सेवा उद्योगाने AI सारख्या तांत्रिक प्रगतीद्वारे रिमोट कर्मचाऱ्यांचे व्यवस्थापन करणाऱ्या भूमिकांचा समावेश करण्यास अनुकूल केले आहे. या संक्रमणामुळे व्हर्च्युअल कोलॅबोरेशन आणि टीम मॅनेजमेंटमध्ये कौशल्य असलेल्या व्यक्तींसाठी संधी निर्माण झाली आहे. **३. हायब्रीड लवचिकता :** कामाच्या ट्रेंडचे भविष्य 'शांत हायरिंग' आणि हायब्रीड लवचिकता वाढण्याचे संकेत देते. मागणीतील प्रतिभा आकर्षित करण्यासाठी नवीन मार्ग प्रदान करते आणि कार्य-जीवन संतुलन ऑफर करते. अनेक सेवा-केंद्रित व्यवसायांमध्ये ही लवचिकता एक प्रमुख वैशिष्ट्य बनली आहे.

**सेवा उद्योगाचे फायदे : १. डायनॅमिक वर्क एन्व्हायर्नमेंट :** सेवा उद्योग गतिमानतेवर भरभराट करतो. व्यावसायिकांना असे वातावरण प्रदान करतो जेथे ते सतत शिकू शकतात आणि उदयोन्मुख ट्रेंडशी जुळवून घेतात. **२. जागतिक संधी :** दूरस्थ काम आणि जागतिक सहकार्याच्या वाढीमुळे, सेवा उद्योगातील व्यक्ती जागतिक स्तरावर करिअरच्या संधी शोधू शकतात, त्यांची क्षितिजे विस्तृत करू शकतात आणि त्यांचा व्यावसायिक अनुभव समृद्ध करू शकतात. **३. सामाजिक प्रभाव :** अनेक सेवा उद्योग भूमिका सामाजिक कल्याणासाठी थेट योगदान देतात. तंत्रज्ञान-चालित उपाय किंवा समुदाय-केंद्रित उपक्रमांद्वारे असो, या क्षेत्रातील व्यावसायिकांना त्यांच्या कार्याचा सकारात्मक प्रभाव पडतो.

**निष्कर्ष :** शेवटी, सेवा उद्योग आधुनिक जगात अनुकूलता आणि नावीन्यपूर्णतेचा दिवा म्हणून उभा आहे. या क्षेत्रातील सतत विस्तारणारे पर्याय केवळ तांत्रिक प्रगतीच पूर्ण करत नाहीत तर व्यक्तींच्या बदलत्या पसंती आणि जीवनशैलीशी सुसंगत आहेत. सेवा उद्योगाचे गतिमान स्वरूप व्यावसायिकांना कामाचे भविष्य घडविण्यासाठी एक रोमांचक व्यासपीठ प्रदान करते.

**नवीन पिढीला आवाहन :** नवीन पिढीच्या महत्त्वाकांक्षी व्यावसायिकांना सेवा उद्योग अनेक संधींचे संकेत देत आहे. तांत्रिक युगाचा स्वीकार करा, रिमोट कामाचे क्षेत्र एक्स्प्लोर करा आणि विकसित लँडस्केपद्वारे ऑफर केलेल्या लवचिकतेचा लाभ घ्या. सेवा उद्योग हे केवळ करिअर नाही, समाजासाठी अर्थपूर्ण योगदान देण्याचा आणि वैयक्तिक वाढीस चालना देण्याचा हा एक मार्ग आहे. तुम्ही तुमच्या करिअरच्या प्रवासाला सुरुवात करत असताना, सेवा उद्योगाचा एक कॅनव्हास म्हणून विचार करा, जेथे तुमची कौशल्ये आणि आवड, प्रगती आणि नावीन्यपूर्ण चित्र रंगवू शकते.

**भारतातील सेवा उद्योगांची विशेष यादी : १. IT-BPM/Fintech :** भारत माहिती तंत्रज्ञान (IT) आणि बिझिनेस प्रोसेस मॅनेजमेंट (BPM) साठी एक जागतिक केंद्र म्हणून उदयास आला आहे, ज्यामध्ये वेगाने वाढणाऱ्या फिनटेक क्षेत्राचा समावेश आहे. **२. आरोग्यसेवा आणि पर्यटन :** भारतातील सेवा क्षेत्रामध्ये आरोग्य सेवा आणि पर्यटन यांचा समावेश आहे, ज्यामुळे देशाच्या आर्थिक विकासात महत्त्वपूर्ण योगदान आहे. **३. अंतराळ उद्योग :** भारताचे अंतराळ क्षेत्र हे त्याच्या सेवा उद्योगाचा भाग आहे, जे अंतराळ संशोधन आणि उपग्रह तंत्रज्ञानातील प्रगती दर्शविते. **४. लॉजिस्टिक आणि वाहतूक :** लॉजिस्टिक आणि वाहतूक सेवा व्यवसायांना जोडण्यात आणि देशभरातील मालाची वाहतूक सुलभ करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. **५. बँकिंग आणि वित्त :** भारतातील सेवा क्षेत्रामध्ये बँकिंग आणि वित्त यांचा समावेश आहे, ज्यामध्ये वित्तीय संस्थांचे एक मजबूत नेटवर्क आहे जे विस्तृत सेवा प्रदान करतात. **६. IT आणि तंत्रज्ञान सेवा :** भारतात अनेक सेवा-आधारित कंपन्या आयटी आणि तंत्रज्ञानामध्ये विशेष आहेत, जसे की ओरॅकल, इन्फोसिस, IBM, टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस आणि HCL तंत्रज्ञान. **७. ऊर्जा क्षेत्र :** सेवा उद्योग ऊर्जा क्षेत्रापर्यंत विस्तारित आहे, ज्यामध्ये ऊर्जा उत्पादन, वितरण आणि व्यवस्थापनाशी संबंधित सेवा समाविष्ट आहेत. **८. शैक्षणिक सेवा :** शिक्षण क्षेत्र हा भारतातील सेवा उद्योगाचा एक महत्त्वाचा घटक आहे, जो शैक्षणिक सेवा आणि उपायांची विस्तृत श्रेणी ऑफर करतो. **९. मीडिया सेवा :** प्रिंट, इलेक्ट्रॉनिक आणि डिजिटल मीडियासह मीडिया सेवा, भारतातील सेवा उद्योगाच्या दोलायमान लँडस्केपमध्ये योगदान देतात. **१०. निर्यात आणि आयात सेवा :** सेवा क्षेत्रामध्ये मालाच्या निर्यात आणि आयातीशी संबंधित रसद आणि सेवांचा समावेश होतो, ज्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार सुलभ होतो.

ही विशेष यादी भारतातील वैविध्यपूर्ण आणि गतिमान सेवा उद्योगांवर प्रकाश टाकते, जी तंत्रज्ञानापासून आरोग्य सेवा आणि त्यापुढील विविध क्षेत्रांमध्ये देशाच्या पराक्रमाचे प्रदर्शन करते.

*(या लेखाच्या लेखिकेचे लेख नियतकालिकांतून प्रकाशित होत असतात.)*

■■




केंद्र शासनाची योजना,
३ लाख रुपयापर्यंत कर्ज

# महिला उद्योजक उभे करणारी उद्योगिनी

**एक महिला शिकली की ती घराला पुढे नेते. अगदी याचप्रमाणे एक महिला कमवती झाली, तिने उद्योजकतेची कास धरली तर ती अन्य महिलांनाही उद्योजकतेकडे घेऊन जाते. मात्र, उद्योजकतेची वाट सोपी नाही. त्यात सर्वांत मोठा अडथळा आहे तो गुंतवणुकीचा. पैशाशिवाय कोणताही उद्योग सुरू करणे कठीणच नाही तर अशक्यही आहे. त्यामुळेच शासनाने महिलांना उद्योगासाठी ३ लाख रुपयांपर्यंत कर्ज देणारी उद्योगिनी ही योजना सुरू केली आहे. नेमकी काय आहे ही योजना, त्यासाठी अर्ज कोठे करायचा याविषयी.**

**- प्रतिनिधी**

राज्याच्या आर्थिक विकासात महिला उद्योजकता महत्त्वाचा स्त्रोत मानली गेली आहे. महिला उद्योजक समाजामध्ये व्यवस्थापन, संघटन व व्यवसायाशी संबंधित बाबींमध्ये निरनिराळे आयाम प्रस्तुत करीत आहेत. तथापि महिलांनी परिचालीत केलेल्या उपक्रमांची संख्या ही एकूण उपक्रमांच्या प्रमाणात फारच कमी आहे. आजच्या आधुनिक गतिमान युगात शाश्वत आर्थिक व सामाजिक विकासाच्या जागतिक वाटचालीमध्ये महिला उद्योजकांची महत्त्वाची भूमिका राहणार आहे. महाराष्ट्र राज्यात महिलांनी समाजामध्ये जरी मोलाची भूमिका निभावली असली तरीही अनेक कारणांमुळे त्यांच्यावरील उद्योजकीय कार्यक्षमतेला पुरेसा वाव मिळालेला नाही. ही बाब लक्षात घेऊन उद्योग क्षेत्रात महिलांचा टक्का वाढविण्यासाठी सरकार वेळोवेळी विविध योजना आणत असते. केंद्र शासनाची उद्योगिनी योजना त्यापैकीच एक.

## तीन लाख रुपयांपर्यंत कर्ज

'उद्योगिनी' ही योजना महिलांना ३ लाख रुपयापर्यंतचे कर्ज मिळवून देते. यात ८८ प्रकारचे छोटे व्यवसाय स्थापन करता येता. त्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या स्थिर होण्यासाठी केंद्र सरकारने सुरू केलेली ही योजना आहे. ही कर्ज योजना लघु उद्योग स्थापन करून आर्थिक स्वावलंबनाकडे वाटचाल करणाऱ्या महिलांसाठी आहे.

## उद्योगिनी योजना काय आहे?

देशात रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी जनसांख्यिकीय बदल आणि महिला संस्थापकांच्या पुढील पिढीला प्रेरणा देऊन महिलांच्या मालकीचे व्यवसाय उद्योग स्थापन करणे गरजेचे आहे. केंद्र सरकारच्या आत्मनिर्भर भारत कार्यक्रमाचा एक उद्देश हा महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्यासाठी वित्तीय मदत करणे हा आहे. उद्योगिनी या योजनेत महिलांना उद्योजक-व्यावसायिक म्हणून स्वतःच्या पायावर उभं राहायला मदत केली जाते.

## ५० हजार महिलांना लाभ

सर्वांत प्रथम ही योजना कर्नाटक सरकारने सुरू केली होती. तिचे यश पाहून नंतर केंद्र सरकार देशभर त्याची अंमलबजावणी करत आहे. केंद्र सरकारच्या महिला व बालविकास मंत्रालयाकडून ही योजना राबवली जाते. या योजनेमध्ये प्रामुख्याने ग्रामीण भागातील महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाला अधिक प्राधान्य दिले जाते. आतापर्यंत ५० हजाराहून अधिक महिलांनी या योजनेचा लाभ घेतला असून त्या लघुउद्योजक म्हणून त्यांची यशस्वी वाटचाल सुरू आहे.

## योजनेसाठी नियम

या योजनेअंतर्गत पात्र महिलेला तीन लाख रुपयांपर्यंतचे कर्ज मिळू शकते. अर्जदार महिलेचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न हे १.५ लाख रुपयांपेक्षा कमी असणे गरजेचं आहे. दिव्यांग महिला, विधवा आणि परित्यक्तांसाठी उत्पन्नाची मर्यादा नाही. त्यांना व्याजमुक्त कर्ज दिले जाते. इतर प्रवर्गातील महिलांना १० ते १२ टक्के व्याजदराने कर्ज दिले

जाते. ज्या बँकेचं कर्ज घेतलं जाते, त्या बँकेच्या नियमांनुसार व्याजदर असतो. कुटुंबाच्या वार्षिक उत्पन्नानुसार ३० टक्के अनुदान दिले जाते.

### योजनेसाठी पात्रता

या योजनेसाठी १८ ते ५५ वर्षे वयोगटातील सर्व महिला पात्र आहेत. योजनेसाठी अर्ज करणाऱ्या महिलांनी त्यांचा क्रेडिट स्कोअर मजबूत असल्याची खात्री करावी. यापूर्वी कर्ज घेतले असेल आणि त्याची योग्य परतफेड केली नसेल तर कर्ज दिले जाणार नाही. सिबिलचा स्कोअर चांगला असल्याची खात्री करूनच अर्ज करावा.

### आवश्यक कागदपत्रे

भरलेल्या अर्जासोबत पासपोर्ट साइजचे दोन फोटो जोडावेत, अर्ज करणाऱ्या महिलेचे आधार कार्ड आणि जन्माचा दाखला, दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींनी शिधापत्रिकेची (रेशनकार्ड) प्रत, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी दाखला, जात पडताळणी प्रमाणपत्र आणि बँक खाते पासबुक

### कोणाशी संपर्क साधावा

या योजनेंतर्गत कर्ज मिळविण्यासाठी महिला त्यांच्या जवळच्या बँकेमध्ये संपर्क साधू शकतात. बजाज फायनान्स सारख्या खाजगी वित्तीय संस्था देखील उद्योगिनीसाठी कर्ज देतात. अधिक तपशीलासाठी महिला खालील पत्यावर संपर्क साधू शकतात. उद्योगिनी, डी-१७, तळघर, साकेत, नवी दिल्ली-११००१७, फोननंबरः ०११-४५७८११२५, मेल- mail@udyogini.org.


।।श्री स्वामी समर्थ।।

श्री स्वामी समर्थ कृषी संशोधन चॅरिटेबल ट्रस्ट

आखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ, श्री त्रंबकेश्वर, जि. नाशिक

Mob: 7755941753 Mob: 8850585441 Mob: 9769048132

संस्थेचे ध्येय-उध्दिष्ट

- शैक्षणिक
- आरोग्य
- शैक्षणिक महिला व बालकल्याण
- उद्योग व्यवसाय मार्गदर्शन
- कौशल्य विकास प्रशिक्षण
- पर्यावरणपूरक वस्तु निर्मिती प्रशिक्षण
- महिला बालकल्याण
- कृषी क्षेत्रातुन जोडव्यवसाय
- व्यसन मूक्ती व प्रशिक्षण
- सात्विक बचत गट
- युवक - युवती विकास
- स्वयंरोजगार मेळावा



महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (एमसीईडी)

महिला उद्योजकता विकास विंगतर्फे जागतिक महिला दिनाच्या हार्दीक शुभेच्छा

अ-३८, एमआयडीसी रेल्वे स्टेशन परिसर, छत्रपती संभाजीनगर-४३१ ००५.

भ्रमणध्वनी ९४०३६८३१७३, ९४०३६८३१६३, ९४०३६८३१९६




महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राच्या (एमसीईडी) महिला उद्योजकता विकास विंगतर्फे उद्योजिका बनू इच्छिणाऱ्या महाराष्ट्रातील महाविद्यालयीन युवती, स्वयंसहाय्यता बचत गटातील सदस्य, गृहिणी, महिला, अधिकारी, कर्मचारी व इतर क्षेत्रात कार्यरत सर्व युवती व महिलांसाठी एमसीईडी महिला विंगअंतर्गत उद्योगाच्या निवडीपासून तर उद्योग स्थापनापर्यंतची सविस्तर माहिती ज्यात शासनाचे महिला उद्योजकता धोरण, राज्य व केंद्र शासनाच्या समूह विकास योजना, महिला उद्योजकता विकासाबद्दल मार्गदर्शनासाठी वरील भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा.



महिला उद्योजकांसाठी
शासनाचे विशेष धोरण

# महिलांनो उद्योजक व्हा!

**राज्याच्या आर्थिक विकासात महिला उद्योजकता महत्त्वाचा स्रोत मानली गेली आहे. महिला उद्योजक समाजामध्ये व्यवस्थापन, संघटन व व्यवसायाशी संबंधित बाबींमध्ये निरनिराळे आयाम प्रस्तुत करीत आहेत. तथापि महिलांनी परिचालीत केलेल्या उपक्रमांची संख्या ही एकूण उपक्रमांच्या प्रमाणात फारच कमी आहे. आजच्या आधुनिक गतिमान युगात शाश्वत आर्थिक व सामाजिक विकासाच्या जागतिक वाटचालीमध्ये महिला उद्योजकांची महत्त्वाची भूमिका राहणार आहे. महाराष्ट्र राज्यात महिलांनी समाजामध्ये जरी मोलाची भूमिका निभावली असली तरीही अनेक कारणांमुळे त्यांच्यावरील उद्योजकीय कार्यक्षमतेला पुरेसा वाव मिळालेला नाही. हा वाव देण्यासाठी महिला उद्योजकांसाठी शासनाचे विशेष धोरण आहे. त्यातील तरतुदींविषयी माहिती देणारा लेख. - प्रतिनिधी**

सद्यःस्थितीत महिला उद्योजकांपुढे लिंगभेद व समाजातील स्थान, व्यवसाय सुरू करण्यासाठी अपुरे स्रोत, तांत्रिक व व्यवस्थापकीय ज्ञानाचा अभाव, मर्यादित आर्थिक स्रोत व गुंतवणूक सहाय्य, परवडण्याजोग्या व सुरक्षित व्यावसायिक जागांचा अभाव इत्यादी अनेक आव्हाने आहेत. राज्याच्या सर्वसमावेशक विकासासाठी महिलाचलित उपक्रमांच्याद्वारे आर्थिक व सामाजिक बदल घडवण्यास प्रोत्साहन देणारे जागतिकदृष्ट्या सक्षम व्यवसाय केंद्र बनविणे व महिला उद्योजकांसाठी पोषक वातावरण निर्माण करणे, या दृष्टिकोनातून महिला उद्योजकांसाठी सक्षम धोरण राबविण्यात येणार आहे.

शासनाने यापूर्वी विविध नावीन्यपूर्ण पुढाकार घेऊन राज्यातील औद्योगिक वातावरण अधिक सुधारण्यासाठी व उद्योजकांच्या विकासासाठी ते अधिक अनुकूल बनविण्याकरिता व समावेशकता कायम ठेवत उद्योगांना जागतिक स्पर्धेची किनार देण्यासाठी औद्योगिक धोरण-२०१३ घोषित केले आहे. त्यामुळे राज्याच्या औद्योगिक वाढीच्या मुख्य प्रवाहात महिला उद्योजकांच्या सक्रीय सहभागाने सर्वसमावेशक आर्थिक विकास होण्यासाठी महिला उद्योजकांकरिता विशेष योजना प्रस्तावित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. महिला उद्योजकांसाठी विशेष धोरणाचे उद्दिष्ट महिला परिचालित उद्योगांचे प्रमाण ९ टक्क्यांवरून २० टक्क्यांपर्यंत सुधारण्याचे आहे. महिला उद्योजकांच्या वाढीसाठी राज्यात आश्वासक व्यावसायिक वातावरण निर्माण करणे व तांत्रिक, परिचालनात्मक तसेच आर्थिक सहाय्य पुरवून राज्यातील महिलांना अधिक रोजगाराच्या संधी निर्माण करण्याच्या दृष्टिकोनातून राज्यातील महिला उद्योजकांसाठी विशेष धोरण-२०१७ ला शासनाने मान्यता दिली आहे.

महिला उद्योजकांसाठी राबविण्यात येणाऱ्या विशेष धोरणाची व विशेष प्रोत्साहन योजनेचा लाभ एकल मालकी, भागीदारी घटक, सहकारी क्षेत्र, खाजगी किंवा सार्वजनिक मर्यादित घटक, स्वयंसहाय्यता बचत गटांना मिळणार आहे.

### विशेष प्रोत्साहन योजनेची व्याप्ती

सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम विकास (MSMED) अधिनियम, २००६ अंतर्गत उत्पादनासाठी उद्योग आधार धारण करणारे व सामूहिक प्रोत्साहन योजना २०१३ तील पात्र उपक्रम प्रस्तुत विशेष प्रोत्साहन योजनेसाठी पात्र असतील.

विशेष प्रोत्साहन योजनेमध्ये विशेष प्रोत्साहन योजना, सामूहिक प्रोत्साहन योजना २०१३ अंतर्गत अतिरिक्त सवलती, भांडवली अनुदान, वीजदर अनुदान, व्याजदर अनुदान यांचा समावेश आहे. कामगार कल्याण सहाय्य-नवीन व विस्तारित पात्र उद्योगातील महिला कामगारांसाठी कर्मचारी भविष्य निर्वाह निधी/राज्य कामगार कल्याण

योजनेतील कंपनीच्या योगदानाच्या ५० टक्क्यांपर्यंतची रक्कम ५ वर्षांच्या कालावधीसाठी अनुदानास पात्र असेल. हे अनुदान सामूहिक प्रोत्साहन योजना २०१३ अंतर्गत उद्योग विभागाच्या अर्थसंकल्पातून देण्यात येईल.

**बाजारपेठ विकास व विपणन साहाय्य :**

अ) मुद्रा विकसन - नवीन व विस्तारित पात्र उपक्रमांनी त्यांनी उत्पादित केलेल्या उत्पादनांचे मुद्राचिन्ह तयार केल्यास अशा उत्पादनांसाठी मोठी बाजारपेठ खुली होऊ शकेल. यास्तव राज्य शासन महिला उत्पादकांसाठी मुद्राचिन्ह विकसित करण्याच्या एका उपक्रमासाठी सहाय्य करेल. सूक्ष्म व लघु उद्योगातील महिला उद्योजकांनी आपल्या उत्पादनांचे विपणन होण्यासाठी मुद्राचिन्ह विकसित करण्यासाठी केलेल्या खर्चाच्या रकमेच्या ५० टक्के व कमाल रुपये १ कोटी पर्यंत शासन सहाय्य देईल.

ब) प्रदर्शनांमध्ये सहभागी होण्यास प्रोत्साहन देण्यासाठी जिथे इतर कुठलेही संघटनात्मक पाठबळ देण्यात येत नाही, अशा देशांतर्गत राज्यस्तरीय प्रदर्शनांमध्ये सहभागी होण्यासाठी रुपये ५० हजार किंवा प्रदर्शनातील गाळ्याच्या भाड्याच्या ७५ टक्के रक्कम व आंतरराष्ट्रीय प्रदर्शनासाठी रुपये ३ लाख एवढी मर्यादेत सवलत देण्यात येईल. महिला उद्योजकांसाठी आयोजित केलेल्या विभागीय/राज्यस्तरीय प्रदर्शनासाठी केलेल्या खर्चाच्या ५० टक्के रक्कम कमाल रुपये १० लाख मर्यादेपर्यंत सहाय्य देण्यात येईल. प्रस्तुत विषयी प्रदर्शनांबाबत अनुदानासंदर्भात पात्रता निकष व वाटपाची कार्यपद्धती अपर मुख्य सचिव (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली समन्वय समितीमार्फत विहीत करण्यात येईल. धोरणातील प्रमुख तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत -

**१) समूह विकास केंद्र -** महाराष्ट्र राज्य औद्योगिक समूह विकास कार्यक्रमाच्या (MSI-CDP) अंतर्गत महिला उद्योजकांच्या पात्र उद्योगांची किमान १० समूह विकास केंद्रे स्थापन करण्यास राज्य शासन प्रोत्साहन देईल. प्रकल्प खर्चाच्या ९० टक्के रक्कम अनुदान रूपाने सहाय्य म्हणून देण्यात येईल. दरवर्षी किमान २ समूह विकास केंद्रे विकसित करण्यात येतील. जेणेकरून ५ वर्षांच्या कालावधीमध्ये एकूण १० समूह विकास केंद्रे विकसित होतील. ही रक्कम सामूहिक प्रोत्साहन योजना २०१३ अंतर्गत उद्योग विभागाच्या अर्थसंकल्पातून दिली जाईल.

**२) महाराष्ट्र सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम व महिला विकसन संस्था -** सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांना सहाय्य करण्यासाठी एक समर्पित संस्था स्थापन करण्याचे महाराष्ट्र शासनाच्या विचाराधीन आहे.

**३) समूहांसाठी पायाभूत सुविधा विकसन योजना -** केंद्र व राज्य शासनाच्या समूह विकास योजनेंतर्गत मंजुरी मिळालेल्या समूहांमध्ये जिथे किमान ५० टक्के महिला सभासद असतील, महत्त्वाच्या पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी १०० टक्के अनुदान देऊन औद्योगिकीकरणाला प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासन समूह विकसनाचा मार्ग अनुसरेल.

**४) पुरस्कार व कौतुक उद्योग दिवस -** माहिती तंत्रज्ञान पुरस्कारांच्या धर्तीवर व्यवसायातील सर्वोत्तमतेसाठी महिला उद्योजकांना वेगळ्या संवर्गामध्ये पुरस्कार देण्यात येतील. उद्योगांना व विशेषतः सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांना त्यांची उत्पादने व क्षमता प्रदर्शित करण्यासाठी सामायिक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये वार्षिक उद्योग दिन साजरा करण्याचे औद्योगिक धोरण २०१३ मध्ये प्रस्तावित करण्यात आले आहे.

**५) विविध प्रदर्शने, कार्यशाळा, परिसंवाद व विशेष पुरस्कार -** उद्योग दिनी विविध प्रदर्शने, कार्यशाळा, परिसंवाद व सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमासाठी विविध सादरीकरणे आयोजित करण्यात येतील व महिलांनी चालविलेल्या व त्यांची मालकी असलेल्या सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांवर विशेष भर असेल. महिला उद्योजकांनी केलेल्या प्रशंसनीय कामासाठी व सुप्त महिला उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी महिलांना विशेष पुरस्कार देणे हा याचाच भाग असेल.

**६) मैत्रीमध्ये विशेष महिला कक्ष -** महिला उद्योजकांच्या अडचणी सोडविण्यासाठी व त्यांना मदत करून संबंधित सर्व माहिती उपलब्ध करून देण्यासाठी मैत्री अंतर्गत एक खिडकी योजनेमध्ये राज्य शासन महिला कक्ष स्थापन करेल.

**७) साहस भांडवल निधी -** महिला व बाल कल्याण विभाग महिला उद्योजकांसाठी रुपये ५० कोटीचा विशेष साहस निधी तयार करेल. या निधीतून व्यवहार्यता तफावत निधीसाठी सहाय्य करण्यात येईल.

**८) उद्योजकता व कौशल्य विकास -** राज्य शासनातर्फे कौशल्य विकास योजना राबविण्यात येईल, जेणेकरून महिला लाभार्थ्यांना त्यांचे ज्ञान अद्ययावत करून घेता येईल. महाराष्ट्र उद्योजकता विकास संस्था आवश्यकतेनुसार Entrepreneurship Development Institute (EDI) अहमदाबाद व एनएसडीसी यांच्याशी सल्लामसलत करून उद्योजकता विकास कार्यक्रम विकसित करतील. सदर प्रशिक्षणाकरिता दरवर्षी कमीत कमी रुपये ३ कोटी इतकी तरतूद उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच महिला कर्मचाऱ्यांना उत्पादन सुरू झाल्यानंतर सुरुवातीची ३ वर्षे दरवर्षी रुपये ३ हजार, प्रशिक्षणाची मदत करण्यात येईल. हे सहाय्य कै.प्रमोद महाजन कौशल्य विकास योजनेशी जोडण्यात येईल. पात्र घटकास संबंधित कर्मचाऱ्यांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण दिल्याबाबतच्या माहितीच्या आधारे अनुदान मंजूर करण्यात येईल.

**९) समर्पित जागा निर्माण करणे -** यात अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे भूखंडांचे आरक्षण, जागा राखून ठेवणे, उबवन केंद्र यांचा समावेश आहे.

औद्योगिक विकासासाठी राज्यात तयार करण्यात आलेल्या पोषक वातावरणाचा लाभ महिला उद्योजकांना मिळावा आणि त्यातून महिलांच्या उद्योजकतेला प्रोत्साहन मिळावे यासाठी विशेष धोरण राबविण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. राज्याने लागू केलेल्या अशा प्रकारच्या धोरणाची देशात प्रथमच अंमलबजावणी होत असून, या माध्यमातून राज्याने महिलांना नावीन्यपूर्ण संधी उपलब्ध करून दिली आहे.

### नोकरीतील विरामानंतरही महिलांना अमाप संधी

# ब्रेक नंतरचे करिअर



**उद्योग असो वा व्यवसाय, महिलांना त्यांच्या आयुष्यात एकदा तरी कामातून अल्पविराम घ्यावाच लागतो. बाळंतपण, बालसंगोपन, पतीची बदली, आरोग्याच्या समस्या किंवा काही वेळा कामाच्या ठिकाणी असणाऱ्या त्रासामुळे महिला कामावरून सुटी घेतात. ब्रेक घेणे कठीण नसले तरी यानंतर पुन्हा कामावर जाणे कठीण होऊन बसते. जवळपास ४० टक्के महिलांना या ब्रेकनंतर पुन्हा कामावर परतताच येत नाही. अशा परिस्थितीत खचून न जाता महिलांनी ब्रेकला संधी समजून कामाला लागायला हवे. टाटा टेक्नॉलॉजी, इन्फोसिस आणि काही स्टार्टअप्स महिलांना खास ब्रेकनंतरचे करिअर ऑफर करतात. महिलांनी याचा फायदा घेतला पाहिजे, तर कंपन्यांनीही अशा महिलांसाठी लवचिक कामाच्या वेळा असणाऱ्या नोकऱ्या उपलब्ध करून दिल्या पाहिजेत.**

**- जीवन मुळे**

दरवर्षी ८ मार्चला आंतरराष्ट्रीय महिला दिन जगभरात साजरा केला जातो. महिलांचा सर्व क्षेत्रांत समान सहभाग आणि आर्थिक स्वावलंबन याबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने एखादा विषय (थीम) ठरवून त्यावर त्या दिवशी जगभर विचारमंथन व सजगता निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. यंदाची 'थीम' आहे - 'काउंट हर इन : एक्सेलरेटिंग जेंडर इक्वॅलिटी थ्रू इकॉनॉमिक एम्पॉवरमेंट'. विशेष म्हणजे यंदाच्या आपल्या केंद्रीय अर्थसंकल्पातही महिलांचे सक्षमीकरण, लिंग-समानता आणि स्वावलंबन (आर्थिक स्वयंपूर्णता) याबाबतची उद्दिष्टे स्पष्ट करण्यात आली आहेत. तसेच महिला उद्योजकांना कौशल्य विकासासाठी प्रशिक्षणही दिले जाणार आहे.

एकविसाव्या शतकात असे कोणतेही कार्यक्षेत्र नाही, की जेथे महिलांचा सहभाग नाही. उद्योजकता असो किंवा नोकरी, प्रत्येक कार्यक्षेत्रात महिला उत्तम कामगिरी करताना दिसतात, तरीही महिलांचे प्रथम प्राधान्य नोकरीला असल्याचे जाणवते. खरं म्हणजे महिलांच्या गुणांना आणि क्षमतांना उद्योग-व्यवसायात अधिक संधी आहेत. महिलांनी उद्योग-व्यवसायातही अधिक संख्येने सहभागी होऊन आत्मनिर्भर व्हावे.

मात्र, करिअर नोकरी असो वा उद्योग, संपूर्ण कारकीर्दीमध्ये महिलांना काही काळासाठी 'करिअरमध्ये ब्रेक' घ्यावा लागतो. नोकरी करत असताना, व्यावसायिक कामासंबंधात महत्त्वाचे निर्णय घ्यावे लागतात, तसेच काही महत्त्वाचे निर्णय स्वतःसंबंधातही घ्यावे लागतात. त्यापैकीच एक निर्णय म्हणजे काही काळासाठी नोकरीतून 'करिअर ब्रेक' घेणे. जवळपास सर्वच महिलांना आपल्या करिअरमध्ये कधी ना कधी असा ब्रेक घेणे आवश्यक ठरते. ब्रेक घेणे फारसं अवघड नसते; परंतु अवघड असते ते ब्रेकनंतर पुनरागमन करणे अर्थात पुन्हा तेवढ्याच तोलामोलाची, सन्मानाची नोकरी मिळवणे. परिणामी फार मोठ्या प्रमाणावर (४० टक्क्यांवर) महिलांना आपले करिअर अर्ध्यावरच सोडावे लागते.

**कारणे :** महिलांना विविध कारणांमुळे काही महीने / वर्षासाठी 'गॅप/ब्रेक' घ्यावा लागतो. त्यापैकी काही कारणे पुढीलप्रमाणे -

**अ) कौटुंबिक कारणांसाठी :** १) बालसंगोपन, २) पतीची बदली, ३) कुटुंबातील ज्येष्ठ व्यक्तींची काळजी घेण्यासाठी, ४) घरच्यांचा नोकरी/व्यवसाय करण्यास विरोध असल्यामुळे.

**ब) वैयक्तिक कारणांसाठी :** १) वैयक्तिक प्रकृती अस्वास्थ्य, २) छंद जोपासना

**क) करिअर विकासासाठी :** १) स्व-करिअर विकासासाठी ज्ञान, कौशल्य आणि दृष्टिकोनाबाबत अधिक सक्षम आणि समृद्ध होणे. २) इतर क्षेत्रांत कार्यानुभव घेणे.

**ड) कार्यस्थळ, कार्यपद्धत समस्या :** १) समान कामासाठी असमान पगार २) लिंगभेद आधारित असमानता ३) वर्क-लाईफ बॅलन्स करणे अवघड ४) कामातील असह्य ताण.

एकविसाव्या शतकातील महत्त्वाच्या आणि प्रगतीशील पाऊलखुणांपैकी एक म्हणजे कार्य जगतातील (वर्ल्ड ऑफ वर्क) महिलांचा वाढता सक्रीय व प्रभावी सहभाग होय. विविध कार्यक्षेत्रातील उच्च पदांच्या जबाबदाऱ्या महिला कुशलतेने आणि समर्थपणे सांभाळतात. त्यातही लक्षणीय बाब म्हणजे एकीकडे कुटुंब आणि दुसरीकडे करिअर यांचे उत्तम संतुलन साधण्याची हातोटी आजच्या नोकरदार/ 'करिअरिस्ट'महिलांनी आत्मसात केली आहे. मात्र ही तारेवरची कसरत करताना त्यांचे वैयक्तिक करिअर विकासाकडे दुर्लक्ष होताना दिसते. आपल्या जीवनात व्यावसायिक विकासाएवढेच महत्त्व आपल्या वैयक्तिक विकासाला देणे आवश्यक आहे.

जेव्हा महिला करिअर ब्रेकनंतर कार्यक्षेत्रात पुनरागमन करण्यासाठी प्रयत्न करतात, तेव्हा पावलोपावली त्यांना या दुर्लक्षाची प्रचिती आणि अडथळे जाणवतात. स्वतःचा व्यक्तिमत्व विकास आणि करिअर विकास याकडे महिलांनी लक्षदेण्यासाठी 'करिअर ब्रेक' ही संधी समजून योग्य पद्धतीने त्याचा उपयोग केला पाहिजे.

**संधी :** विविध कारणांमुळे 'करिअर ब्रेक' घ्यावा लागलेल्या, परंतु आता पुन्हा करिअर सुरू करण्यास इच्छूक असलेल्या महिलांसाठी अनेक संस्थाही प्रयत्न करीत आहेत. महिलांची ही समस्या सोडवण्यासाठी प्रशिक्षण, आदी योजना अंमलात आणत आहेत. पुण्याची 'टाटा टेक्नॉलॉजीज', इतर उद्योग संस्था, स्टार्टअप्स, वित्त आस्थापना, आदी या कामी पुढाकार घेत आहेत, ही आनंदाची गोष्ट आहे. करिअर ब्रेकमुळे आत्मविश्वासाचा अभाव जाणवणा-या अभियंता (इंजिनीअर) महिलांमध्ये चैतन्यनिर्मिती होण्यासाठी 'Reignite' हा टाटा टेक्नॉलॉजीज कंपनीचा उपक्रम निश्चितच उपयुक्त ठरू शकतो. कुशल महिलाची कारकीर्द अर्ध्यावरच थांबू नये म्हणून 'अप-स्किलिंग, रि-स्किलिंग, इत्यादी विविध प्रशिक्षणाद्वारे अद्ययावत कुशलता, बदललेले स्किलसेट्स प्रदान करण्याचे आणि त्याद्वारे नव्या संधी निर्माण करण्याचे प्रयत्न कौतुकास्पद आहेत, हे नक्की.

नवीन कौशल्ये शिकण्याच्या या सुसंधीचा संबंधित महिलांनी योग्य उपयोग केला तर त्यांचे करिअरमध्ये पुनरागमन सुलभतेने होण्याची शक्यता वाढते. योग्य नियोजनामुळे ही प्रक्रिया अधिक सुखकर होऊ शकते. त्याचबरोबर बदलांना आपलंसं करण्याची क्षमताही विकसित करण्यास मदत करू शकते. अधिक माहितीसाठी महिलांनी याबाबत संबंधित संस्थांकडे चौकशी करावी.

**आव्हाने :** आजच्या घडीला महिलांसाठी 'करिअर ब्रेक' हे एक मोठे आणि महत्त्वाचे आव्हान आहे. त्यातून मार्ग शोधणे क्रमप्राप्त असते. जीवनात ही एक कसोटीच असते. पद, वेतन, इत्यादीबाबत तडजोड करण्याची तयारी ठेवावी लागते. खऱ्या अर्थाने हा जीवनातील 'टर्निंग पॉइंट' मानला जातो. अशा स्थितीत निराश होण्याऐवजी नव्याने कार्यक्षेत्रात पदार्पण करण्यासाठी आवश्यक कौशल्ये, क्षमता, ज्ञान प्राप्त करण्याकडे अधिक लक्ष द्या. आपला 'रेझ्युमे' अधिक प्रभावी, ताकदवान करण्याचा प्रयत्न करा.

मातृत्व लाभलेल्या नोकरदार महिला पूर्ण क्षमतेने आणि पूर्ण वेळ, अपेक्षित कार्यक्षमतेने काम करू शकणार नाहीत, या चुकीची धारणा, गैरसमजामुळे, एम्प्लॉयर त्यांना नव्याने नोकरीची संधी देण्यास उत्सुक नसतात. नोकरी दिलीचं, तर तुलनेने कमी महत्त्वाचे पद, जबाबदारी सोपविली जाते, आशा संस्थांनीही याबाबत आपल्या धोरणात, दृष्टिकोनात सकारात्मकता, सह-अनुभूती (Empathy), सहृदयता ठेवली पाहिजे.

**काय करावे : (Do's)**

१. महिलांनी करिअरमध्ये पुनरागमन करण्यासाठी आत्ताच्या स्थितीत आवश्यक असलेली कौशल्ये, ज्ञान आणि क्षमता आत्मसात कराव्यात. त्यासाठी स्व-क्षेत्रातील घडत असलेल्या बदलांबाबत जागरूक आणि अद्यावत राहणे आवश्यक आहे. २. नव्या संधीचा मागोवा घेत राहा.

३. एकविसाव्या शतकातही, करिअर ब्रेक घेतला म्हणून स्वतःला अपराधी मानणाऱ्या महिलांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. महिलांनी या अपराधीपणाच्या भावनेतून बाहेर येणे गरजेचे आहे. तेव्हाच त्या प्राप्त परिस्थितीतून योग्य मार्ग काढू शकतील. असं करण्यातच त्यांचे आणि कुटुंबाचे हित आहे. ४. अप-स्किलिंग, रि-स्किलिंग, स्किल अपग्रेडेशन या क्रिया बदलत्या स्किलसेटनुसार गरजेच्या ठरू शकतात. करिअर ब्रेक दरम्यान शक्य होईल तेव्हा याबाबत उचित कार्यवाही करावी. अन्यथा 'स्किल डिफिशीयन्सी' हे पुनरागमन नाकारण्याचे कारण बनू शकते.

**Don'ts**

१) करिअरमध्ये ब्रेक घ्यावा लागला म्हणून खंत बाळगू नका. त्यासाठी स्वतःला दोष देऊ नका. २) पगार, पद यांना वाजवीपेक्षा जास्त महत्त्व देऊ नका. ३) दुसऱ्यांदा करिअर सुरू करताना काही वेळेस नकार मिळू शकतो. त्याबद्दल वाईट वाटून घेऊ नका. हा सार्वत्रिक अनुभव असतो.

**सेकंड इनिंगसाठी उद्योजकता हा उत्तम पर्याय :** एकविसाव्या शतकात प्रत्येक कार्यक्षेत्रात महिलांचा सहभाग वाढला आहे. महिला उद्योजकांची संख्याही वाढते आहे. महिला स्वावलंबी होण्यासाठी विशेष प्रयत्नशील आहेत. महिला उद्योजकतेत २८ टक्के वाढ झाली आहे. अजूनही ही टक्केवारी वाढणे आवश्यक आहे. शासनातर्फे महिला उद्योजकांना ३० कोटी रुपयांची कर्जे दिली आहेत.नोकरदार महिला अनुभवाच्या आधारे उद्योजकतेच्या क्षेत्रात अधिक लवकर यशस्वी होऊ शकतात.

करिअर ब्रेक घेतलेल्या महिलांना उत्तम कार्यानुभव असतो. व्यावसायिकता आणि व्यावहारिकता बाबतचे कौशल्य असते. शिवाय महिलांमध्ये उद्योजकतेला पोषक असलेले अनेक गुण जन्मजात असतात. त्यामुळे नव्याने सुरुवात करताना नोकरी मागण्यापेक्षा नोकरी देणारे व्हावे. महिला उद्योजिका स्वतः स्वयंरोजगार मिळवतातच, शिवाय अनेक महिलांना रोजगार उपलब्ध करून देऊ शकतात. परिणामी त्या स्वतः बरोबरच इतर महिलांचीही प्रगती करू शकतात.शासनाने महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी अनेक योजना तयार केल्या आहेत. त्यांची माहिती/लाभ घेण्यासाठी 'महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (MCED), जिल्हा उद्योग केंद्र यांचेशी संपर्क साधावा.

**अपेक्षा :** करिअर ब्रेक घेणा-या महिलांना दुसरी संधी मिळवणे खूपच अवघड असते.यासाठी कंपन्या, कार्यकारी संस्थांनी सहकार्य करावे. लवचिक वेळापत्रकाची सुविधा प्राधान्याने महिला अधिकारी-कर्मचारी यांना उपलब्ध करण्यात पुढाकार घ्यावा. तसेच मुलांची देखभाल सुलभतेने होण्यासाठी पाळणाघर वा तत्सम सुविधा निर्माण करण्यात स्वारस्य दाखवावे. महिलांना त्यांच्या गरजेप्रमाणे अर्धवेळ/पूर्णवेळ कार्य करण्याच्या सोयी उपलब्ध कराव्यात. तसेच 'स्किल अपग्रेडेशन'सारखे प्रोग्राम जास्तीत जास्त उद्योग संस्थांनी आयोजित करावेत. कारण महिलांची कार्यबळातील (वर्क फोर्स) टक्केवारी अजूनही जेमतेम ४० टक्क्यांच्या आसपास आहे. त्यातही करिअर ब्रेक नंतर पुनरागमन करणाऱ्या महिलांचे अत्यल्प प्रमाण विचारात घेता, महिलांना पुन्हा करिअर साठी प्रोत्साहन देण्याची आणि सक्षम करण्याची नितांत गरज आहे. महिलांनीही यादृष्टीने सकारात्मक मानसिकता आणि प्रयत्न करावेत. त्यांना यश निश्चित मिळेल. शुभास्ते पंथान संतु. महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा.

*(या लेखाच्या लेखकांनी लिहिलेली उद्योजकता, व्यवस्थापन यासह इतर विषयांवरील एकूण १० पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. लेखक शासकीय तंत्रनिकेतनचे माजी प्राचार्य आहेत. त्यांचा मो. क्र. ९८२३२३९३४० असून ई-मेल jeevanmuley@gmail.com आहे.)*



### नोकरी, व्यवसाय, उद्योगात मोठी संधी

# महिलांची आकाशाला गवसणी

**महिला केवळ पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून चालत नाही आहेत तर त्यांच्यापेक्षा दोन पावले पुढेही पोहोचल्या आहेत. देशाच्या तिजोरीच्या चाव्या असणाऱ्या अर्थमंत्री निर्मला सीतारामन असोत की चांद्रयान मोहिमेतील महिला शास्त्रज्ञ, प्रत्येक क्षेत्रात महिलांनी स्वतःची ओळख निर्माण केली आहे. प्रामाणिकता, जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर महिला प्रत्येक क्षेत्रात स्वतःला सिद्ध करत आहेत. गगनाला गवसणी घालत आहेत. आज नोकरी, उद्योग, व्यवसाय, राजकरण, समाजकारण अशा अनेक क्षेत्रांत महिलांना मोठी संधी आहे. त्याचे सोने करण्याची गरज आहे.**

**- अक्षय निकम**

'चांद्रयान ३' ने गतवर्षी चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर यशस्वी लँडिंग करत जागतिक स्तरावर भारताचे नाव उज्ज्वल केले. सर्व शास्त्रज्ञावर कौतुकाचा वर्षाव झाला; पण त्यातही एक 'उल्लेखनीय गोष्ट म्हणजे या मोहिमेत महिला शास्त्रज्ञांनी बजावलेली भूमिका त्यातही स्पेस रॉकेट लेडी' म्हणून ओळखली जाणाऱ्या टेसी थॉमस याही महिलाच...

एकंदरीतच स्वतःचे घर सांभाळणाऱ्या गृहिणीपासून ते देश सांभाळणाऱ्या राष्ट्रपतीपर्यंत पण आता एवढेच नाही तर अवकाशात प्रवास करणाऱ्यापासून ते एखाद्या अतिदूर ग्रहांवर यशस्वी लँडर लाँच करण्यापर्यंतही आज स्त्रियाच आघाडीवर दिसतात. आज अगदी उद्योगक्षेत्रातही मग त्या मागे शहरातील का नक्कीच नाही?

जुन्या पिढीच्या उद्योजिका सुधा मुर्तीपासून ते नव्या पिढीच्या उद्योजिका 'बायोकॅन'च्या किरण मुजुमदार शॉ ते आजकालच्या युवा उद्योजकांपर्यंत ते नवीन युगाच्या तरुण पिढीपर्यंतही त्यातही नव्या दमाच्या मुलीसोबत.

आज महिलांना उद्योग क्षेत्रात नव्या क्षेत्रात संधी आहेतच. पण अनेक नवेनवे क्षेत्रे आज महिलांना खुणावताहेत.

आज विज्ञान तंत्रज्ञान अनेक नवनवे तंत्रज्ञान आणत आहे. दररोज वेगाने होत असणारे बदल मानवी जीवन आणखी सुखकर व सोपे बनवत आहे. स्त्रीला 'अन्नपूर्णा' म्हणतात, जसे जेवणात अन्नाला चव येण्यासाठी मीठ लागते. तसेच आज किचनमध्ये स्त्रीशिवाय पर्याय नसतो. अगदी या अंदाजला धरून पाहिले तर आजची स्त्री शक्ती ही 'आहार' या क्षेत्रातही उद्योग करू शकते.

आपणास विविध पदार्थ बनवण्याची सवय असेल तर निश्चितच आपण एखादे 'कुकिंग कोर्स' वा 'डिप्लोमा' करून निश्चितच खानावळीपासून हॉटेलपर्यंत विविध पर्याय वापरू शकतो. आज अनेक महिला व युवतीही फुड 'केटरिंग'चा पर्याय वापरताहेत.

आज घरातील कोणतेही काम स्त्री करतेच पण त्याहीपेक्षा महत्त्वाचे मोठ्या कार्यक्रमात आयोजनापासून नियोजनापर्यंत स्त्रिशिवाय ते काम होतच नाही. अगदी त्याप्रमाणे आज गावागावांत बचतगट तयार झालेत. पूर्वी बचत गट म्हणजे ठराविक रक्कम दरमहा गोळा करणे व वर्षानंतर पुन्हा ती वाटप करणे असे होते. पण आज त्याच बचत गटाच्या माध्यमातून महिला, वेगवेगळ्या प्रकारचे छोटे पण आवश्यक असे रोजगाराचे पर्याय बचत गटातील महिलांना उपलब्ध करून देताहेत. आज बचत गटातून छोट्या मोठ्या उद्योगांच्या उलाढालीतूनच अनेक नवे

स्वयंरोजगाराचे पर्याय स्त्रियांना स्वतःच्या पायावर सक्षम उभेर ाहण्यास मदत करताहेत.

एकंदरीतच बचत गटाच्या माध्यमातून अनेक गावात अनेक महिला लघु उद्योजिका रोजगार देणाऱ्या म्हणून ओळखल्या जाताहेत, तसे पाहायला गेले तर पुरुष वर्गासारखी स्त्री वर्गालाही नृत्याची विशेष आवड असते. मग अशावेळेस आपण पारंपारिक नृत्याबरोबर एखादे पाश्चिमात्य नृत्य जर सर्टिफिकेट कोर्स सोबत शिकलो तर आपण आपल्या लोकल लेवलला डान्स क्लासेस सुरू करू शकतो. तसेच आज आबालवृद्धामध्ये 'झुंबा' डान्सेसची क्रेझ आहे. त्याच क्रेझचा आपण उपयोग क५न त्याचे सेशन्स घेऊ शकतो. एकंदरीत पारंपरिक असो वा ट्रेडिशनल किंवा हटके असो वा ट्रेंडी डान्सचा पर्याय निश्चितच तुम्हाला 'बिझनेस'चा चान्स देऊ शकतो.

आज अनेक स्त्रियांना शिक्षणाची आवड आहे. मग अशावेळेस सध्याच्या जगात आवश्यक असलेले एखादे शिक्षणविषयक कोर्सचा डिप्लोमा करून त्याचे स्वतःचे क्लासेस सुरू करता येतात. आता हेच पहा ना, तुम्ही बी.एस्सी वा एम.एस्सी. डिग्री होल्डर असाल तर निश्चितच तुम्ही घरबसल्या शाळा स्तरावरील विज्ञान गणित विषयाचे क्लासेस घेऊ शकता. ज्ञानार्जनाबरोबर घरबसल्या अर्थार्जनाचा याहून सुंदर पर्याय कोणता?

तसे पाहता आज अगदी घरातीलच नव्हे तर सर्वच क्षेत्रांत स्त्रिया स्वतःच्या पायावर हिमतीने उभ्या राहताहेत, असे कोणतेही क्षेत्र नाही की जिथे स्त्रिया नाहीत आज सर्वच क्षेत्रात स्त्रिया आघाडीवर दिसताहेत व त्या स्वतःच्या ठिकाणी आपली ओळख निर्माण करताहेत.




*छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे नुतन जिल्हाधिकारी मा.श्री.दिलीप स्वामी, भा.प्र.से. यांचे स्वागत करताना डावीकडून श्री.संतोष बोर्डे, व्यवस्थापकीय संपादक, उद्योजक मासिक; श्री.डी.यू.थावरे, आस्थापना विभाग प्रमुख तथा विभागीय अधिकारी, एमसीईडी, छत्रपती संभाजीनगर; श्री. प्रमोद लांडे, उपसंचालक, उद्योग सहसंचालक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर व श्री. विनोद तुपे, जिल्हा प्रकल्प समन्वयक, एमसीईडी, जालना दिसत आहेत.*

आज स्त्री वर्गाला गायनाचा छंद असतो. मग अशावेळेस आपणाकडे गोड गळ्याची दैवी देणगी असेल तर निश्चितच आपण गटाच्या माध्यमातून तीन चार स्त्रियांचा गट करून गायनाचे वर्ग वा कार्यक्रम ॲरेंज करू शकतो. तसेच आज अनेक लहान छोटे मोठे स्वयंरोजगारासाठीचे प्रशिक्षण कार्यक्रम, लहान मोठे छोटे घरच्या घरी करता येण्यासारखे लघु उद्योगातील अनेक पर्याय उपलब्ध आहेत, तरी या पर्यायातील आपल्याला सहज जमणारा व येऊ शकणारा आपण एखादा पर्याय निवडला तर निश्चितच आपण स्वतःसाठी आर्थिक साक्षरतेचे व आर्थिक नियोजनाचे एक माध्यम तयार करू शकतो.

आज अगदी जावळापासून ते लग्नाचा, मुलाचा पहिला वाढदिवस असो वा लहान मोठे रिसेप्शनचे कार्यक्रम या कार्यक्रमात छाप पाडणारी गोष्ट म्हणजे तुमचे स्वतःचे सेल्फ प्रेझेन्टेशन... मग अशावेळेस ब्युटीपार्लरचा कोर्स केला असेल तर स्वतः बरोबरच आपण इतरांना 'सेल्फ प्रेझेन्टेशन' बद्दल माहिती देऊन त्याचे रूपांतर छोट्या व्यवसायात करू शकतो. तसेही वर्षभर विविध कार्यक्रमांची रेलचेल असतेच मग थोडा 'नट्टापट्टा' करायला काय हरकत आहे. आखिर जो दिखता है वो ही तो बिकता है।

आज अनेक स्त्रिया पार्टटाईम जाब करतात, त्यातही त्या लघुउद्योजिकाच म्हणाव्या तसे आज वेगाने बदलणाऱ्या विज्ञान तंत्रज्ञानामुळे नवेनवे बदल गरजा निर्माण होताहेत व यातूनच उद्योगाची व्यवसायाची नवनवीन क्षेत्रे निर्माण होताहेत, ज्यात स्त्रियांना उद्योग व्यवसाय करण्यास भरपूर वावर आहे.

तेव्हा निश्चितच जी स्त्री पूर्वी घर सांभाळत होती तीच स्त्री आता देश सांभाळते. येणाऱ्या काळात तीच स्त्री जगाचा डोलारा निश्चितच सांभाळेल यात शंका नाही.

तस पाहायलागेले तर दरवर्षी ८ मार्च हा जागतिक महिला दिन म्हणून साजरा करतात. पण हा दिवस केवळ एका दिवसापुरता मर्यादित न राहता तो वर्षभर साजरा केला पाहिजे. तसे पाहायला गेले तर नोकरदार वर्गाला एक दिवस सुटी असतेच जगात 'स्त्री' असा एकमेव पेशा आहे जो २४ तास कार्यरत असतो. ज्याला कधीच सुटी नसते, तरीही आज ती कार्यरत आहे व उद्याही असते म्हणून तिला 'आदिशक्ती' म्हातात.

पूर्वीच्या काळी एक स्त्री शिकली की कुटुंब शिकले असे म्हणायचे पण आता काळ बदलला, 'चूल मुल' संकल्पना मागे पडली. आजच्या नव्या युगात 'एक स्त्री उद्योजक झाली तर ती असंख्य उद्योजिकांना जन्म देते' असे म्हटले तर वावगे ठरणार नाही, क्योंकि वो स्त्री है कुछ भी कर सकती है।

*(या लेखाच्या लेखकाचे लेख नियतकालिकांतून प्रकाशित होत असतात. त्यांचा भ्रमणध्वनी ७७०९७०३९६२ आहे.)*

■■



विदर्भ-मराठवाड्यातील सवलतीचा 'पॅटर्न' अन्यत्रही राबविणार

# मागास भागात उद्योगांना सवलतीत वीजपुरवठा

**राज्यातील अन्य भागांच्या तुलनेत विदर्भ आणि मराठवाडा विभागात उद्योगांची वाणवा आहे. येथे उद्योगांना चालना देण्यासाठी शासन सवलतीत वीजपुरवठा करते. सवलतीच्या दरातील वीज पुरवठ्याचा हाच पॅटर्न आता राज्याच्या अन्य भागांतही राबविण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. मात्र, त्याचा लाभ घेण्यासाठी हे उद्योग मराठवाडा-विदर्भासारख्या मागास भागात उभारण्याची अट असेल. त्यामुळे उद्योगांच्या उभारणीत भौगोलिक समतोल राखला जाईल. आपल्या घराजवळ रोजगार निर्माण झाल्याने स्थलांतरही थांबेल, असा शासनाचा कयास आहे.**

**- प्रतिनिधी**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या प्रांगणात खासदार औद्योगिक महोत्सव अर्थात ॲडव्हाँटेज विदर्भ या तीन दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या निमित्ताने विदर्भातील उद्योगांचे प्रदर्शन तसेच उद्योजकांचे संमेलन ठेवण्यात आले होते. याच्या उद्घाटन समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हे सूतोवाच केले. कार्यक्रमाला केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, केंद्रीय एमएसएमई मंत्री नारायण राणे, सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार, गडचिरोलीचे खासदार अशोक नेते, खासदार अनिल बोंडे, माजी केंद्रीय मंत्री खासदार प्रफुल्ल पटेल आदी मान्यवर उपस्थित होते.

## मराठवाडा-विदर्भ पॅटर्न राज्यभर

देवेंद्र फडणवीस म्हणाले, उद्योग-व्यवसायामध्ये सर्वाधिक अखंडीत वीजपुरवठा महत्त्वाचा असून अन्य राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात उद्योग-व्यवसाय उभारताना यामध्ये सवलत मिळण्याची उद्योजकांची मागणी योग्य आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात या संदर्भातील एक पॅटर्न सरकार तयार करीत आहे. याचा फायदा उद्योग समूहांना होईल. मात्र, मराठवाडा-विदर्भ यासारख्या मागास भागात उभारल्या जाणाऱ्या उद्योगांनाच या पॅटर्नचा लाभ होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## पायाभूत सुविधांचा उद्योगांना लाभ

फडणवीस पुढे म्हणाले, कोणताही उद्योग उभारण्यासाठी वीज, पाणी, मध्यवर्ती ठिकाण व अन्य पायाभूत सुविधांची गरज असते. केंद्रीय रस्ते, महामार्ग व दळणवळण मंत्री नितीन गडकरी यांच्या माध्यमातून विदर्भातील रस्त्यांचे जाळे मजबूत व दीर्घकाळासाठी उत्तम झाले आहे. समृद्धी महामार्गामुळे एक वातावरण निर्मिती झाली आहे. त्यामुळे औद्योगिक क्षेत्रामध्ये आवश्यक असणारी पुरवठा साखळी विदर्भात निर्माण झाली आहे. मोठे लॉजिस्टिक क्लस्टर नागपूरमध्ये निर्माण होत आहेत. लॉजिस्टिक कॅपिटल म्हणून नागपूरला जगामध्ये पुढे आणायचे आहे.

## नागपूर-गोवा शक्तीपीठ

समृद्धी महामार्गाचा विस्तार गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूरकडे होणार आहे. नागपूरपासून मुंबईप्रमाणे गोवा महामार्ग आम्ही तयार करीत आहोत. त्याला शक्तीपीठ महामार्ग संबोधले जाईल. नागपूरचे नवीन विमानतळ जागतिक मानांकनाचे असेल,

याकडे आम्ही लक्ष वेधले आहे. सोबतच अमरावती, अकोला विमानतळाला अद्ययावत करणार आहोत. गडचिरोलीमध्येही विमानतळ तयार होत आहे. चंद्रपूरचेही विमानतळ लवकरच पूर्णत्वास घेऊन जाऊ. त्यामुळे रस्ते, लोहमार्ग व विमान मार्गाने नागपूर व विदर्भ प्रत्येक प्रदेशाशी जोडला जाईल, असे त्यांनी सांगितले.

### गडचिरोली पोलाद हब

गडचिरोली जिल्ह्यामध्ये लोह उद्योगाचा पाया रचला असून, या ठिकाणी उत्तम भविष्य दिसून येत आहे. मुख्यमंत्री असताना सुरू केलेला लोह उद्योग आता विस्तारित होत असून लवकरच गडचिरोली पोलाद उद्योगाचे हब होईल, याची खात्री आहे. केवळ नागपूर नव्हे तर संपूर्ण विदर्भातील सर्व जिल्हे विकसित व्हावेत व त्या दृष्टीचे नियोजन, क्लस्टर निर्मितीला प्राधान्य देत आहोत. याशिवाय कोळशावर तयार होणाऱ्या गॅसपासून (कोल गॅसिफिकेशन) घरगुती वापराच्या गॅस निर्मिती संदर्भात चंद्रपूरमध्ये काही प्रयोग यशस्वी होण्याची शक्यता आहे. यातून मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होणार आहे. भांडवल, पायाभूत सुविधा यासोबतच मनुष्यबळाची आवश्यकताही महत्त्वपूर्ण ठरते. त्यामुळे नागपूरमध्ये मनुष्यबळ कौशल्ययुक्त व्हावे यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. संरक्षण, पर्यटन या क्षेत्रांतही मोठे उद्योग उभारण्याची विदर्भात संधी आहे. स्टार्टअप इकोसिस्टीम डेव्हलप करण्याचेही आमचे प्रयत्न सुरू असल्याचे फडणवीस म्हणाले.

### नागपूर होणार गुंतवणुकीचे हब - नितीन गडकरी

नितीन गडकरी म्हणाले, विदर्भात अधिकाधिक पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. गडचिरोलीपासून वाशिम आणि बुलडाण्यापासून गडचिरोलीपर्यंत चांगले रस्ते तयार केले आहेत. पाणी, वीज, पायाभूत सुविधा, विस्तीर्ण रस्ते, तंत्रज्ञान यासह केंद्रातून कोणतीही मदत लागल्यास मी तत्पर आहे. राज्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तयार आहेत. सोबतीला राज्याचे माजी मंत्री तसेच केंद्रीय सूक्ष्म-लघु-मध्यम मंत्री नारायण राणे आहेत. त्यामुळे आता विदर्भाचा विकास झाला पाहिजे. गुंतवणूकदारांनी आरोग्य, अभियांत्रिकी, औषधी, पर्यटन, हॉटेल व्यवसाय व अन्य लॉजिस्टिकसारख्या मोठ्या क्षेत्रात गुंतवणुकीसाठी पुढे यावे असे आवाहन त्यांनी केले.



*श्री. देवेंद्र कटके, उपजिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांना उद्योजक मासिक भेट देताना सौ. मनिषा पांडे, मालमत्ता विभाग, एमसीईडी व श्री. विजय मगर, एमसीईडी, आस्थापना विभाग, छत्रपती संभाजीनगर दिसत आहेत.*

### विदर्भाचा सुवर्णकाळ - नारायण राणे

केंद्रीय मंत्री नारायण राणे म्हणाले, गडकरी, फडणवीस यांच्याकडे विदर्भाचा पूर्ण अभ्यास आहे. कुठे काय निर्माण होऊ शकते, कोणत्या जिल्ह्याला कोणता उद्योग उपयोगी पडू शकते, यशस्वी होऊ शकते, याची माहिती असणारे हे नेतृत्व आहे. त्यामुळे विदर्भाच्या विकासाचा हा सुवर्णकाळ आहे.

### विदर्भात गुंतवणुकीसाठी पुढे या - सुधीर मुनगंटीवार

सुधीर मुनगंटीवार म्हणाले, विदर्भात वन, पाणी, वीज, जागा उपलब्ध आहे. उद्योगांना काय सुविधा हवी ते सांगा. आम्ही सगळे तत्पर आहोत. ज्यांच्या कर्तृत्वाला अवघ्या भारताने सलाम केला असे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी या ठिकाणी मदतीला तयार आहेत. त्यांनी ज्या कामाला हात लावला त्याचे सोने होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारतामध्ये, महाराष्ट्राच्या ट्रिलियन डॉलरच्या इकॉनॉमीमध्ये विदर्भ दिसायला पाहिजे. यासाठी सर्व उद्योजकांनी पुढे येण्याचे आवाहनही त्यांनी केले.

### शेतकऱ्यांचा माल थेट ॲमेझॉन, फ्लिपकार्टला

मुंबईत झालेल्या एका अन्य कार्यक्रमात देवेंद्र फडणवीस, कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्या उपस्थितीत ग्राम सामाजिक परिवर्तन फाउंडेशन आणि ओएनडीसी यांच्यात सामंजस्य करार झाला. शेतकऱ्यांची उत्पादने डिजिटल प्लॅटफॉर्मवर आणून त्यास बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी हा करार करण्यात आला. या करारामुळे शेतकरी आपला कृषिमाल आता थेट ॲमेझॉन, बिग बास्केट, फ्लिपकार्ट सारख्या आंतरराष्ट्रीय कंपन्यांना विकू शकतील.

याप्रसंगी फडणवीस म्हणाले, राज्य सरकारने कृषी मूल्य साखळीचा दुसरा टप्पा आता प्रारंभ केला आहे. सबसिडीतून, नुकसानभरपाईतून शेतीचे क्षेत्र बाहेर काढण्यासाठी विविध उपाययोजना केल्या जात आहेत. २०१४-१९ या काळात शेती क्षेत्रात मोठी गुंतवणूक करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यातून नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना, स्मार्ट यासारख्या योजनांची आखणी झाली. वातावरणपूरक शेती हाही प्रयत्न झाला. शेतकऱ्यांना थेट बाजाराशी जोडण्याचा निर्णय झाला. त्यासाठीच कृषी मूल्य साखळीच्या उपाययोजना प्रारंभ करण्यात आल्या. ■ ■




### केंद्रीय अर्थसंकल्प

# केंद्रीय अर्थसंकल्प आणि विकासाची नांदी

**स्वयंरोजगारास या अर्थसंकल्पामध्ये भरभरून तरतूद ठेवण्यात आलेली आहे. देशांतर्गत उद्योगांना चालना देण्यासाठी साधारणपणे १९११ कोटी रुपये निधी ठेवलेला असून हा कितीतरी पटीने मागच्या अर्थसंकल्पापेक्षा जास्त आहे. भारत देशाची अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन डॉलर करण्यासाठी वंचित व मध्यमवर्ग यांना बरोबर घेऊन त्यांची आर्थिक परिस्थिती सुदृढ करून त्यांना विकासाच्या या प्रवाहामध्ये आणणे गरजेचे आहे. त्यामुळे हा अर्थसंकल्प सर्वसमावेशक विकसनशील असाच आहे याविषयी. - डॉ. डी.एस.काटे**

काय महाग? काय स्वस्त? ही रुढी सद्यःस्थितीत अर्थसंकल्पातून बाद होत आहे. मध्यमवर्ग त्याचबरोबर व्यापारी, गरीब वर्गांचे डोळे अर्थसंकल्पाकडे लागून राहायचे की, आपल्यासाठी काय सुविधा मिळतील, काय सूट मिळेल ही मोठी उत्सुकता असायची! पण आता जागतिकीकरण त्याचबरोबर वाढत गेलेले व्यापारीकरण/पैशाचा अमाप विनियोग यामुळे अर्थातच उत्सुकतेने अर्थसंकल्प पार पाडले जात नाही. याचबरोबर जगातील सर्व अर्थव्यवस्थेला भुरळ पडेल अशी वस्तू व सेवा कर प्रणाली आपल्या देशात यशस्वीपणे राबवली जात आहे. वस्तू व सेवा कराद्वारे दर व तक्ते कायम कमी-जास्त केले जातात किंवा सुधारणा केल्या जातात. अर्थसंकल्पाच्या अगोदरच ही कारवाई होते.

यावर्षीचा अर्थसंकल हा अंतिम आहे. त्यामुळे विशेष अशा अपेक्षा नागरिकांना नव्हत्या; पण एकंदरीत हे सरकार पुढे आले, तर सरकारची ध्येयधोरणे कशी असतील यानुसार हा अर्थसंकल्प मांडला गेला आहे. विशेषतः सामान्यवर्गाकडे व गरिबांना सेवा-सुविधा देण्याकडे या अर्थसंकल्पाचा कल वाटतोय. तो साहजिकच आहे; कारण की देशातील गरिबांचीही संख्या वाढते; पण आपल्या देशाची सर्वांत वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था म्हणून सध्या ख्याती आहे. या विषम अवस्थेमध्ये गरिबांना विशेषकरून त्यांच्या जीवनमूल्याला उभारी देण्यासाठी या अर्थसंकल्पामध्ये विशेष बाब करून लक्ष देण्यात आले आहे.

या अर्थसंकल्पाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे पायाभूत सुविधांना ११.११ लाख कोटी रुपये विशेष तरतूद ठेवण्यात आलेली आहे. त्यामुळे देशातील विकास कामाअंतर्गत येणारी क्षेत्रे यांना विशेषकरून चालना मिळेल. सरकारी योजना, विमानतळ व इतर पायाभूत सेवा-सुविधा निर्मितीसाठी विशेष या दृष्टिकोनातून उद्योजकांना याआधारे उद्योग असणाऱ्या क्षेत्रांमध्ये नवगुंतवणूक किंवा नवनिर्मिती त्याचबरोबर नवीन व्यवसाय करण्याच्या संधी मिळतील हे विशेष आहे. त्यातल्या त्यात वित्तीय तूट सुद्धा पाच टक्क्यांपर्यंत ठेवण्याचे मानस आहे. यावर्षी एकंदरीत ऊर्जा, सिमेंट, स्थापत्य उद्योगसमूहास या विशेष चालना मिळणार आहे.

स्वयंरोजगारास या अर्थसंकल्पामध्ये भरभरून तरतूद ठेवण्यात आलेली आहे. देशांतर्गत उद्योगांना चालना देण्यासाठी साधारणपणे १९११ कोटी रुपये निधी ठेवलेला असून हा कितीतरी पटीने मागच्या अर्थसंकल्पापेक्षा जास्त आहे. पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत घराचे उद्दिष्ट पूर्णत्वाकडे येत असतानाच आगामी पाच वर्षांमध्ये आणखी दोन कोटी घर ग्रामीण भागातील गरिबांसाठी बांधण्याचा संकल्प या अर्थसंकल्पानुसार करण्यात आला आहे. त्यामुळे ग्रामीण भागामध्ये एक निवाऱ्याची सोय होऊन घरबांधणी प्रकल्पामुळे त्याच्यावर आधारित असणाऱ्या उद्योग-व्यवसायांना येथून पुढे निश्चितच चालना मिळेल.

गरीब, महिला, युवक व शेतकरी या चार स्तंभांचा विशेषकरून या अर्थसंकल्पामध्ये विचार करण्यात आलेला असल्याने विकसित भारत निर्माण करण्याचे ध्येय या चारही वर्गांवर अवलंबून आहे. त्यामुळे आगामी काळात येणाऱ्या अर्थव्यवस्थेचे स्वरूप निश्चितच या चार घटकांवर राहील असे वाटते. स्टार्टअपला सुद्धा कर सवलती २०२५ पर्यंत वाढवण्याचा संकल्प या अर्थसंकल्पामध्ये आहे.

त्याचबरोबर सौर ऊर्जा यासाठी प्राधान्याने एक कोटी घरांना त्यावर ऊर्जा देण्याचा संकल्पही केलेला आहे. छोटे उद्योग-व्यावसायिक

यांच्यासाठी आयकरामध्ये असे ठोस बदल करण्यात आलेले नाहीत. मागील सुविधा पुढेही देण्याचा अर्थसंकल्पामध्ये संदेश देण्यात आलेला आहे.

भारत देशाची अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन डॉलर करण्यासाठी वंचित व मध्यमवर्ग यांना बरोबर घेऊन त्यांची आर्थिक परिस्थिती सुदृढ करून त्यांना विकासाच्या या प्रवाहामध्ये आणणे गरजेचे आहे. त्यामुळे हा अर्थसंकल्प सर्वसमावेशक विकसनशील असाच आहे असे मला वाटते. यावरून या सरकारची पुढची सरकारी धोरणे जनकेंद्रित असतील असे या अर्थसंकल्पातून प्रदर्शित होते.

जानेवारीमध्ये आलेल्या अहवालानुसार जपान, इंग्लंड, जर्मनी यांचे विकासाचे दर घटत आहेत. त्याचबरोबर चीन आणि अमेरिका कर्जाच्या खाईत सापडत आहेत. त्यामुळे आजही भारताची शाश्वत विकासाची पद्धत जगामध्ये वाखाणण्यासारखी आहे. त्याचबरोबर विकासाचाही गाडा अनेक पटीने चांगला आहे. मंदी व अनेक आघाड्यांवर जगातील अर्थव्यवस्था संघर्ष करत असताना भारताची घोडदौड जगातील तीन नंबरची अर्थव्यवस्था होण्यासाठी सक्षम आहे असे एकंदरीत विकासदरातून वाटते आणि त्यासाठी हा अर्थसंकल्प निश्चितच पोषक आहे. विकासाची फळे तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचण्यासाठी सरकारी धोरणे जनकेंद्रित असावी लागतात, यासाठीच या अर्थसंकल्पामध्ये बऱ्याच तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. वंचित वर्गाचे उत्पन्न वाढल्याखेरीज पर्याय नाही, त्यासाठी शंभर टक्के लाभार्थी वर्गापर्यंत पोहोचण्याची यंत्रणा सरकारकडून तयार करण्यात येत आहे. भारतीय अर्थव्यवस्था समाजवादी प्रेरित असल्यामुळे बदलापेक्षा सुधारण्यावर भर देणे, त्याचबरोबर लोकशाहीत व्यक्तिस्वातंत्र्याचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी अर्थव्यवस्थेची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते.

व्यापारी, भांडवलदार, श्रमिकवर्ग, मध्यमवर्ग, गरीबवर्ग यांची एकत्र पंचसूत्री करताना सरकारला योग्य अशी करविषयक धोरणे व सामाजिक व्यवस्था, दारिद्र्य, बेकारी या सर्वांचा आढावा घेऊन आर्थिक नियोजन करावे लागते. अर्थसंकल्पातून अशीच भूमिका घेतलेली आहे.


एक थोडीशी खंत या अर्थसंकल्पामध्ये दिसून येते की गरिबांच्या अर्थात सर्वच नागरिकांच्या जीवनाशी निगडित असणारी सेवा म्हणजे इंधनाची गरज! एकीकडे तेल कंपन्यांचा वार्षिक नफा दोन लाख कोटींपर्यंत जात असताना तेल कंपन्यांना १५००० कोटींचे अनुदान या अर्थसंकल्पामध्ये देण्याचे केलेले आहे. सामान्यपणे कंपन्यांचा नफा कमी झाला तरी चालेल; पण स्वस्त इंधन मिळेल काय, याची प्रतीक्षा होती; पण तसे काही घडले नाही. शंभरी पार केलेले इंधनाचे दर इथून पुढे कमी होणे अपेक्षित राहील. शेवटी ऊर्जा इंधन याशिवाय विकास शक्य नाही. देशांतर्गत अस्थिरता समाजवादी अर्थव्यवस्थेत कधी-कधी अडथळे निर्माण करतात. या अडथळ्यांतून आपण निश्चितच पार पडून जगात एक विकसनशील देश म्हणून भारताची प्रतिमा निर्मित होईल असे मला वाटते.

*(या लेखाचे लेखक प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ व उद्योजक आहेत. लेखकाचे लेख नियतकालिकांतून प्रकाशित होत असतात. त्यांचा भ्रमणध्वनी ८८०६०६००००/९४२२२०११४० आहे.)*

## शीर्षासन



- कार्यालयामध्ये प्रामाणिक कर्मचारी तापातही बिनातक्रार काम करतात, तर बऱ्याच अतिप्रामाणिकांना कामाचाच ताप होतो!
- संस्थेच्या हिताची सदासर्वदा चिंता करणारे चिंतन करायला तयार नसतात; कारण चिंतनातून त्यांच्याच कर्मातून चिंता निर्माण झाल्याचे लक्षात येईल, याची त्यांना भीती वाटत असते.
- क्षमतेएवढ्या जबाबदाऱ्या मोत्यांच्या माळेसारख्या शोभतात तर जास्तीच्या जबाबदाऱ्या गळफासासारख्या भासतात.
- आश्वासनांचे प्रकार - दिलेले, पूर्तता केलेले, विचारात असलेले, लक्षात असलेले, विस्मृतीत गेलेले आणि पुन्हा दिलेले.
- साहेबांनी सहकाऱ्यांना काम सांगताना होमिओपॅथीप्रमाणे (सौजन्याने) सांगावे. ॲलोपॅथीप्रमाणे (रागावून) सांगितल्यास त्याचे (साईड इफेक्ट्स) दुष्परिणाम कामावर होतात.
- संस्थेशी निष्ठावान असलेल्या कर्मचाऱ्याला काम करायला हवे याचे भान असते, प्रेम असलेल्या कर्मचाऱ्यांना काम करायला हवे असे वाटते. इतरांना त्यांना काय हवे याविषयी चांगले माहिती असते.
- नेतृत्वाने इतरांची सेवा करणे अपेक्षित असते; पण काही नेते त्याचा अर्थ इतरांकडून सेवा करून घेतात.
- कष्ट उपसणाऱ्या कर्मचाऱ्याच्या वर्मावर बोट ठेवण्याचा उगाचच प्रयत्न करण्यात अर्थ नाही. जर घाव वर्मावर बसला तर खोडी करणाऱ्याच्या कर्मावर व शरीर धर्मावर परिणाम होण्याची शक्यता असते.
- सतत दुसऱ्याची चिंता करणाऱ्याची, चिंता करण्याची वेळ दुसऱ्यावर येते.
- पदोन्नतीनंतर प्रत्येक अधिकाऱ्याची जबाबदारी वाढल्याचे त्याला वाटते. तो त्याप्रमाणे वागायला लागतो; पण यामुळे साहेबाची बेजबाबदार वृत्ती वाढल्याचे त्यांच्या सहायकाला वाटायला लागते.
- प्रत्येक वरिष्ठाचा त्याचा कनिष्ठ खरा हितचिंतक, समीक्षक व टीकाकार असतो. त्याला तेवढ्याच गांभीर्याने घ्यायला हवे.
- साहेबाने आपल्या कनिष्ठाला कामकाजामध्ये दिलेल्या स्वातंत्र्याचा अर्थ म्हणजे झालेल्या चांगल्या कामाचे श्रेय साहेबाला तर चुकांचे श्रेय कनिष्ठाला.
- काही बदनाम लोक एवढे बदनामीत लोकप्रिय होतात की, त्या परिसरात झालेल्या सर्व गुन्ह्यांचे श्रेय, त्यांची इच्छा असो अथवा नसो त्याला दिले जाते.
- भरमसाठ पगार देऊन पाट्या टाकणारे कर्मचारी कामावर ठेवता येतात; पण हितचिंतक व निष्ठावान कर्मचारी परिश्रमाने घडवावा लागतो.
- साहेबाने एखाद्या नारद कर्मचाऱ्याला कामावरून सुनावले की त्याचे पडसाद साहेबाला त्यांच्या साहेबाकडून ऐकावे लागते; कारण नारदाची भूमिका कर्मचारी बजावत असतो.
- सहकाऱ्याशी मन मोकळे करताना हातचे राखून करा नाही तर त्यांच्याशी भांडण झाल्यावर तो तुमच्या साहेबाकडे त्याचे मन मोकळे करील.
- असंतुष्ट कर्मचारी सतत टीकाकाराची, समीक्षकांची व मार्गदर्शकाची भूमिका निभावत असतात.



# कृत्रिम बुद्धिमत्ता आणि उद्योजकता विकास - नवे आयाम

**माणसाच्या जीवनशैलीत एआयमुळे अनेक उपयुक्त बदल झालेले आहेत. अँड्रॉईड, आयफोनमधील सीटी, वा गुगल असिस्टंट अनेक प्रकारची कामे करतो. एआयशी संबंधित स्वामित्व हक्क (पेटंट) ची संख्या दरवर्षी सहा टक्क्यांनी वाढत आहे. Make in India, Made in India, आत्मनिर्भर भारत अंतर्गत कौशल्य विकास आणि सध्याच्या मनुष्यबळाचा 'मेकओव्हर' केंद्र सरकार आणि उद्योग आणि राज्य सरकारचा समतोल समन्वय अशी त्रयी साधून आगामी काळात सर्वाधिक मागणी असणाऱ्या एआय बेस्ड तंत्रज्ञानाचा देशाच्या उद्योजकता विकासामध्ये सहज शिरकाव होऊ शकतो याविषयी.**

**- अभिराम डबीर**

### अ) मानवी बुद्धिमत्ता आणि संगणक प्रणाली :

निसर्गातील सर्वांत बुद्धिमान प्राणी म्हणजे माणूस. त्यामुळे माणसाने बुद्धिमत्तेचा सखोल अभ्यास केलेला आहे. हॉर्वर्ड गार्डनर नावाच्या अमेरिकन मानसतज्ज्ञाच्या मते, मानवी बुद्धिमत्ता हिचे नऊ पैलू आहेत - गणिती-तार्किक बुद्धिमत्ता, भाषिक बुद्धिमत्ता, अवकाश-कालात्मक बुद्धिमत्ता, सांगितीक बुद्धिमत्ता, शारीरिक बुद्धिमत्ता, नैसर्गिक बुद्धिमत्ता, भावनिक बाह्यबुद्धिमत्ता, भावनिक अंतर्गत बुद्धिमत्ता आणि शेवटी अस्तित्वनिष्ठ बुद्धिमत्ता. याचा मानवानेच बनवलेल्या संगणकामध्ये मानवाने किती प्रकारच्या बुद्धिमत्तांचे रोपण झाले आहे हे तपासणे इष्ट.

मानवाने संगणकाचा शोध लावला तेव्हा तो केवळ जलद आकडेमोड करणारा इलेक्ट्रॉनिक गणक होता. तेव्हापासून आजपर्यंत त्यात अनेक बदल झाले; पण मूलभूत रचना मात्र कायम आहे. संगणकाचे पाच प्रमुख घटक असतात. इनपुट -आऊटपुट युनिट, स्मृती (मेमरी) युनिट, आकडेमोड आणि तार्किक युनिट, स्टोअर युनिट आणि कंट्रोल युनिट. संगणकाकडून काम करून घेण्यासाठी माणसाला त्याच्या आज्ञावलीत अत्यंत पद्धतशीरपणे आज्ञा लिहाव्या लागतात. संगणक त्या सर्व आज्ञांचे अचूकपणे पालन करतो. एखादी आज्ञा चुकीची असली तरी तो त्याचे निष्ठेने पालन करतो. अशा परिस्थितीत मानवी प्रोग्रामलाच त्याच्या आज्ञावलीमध्ये सुधारणा करणे क्रमप्राप्त असते. अशा आज्ञाकारी संगणकाला आज 'कृत्रिम बुद्धिमत्ता' (AI) माणसापेक्षा विद्वान कशी बनवते हे महत्त्वाचे.

संगणकाचा जसजसा विकास होत गेला तसतशी माणसाच्या त्याच्याकडून अपेक्षाही वाढत गेल्या. आजवर संगणकाच्या सर्व भागांमध्ये सर्वांगीण प्रगती झाली आहे. मानवी हस्तक्षेपाशिवाय अनेक स्मार्ट यंत्रे संगणकाशी थेट बोलू लागली आहेत. इंटरनेटच्या माध्यमातून प्रचंड डेटा (विदा) उपलब्ध झाला असून, क्लाऊडवर माहिती ठेवायच्या तंत्रज्ञानामुळे -

### ब) कृत्रिम बुद्धिमत्ता (ए-आय) :

जगातील कोणत्याही ठिकाणाहून ही विदा आज कोठेही उपलब्ध होऊ शकते. या पार्श्वभूमीवर संगणकाला बुद्धिमत्ता देण्यासाठी अशी सॉफ्टवेअर्स लिहिली जात आहेत, जी वापरून मानवाप्रमाणे संगणकदेखील या विदेचे (Data) विश्लेषण करून स्वतःच निर्णय घेऊ शकतो. यालाच आपण कृत्रिम बुद्धिमत्ता 'ARTIFICIAL INTELLIGENCE' (AI) असे म्हणतो. कोणताही मानव करू शकणार नाही, असे प्रचंड विदेचे ग्रहण आणि विश्लेषण क्षणार्धात करून निर्णयाप्रत येण्यास संगणकाने मानवावर आज मात केली आहे.

### क) एआय (AI) आणि नागरिक साक्षरता :

एआयची मूलभूत क्षमता जाणून घेऊन त्याचे ॲप्लिकेशन्स वापरणे,



'एआय'ने रेखाटलेले काल्पनिक चित्र.

आजच्या जगात एआय साक्षर होणे हे प्रत्येक नागरिकासाठी आवश्यक आहे. मुलांना एआय समजून घेऊन वापर व मूल्यमापन करण्यासाठी सशक्त करणे ही आजच्या काळाची गरज आहे. मुलांची चौकशी - भावनिक आणि सहयोगी चौकशी साक्षरता वाढवण्यासाठी एआय खेळणी व भविष्यात मुलांसाठी एआयसज्ज पिढी उपक्रम सुरू होत आहेत. वर्ल्ड एकॉनॉमिक फोरमने स्मार्ट टॉईज अड्रॉईड्स सुरू केली आहेत. इंटरनेट ऑफ थिंग्स (IOI) सारख्या तंत्रज्ञानाच्या मदतीने हे शक्य झाले आहे. एआयद्वारे आपण प्रत्येक विद्यार्थ्याला आधीपेक्षा चांगले पर्सनलाईज्ड ट्युटर व सर्वांना आधीपेक्षा चांगला आरोग्य सल्ला देऊ शकतो. यथावकाश एक दिवस आपण एक बुद्धिमत्ता तयार करू ज्याला आर्टिफिशियल जनरल इंटेलिजन्स (एजीआय) म्हटले जाऊ शकते की जेथे एक बुद्धिमत्ता मानवाच्या बरोबरीची व स्वतःला शिक्षित व सुधारण्यास सक्षम असणार आहे.

### ड) 'एआय (AI) चे सेवाक्षेत्रातील योगदान व आर्थिक आव्हाने'

इ.स. २०४७ पर्यंत विकसित देश होण्यासाठी भारताला वार्षिक विकास दर सात टक्क्यांहून अधिक राखणे आवश्यक आहे. वर्ल्ड एकॉनॉमिक फोरममध्ये प्रत्येक आंतरराष्ट्रीय गुंतवणूकदार भारतीय धोरणावर जाणीवपूर्वक लक्ष ठेवून आहे, यामध्ये 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स अर्थात एआयचे व्यवसायासमोर ठाकणारे आव्हान' या विषयावरदेखील जगाचे लक्ष आहे. 'आयएमएफ' आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या प्रसिद्ध अहवालानुसार, जागतिक पातळीवर ४० ते ४५ टक्के नोकऱ्यांवर 'एआय'चा परिणाम होण्याची शक्यता आहे. जगभरातील अर्थव्यवहारांवर आणि लोकांच्या जीवनशैलीवर कृत्रिम बुद्धमत्तेच्या 'एआय'चा प्रभाव वाढतो आहे. हा परिणाम अनेकांगी असणार आहे.

'एआय' हा शब्द संगणकतज्ज्ञ व शास्त्रज्ञ जॉन मॅककार्थी यांनी १९५५ साली प्रथम वापरला. 'ॲलेक्झा'पासून इंटरनेटवर आपण जे जे बघतो, खरेदी करतो याचे अंदाज आधीच देऊन मार्गदर्शन करणारी प्रणाली हा सर्व कृत्रिम बुद्धिमत्तेचा आविष्कार आहे. सामान्यपणे मनुष्य आपली बुद्धी वापरून जी कामे करतो ती सर्व कामे 'एआय'च्या साह्याने करता यावीत अशी संकल्पना आहे. याची सुरुवात यंत्रमानवाच्या (रोबोट) च्या माध्यमातून जागतिक स्तरावरील अव्वल बुद्धिबळपटूला हरविणाऱ्या 'डीपब्ल्यू' या प्रणालीने झाली. आता पुढे संपूर्ण मानवसदृश सामर्थ्य असलेला यंत्रमानव (ह्युमनॉईड) निर्माण करणे हे स्वप्न आपण बघत आहोत. यासाठी नॅनो टेक्नॉलॉजी निर्माण करत असलेले घटक यंत्रमानवाच्या कार्यक्षेत्राच्या व्याप्तीत आणि कार्यक्षमतेमध्ये उच्च स्तरावर सुधारणा करीत आहेत. त्यामुळे आधुनिक 'ड्रोन' तंत्रज्ञान, नाजूक, क्लिष्ट अतिसूक्ष्म मानवी शस्त्रक्रियेपासून परग्रहावर बग्गी चालवणारे कार्यक्षम यंत्रमानव निर्माण करण्यास गती मिळाली असून, 'एआय'च्या पैलूंमुळे स्वप्नवत असलेल्या व कथा-कादंबऱ्या, हॉलीवूडच्या सिनेमांमध्ये पाहिलेले सिनेमॅटिक तंत्रज्ञान व आविष्कार प्रत्यक्षात येत आहेत. या पार्श्वभूमीवर कुशल मनुष्यबळाची निर्मिती करून जागतिक स्तरावर पायाभूत सुविधांचा विकास व कुशल कामगारांची कमतरता नसल्यामुळे 'AI' ची प्रवेशद्वार म्हणून भारत या आव्हानाचे संधीत रूपांतर करू शकतो. देशाच्या जीडीपीत आणि रोजगारनिर्मितीत सेवाक्षेत्राचा मोठा वाटा आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये या क्षेत्रातील निर्यात ४०० अब्ज डॉलर्सवर पोहोचण्याचा अंदाज आहे. सेवाक्षेत्राची निर्यात व एफडीआयच्या माध्यमातून येत्या काही वर्षांत आपली वित्तीय तूट भरून काढण्याची क्षमता या दोन्ही क्षेत्रांत आहे. आज मॅनेजमेंट अकाउंटिंग टॅक्स, आर ॲण्ड डी सारख्या व्यावसायिक सेवांसह भारतातील सेवाक्षेत्रातील निर्यात ही तंत्रज्ञान क्षेत्रातील निर्यातीपेक्षा जास्त आहे. हे व्यवसाय ग्लोबल कॅपॅसिटी सेंटर (डीसीसी) द्वारे चालवले जातात. भारतीय उद्योग आज भारतीय जीसीसी संशोधन व विकास, इनोव्हेशन डिजिटल एआय, ॲनेलिटीक्स, क्लाऊड आणि साईबर क्षेत्रामध्ये अग्रगण्य होत आहेत. या व्यवसायांची सद्यःस्थिती जागतिक बाजारपेठेमध्ये ५० अब्ज डॉलर्सहून अधिक आहे. सध्या देशात १६०० डीसीसी आहेत. दरवर्षी ६०-७० डीडीसीची यात वाढ होते आहे. एआयच्या वापराने येत्या दहा वर्षांत जागतिक अर्थव्यवस्थेत सात लाख कोटी डॉलर्सची वाढ अपेक्षित आहे.

माणसाच्या जीवनशैलीत एआयमुळे अनेक उपयुक्त बदल झालेले आहेत. अँड्रॉईड, आयफोनमधील सीटी, वा गुगल असिस्टंट अनेक प्रकारची कामे करतो. एआयशी संबंधित स्वामित्व हक्क (पेटंट) ची संख्या दरवर्षी सहा टक्क्यांनी वाढत आहे. एआयच्या क्षमतेच्या (कॅपॅबिलिटी) पातळीनुसार तीन पातळ्या आहेत - मर्यादित, व्यापक आणि परिपूर्ण. विशिष्ट समस्या चतुराईने सोडविण्यासाठी आणि प्रक्रिया अधिक कार्यक्षम करण्यासाठी अनेक उद्योग-व्यवसाय मर्यादित एआयचा उपयोग करीत आहेत. आरोग्य-वैद्यकीय क्षेत्र, औषधोपचार, रोगनिदान, शस्त्रक्रिया-प्रक्रिया यात मोलाची मदत होत आहे. कारखान्यांमध्ये जुळवणी साखळी (असेंब्ली लाइन' ठरवून उत्पादन

प्रक्रिया स्वयंचलित केली जाते. बँक आणि वित्तीय संस्थांमधील कोट्यवधींच्या आर्थिक व्यवहारांवर लक्ष ठेवणे, अनपेक्षित वा 'गैरव्यवहारांचा शोध घेणे' यासाठी 'मर्यादित' एआय प्रणाली सातत्याने वापरली जाते. मनुष्याच्या हस्तक्षेपाशिवाय नियमित व पुनरावृत्तीच्या कार्याचा एआयमुळे दर्जा वाढतो. मात्र सामान्यज्ञान व अभिसंकल्पना अभावामुळे मर्यादित कृत्रिम बुद्धिमत्ता सामर्थ्य मर्यादित होते, हे पण सत्य आहे.

### ई) अर्थव्यवस्थेवरील परिणाम :

एआय तीन प्रकारे अर्थव्यवस्थेच्या वाढीवर परिणाम करू शकते.

१) श्रमउत्पादन क्षमतेमध्ये प्रचंड वाढ होऊ शकते; कारण नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानामुळे श्रमाच्या कार्यक्षमतेमध्ये वाढ होईल. वेळेचे व्यवस्थापन चांगले होईल.

२) एआयमुळे आभासी श्रमशक्ती निर्मिती होईल. समस्येचे निदान स्वयंशिक्षण व स्वयंसंचलनाद्वारे होईल.

३) तिसरे म्हणजे नावीन्यपूर्ण शोधांमुळे एकूणच अर्थव्यवस्थेचा फायदा होऊन उत्पन्नात वाढ होईल. एआय संचलित यंत्रणेमुळे उत्पादन, वितरण, खरेदी-विक्री, जाहिरात, श्रम बाजार, बाजार यंत्रणा, आदान प्रदान किंमती बाजारपेठ, किंमत यंत्रणा, वाहतूक अशा अर्थव्यवस्थेच्या सर्व घटकांवर परिणाम होणार आहे. उत्पादन क्षेत्रातदेखील यांत्रिकीकरण, स्वयंचलन (ऑटोमेशन) वाढल्यामुळे मानवी श्रमाचा वापर कमी होईल. उत्पादन खर्चात बचत होईल, किमती स्पर्धात्मक होतील. खरेदीदार-उत्पादक या दोन्ही घटकांना 'एआय' मार्गदर्शन करेल. कार क्षेत्रातील विनावाहक कार, बसेस यासाठी 'टेस्ला कंपनी'चे उदाहरण पुरेसे आहे. एआयमुळे काही प्रमाणात बेरोजगारी निर्माण होऊ शकते; परंतु एआयसाठी लागणारी यंत्रे, यंत्रांना तयार करण्यासाठी संशोधन व विकास उत्पादन क्षेत्रात मोठ्या प्रमाणात चालना मिळेल. एआय दैनंदिन वित्तीय कार्याचे संचालन, जोखीम कमी करणे, वित्तीय व्यवहारांवर इष्टतम व अनुकूल बदल सातत्यपूर्ण प्रणालीद्वारे करू शकतो. आयएमएफच्या ताज्या अहवालानुसार विकसित राष्ट्रांच्या श्रमबाजारावर ५५ टक्के व अविकसित अल्प उत्पन्न विकसनशील राष्ट्रात हा प्रभाव ४० ते ६० टक्के असू शकतो.

### उ) एआयचे आविष्कार - बॉट प्रणाली - चॅटबॉट

नेमून दिलेल्या सूचनांची पुनरावृत्ती मनुष्यापेक्षा अनेक पट वेगाने करू शकणारी, ठराविक कार्यासाठी निर्माण केलेली मर्यादित एआय प्रणाली म्हणजे बॉट. चॅटबॉट हा बॉटचा प्रकार असून, पूर्वनियोजित उत्तरांचा संचय प्रणालीमध्ये केल्यामुळे ठराविक प्रश्नांची उत्तरे देणे, वारंवार किंवा सामान्यतः विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची उत्तरे देणे (FAQs / GAQs) निरसन करणे यासाठी अनेक संकेतस्थळांवर, व्हॉटसॲप प्रणालीवर चॅटबॉट्‌सच्या रूपात साह्यक सदैव कार्यरत असतात. 'एलायझा' हा शाब्दिक संवाद साधणारा पहिला चॅटबॉट आहे. मानसशास्त्रीय भूमिकेतून त्याने लोकांना बोलायला उद्युक्त केले आणि त्यांचे प्रश्न त्यांनाच विचारून निरसन केले. 'पॅरी' नावाच्या चॅटबॉटनेदेखील त्याचीच पुनरावृत्ती केली. 'क्लेव्हर बॉट' या चॅटबॉटने लोकांशी चतुराईने संवाद साधताना, संवादादरम्यान संवादांचे विश्लेषण करून सांख्यिकीच्या आधारे त्या साठ्यातील सर्वोत्तम जुळणाऱ्या उत्तराची निवड करून लोकांना थक्क केले, तरी संवादात अपरिचित विषय आल्यावर मानवी मेंदूच्या बुद्धीप्रमाणे तो हा विषय कसा हाताळेल हा संशोधनाचा विषय आहे.

### ऊ) थिंक इंडिया, टेक इंडिया :

आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी राजकोषीय तूट (Social delight) ५.१ टक्के अपेक्षित आहे. नुकत्याच सादर झालेल्या अंतरिम अर्थसंकल्पामध्ये पूर्ण बजेट (जून-जुलै २०२४ मध्ये जाहीर होईल.) नवकल्पना आणि उद्योजकता यावर भर दिला आहे. उदयोन्मुख खाजगी उद्योगांना संशोधनासाठी ५० वर्षांपर्यंतच्या दीर्घ मुदतीची स्वस्त दरातील कर्जे मिळावीत यासाठी एक लाख कोटी रुपये निधीची निर्मिती करण्यात येणार आहे. याचा कॉर्पोरेट संशोधन व विकासावर सकारात्मक परिणाम होईल. सध्या भारत याबाबतीत मागे आहे. संरक्षण क्षेत्रातील वस्तुनिर्मितीसाठी तंत्रज्ञानाचा विकास विशेषतः एआयवर आधारित तंत्रज्ञान विकास हीदेखील स्टार्टअप व इनोव्हेटर्ससाठी मोठी संधी आहे. एआयमुळे देशाच्या सेवाक्षेत्रात सकारात्मक बदल घडण्याची शक्यता आहे. सॉफ्टवेअर सेवांमध्ये भारतीय मनुष्यबळाचे जागतिक दर्जाचे कौशल्य लक्षात घेता एआयची व्याप्ती वाढवून सध्याच्या केवळ ग्राहकाच्या भूमिकेतून बाहेर पडून 'एआय'चे उत्पादक आणि निर्माते होण्याचा भारताचा दृष्टिकोन स्पर्धात्मक पातळीवर योग्य राहील. यासाठी Make in India, Made in India, आत्मनिर्भर भारत अंतर्गत कौशल्य विकास आणि सध्याच्या मनुष्यबळाचा 'मेकओव्हर' केंद्र सरकार आणि उद्योग आणि राज्य सरकारचा समतोल समन्वय अशी त्रयी साधून आगामी काळात सर्वाधिक मागणी असणाऱ्या एआय बेस्ड तंत्रज्ञानाचा देशाच्या उद्योजकता विकासामध्ये सहज शिरकाव होऊ शकतो. 'पाच ट्रिलियन डॉलर' अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट सहजपणे साध्य करण्यासाठी याच बाबींचा आधार घेऊन केंद्रीय अर्थमंत्री यांनी आपली लोकसंख्या, लोकशाही आणि विविधता या त्रिसूत्रीमध्ये देशाच्या उद्यमशील महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्याची क्षमता कशी आहे आणि यामध्ये भारतीय सशक्तीकरणाच्या वाटेवर सातत्याने प्रगतीचे निरनिराळे आलेख अनेक क्षेत्रांमध्ये पादाक्रांत करणाऱ्या भारतीय महिलांचे योगदान किती महत्त्वाचे आहे, याचा पुनरुच्चार अंतरिम अर्थसंकल्पात केलेला दिसतो. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी या देशातील १.४१ अब्ज लोकसंख्येच्या ६० टक्केपेक्षा जास्त तरुण असलेल्या वर्गाने आपली कंबर कसावी लागेल, सत्य शोधण्याची क्षमता विकसित करावी लागेल, वैज्ञानिक विचार व दृष्टिकोन विकसित करूनच ते जीवनात पुढे जाऊ शकतात आणि विकसित भारतासाठी आपले भरीव योगदान देऊ शकतात, असा विश्वास आहे.

*(या लेखाचे लेखक हे राष्ट्रीय पातळीवरील उत्कृष्ट प्रेरक-प्रशिक्षक आहेत. सध्या ते एमसीईडी मुख्यालय येथे कार्यरत आहेत. त्यांचा भ्रमणध्वनी ९४०३०७८७५९ आहे.)*

# नमुना प्रकल्प अहवाल

## लेदर प्रॉडक्ट्स तयार करणे

**ओळख :** सदरील प्रकल्प हा लेदर प्रॉडक्ट निर्मितीचा आहे. आपण अनेक वर्षांपासून लेदर बॅग, पर्सेस व बॅग्जचे अनेक प्रकार बघतो आहोत. हे एक असे उत्पादन आहे की, या उत्पादनाला कुठल्याही प्रकारची मंदी नसते. हे एक ग्राहकोपयोगी वस्तू आहे. विशेषतः महिलावर्गासाठी. त्यामुळे महिला उद्योजकांना हा एक छोटासा उत्पादन व्यवसाय किंवा या उद्योगामध्ये व्यापार करण्यास हरकत नाही.

**जागा व इमारतीची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| जागा | भाड्याची |
| इमारत | भाड्याची |

**लागणारा कच्चा माल :** कच्चे लेदर

**मनुष्यबळाची आवश्यकता :** कुशल-१, अर्धकुशल-२, अकुशल-१

**लागणारी यंत्रसामग्री :** कटींग मशीन, सुईंग मशीन इत्यादी.

**प्रकल्पाला लागणाऱ्या जागेची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| जागा | स्वतःची |
| **जागा विकासाला लागणारा खर्च :** | |
| लेव्हलिंग, फेन्सिंग व इतर | -- |
| **इमारतीची आवश्यकता :** | |
| इमारत | भाड्याची |
| **यंत्रसामग्रीची आवश्यकता :** | |
| यंत्रसामग्री | १२,००,००० |
| **इतर स्थिर संपत्तीचा खर्च :** | |
| कार्यालयीन फर्निचर | ५०,००० |
| वर्कशॉप फर्निचर | १,००,००० |
| इतर | २५,००० |
| **एकूण :** | **१,७५,०००** |
| **प्राथमिक व पूर्व उत्पादनांच्या खर्चांची आवश्यकता :** | |
| प्रकल्प अहवाल तयार करण्याचा खर्च, मार्केट सर्व्हे, कायदा खर्च | १५,००० |
| **खेळत्या भांडवलाची आवश्यकता :** | |
| कच्चा माल | ३,००,००० |
| पक्का माल | ६,००,००० |
| प्रत्यक्ष | ५०,००० |
| **एकूण :** | **९,५०,०००** |
| **वार्षिक कच्च्या मालाची आवश्यकता :** | |
| कच्चा माल | ३६,००,००० |
| **उपयुक्तिकेची आवश्यकता :** | |
| वीज | ४,५०,००० |
| पाणी | ५०,००० |
| **एकूण :** | **५,००,०००** |
| **मनुष्यबळाची आवश्यकता :** | |
| कुशल-१ | २,७०,००० |
| अर्धकुशल-२ | ३,००,००० |
| अकुशल-१ | १,५०,००० |
| **एकूण :** | **७,२०,०००** |
| **देखभाल व दुरुस्तीचा खर्च :** | |
| यंत्रसामग्रीवर | ६०,००० |
| इतर स्थिर संपत्तीवर | ९,००० |
| **एकूण :** | **६९,०००** |
| **घसाऱ्याचा खर्च :** | |
| यंत्रसामग्रीवर | १,२०,००० |
| इतर स्थिर संपत्तीवर | १७,००० |
| **एकूण :** | **१,३७,०००** |
| **प्रशासकीय खर्च :** | |
| पर्यवेक्षक | २,७५,००० |
| वॉचमन | -- |
| **एकूण :** | **२,७५,०००** |
| **वाहतूक खर्च :** | |
| वाहतूक खर्च | १,००,००० |
| प्रवास खर्च | ३६,००० |
| **एकूण :** | **१,३६,०००** |
| **एकूण :** | **४,११,०००** |
| **विक्री खर्च :** | |
| विक्रेते | -- |
| इतर | -- |
| **एकूण :** | |
| **प्रकल्पाचा एकूण भांडवली खर्च :** | |
| जागा | भाड्याची |
| इमारत | भाड्याची |
| यंत्रसामग्री | १२,००,००० |
| इतर स्थिर संपत्ती | १,७५,००० |
| प्राथमिक व पूर्व उत्पादन खर्च | १५,००० |
| **एकूण :** | **१३,९०,०००** |
| खेळते भांडवल | ५,००,००० |
| **एकूण :** | **१८,९०,०००** |
| **मीन्स ऑफ फायनान्स :** | |
| स्वतःचे ३० टक्के | ५,६७,००० |
| बँकेचे कर्ज ७० टक्के | १३,२३,००० |
| **प्रकल्पाचा वार्षिक उत्पादन खर्च व वार्षिक विक्री :** | |
| कच्चा माल | ३६,००,००० |
| उपयुक्तिके | ५,००,००० |
| वेतन व भत्ते | ७,२०,००० |
| देखभाल व दुरुस्ती | ६९,००० |
| घसारा | १,३७,००० |
| प्रशासकीय खर्च | ४,११,००० |
| विक्री खर्च | -- |
| व्याज | १,५८,७६० |
| **एकूण :** | **५५,९५,७६०** |
| **वार्षिक विक्री :** | **७२,७४,४८८** |
| **वार्षिक नफा :** | **१६,७८,७२८** |

## बायोमास स्टोव्ह

**ओळख :** सदरील प्रकल्प हा बायोमास स्टोव्ह उत्पादित करण्याचा आहे. आपण अनेक वर्षांपासून बघतो की, ग्रामीण व निमशहरी भागामध्ये क्लीन कुकुंगचा प्रश्न अजूनही आहे व त्याचबरोबर शेतीमधला कचरा कुठे टाकायचा हाही एक मोठा प्रश्न आहे. या दोन्ही प्रश्नांचे उत्तर एकाच ठिकाणी आहे व ते म्हणजे बायोमास स्टोव्ह उत्पादित करणे. हे एक नवीन उत्पादन आहे व या उत्पादनाला भारतात व भारताबाहेर खूप मोठी मागणी आहे.

**जागा व इमारतीची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| जागा | भाड्याची |
| इमारत | भाड्याची |

**लागणारा कच्चा माल :** बायोमास

**मनुष्यबळाची आवश्यकता :** कुशल-२, अर्धकुशल-२, अकुशल-१

**लागणारी यंत्रसामग्री :** फॅब्रीकेशन सेट

**प्रकल्पाला लागणाऱ्या जागेची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| जागा | स्वतःची |

**जागा विकासाला लागणारा खर्च :**

| | |
|---|---|
| लेव्हलिंग, फेन्सिंग व इतर | -- |

**इमारतीची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| इमारत | भाड्याची |

**यंत्रसामग्रीची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| यंत्रसामग्री | २२,५०,००० |

**इतर स्थिर संपत्तीचा खर्च :**

| | |
|---|---|
| कार्यालयीन फर्निचर | १,००,००० |
| वर्कशॉप फर्निचर | ७५,००० |
| इतर | २५,००० |
| **एकूण :** | **२,००,०००** |

**प्राथमिक व पूर्व उत्पादनांच्या खर्चांची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| प्रकल्प अहवाल तयार करण्याचा खर्च, मार्केट सर्व्हे, कायदा खर्च | २५,००० |

**खेळत्या भांडवलाची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| कच्चा माल | २,७५,००० |
| पक्का माल | ५,५०,००० |
| प्रत्यक्ष | ५०,००० |
| **एकूण :** | **८,७५,०००** |

**वार्षिक कच्च्या मालाची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| कच्चा माल | ३३,००,००० |

**उपयुक्तिकेची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| वीज | ६,००,००० |
| इंधन | -- |
| पाणी | १,००,००० |
| **एकूण :** | **७,००,०००** |

**मनुष्यबळाची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| कुशल-२ | ५,४०,००० |
| अर्धकुशल-२ | ४,२०,००० |
| अकुशल-१ | १,५०,००० |
| **एकूण :** | **११,१०,०००** |

**देखभाल व दुरुस्तीचा खर्च :**

| | |
|---|---|
| यंत्रसामग्रीवर | ६७,५०० |
| इतर स्थिर संपत्तीवर | ६,००० |
| **एकूण :** | ७३,५०० |

**घसाऱ्याचा खर्च :**

| | |
|---|---|
| यंत्रसामग्रीवर | २,२०,५०० |
| इतर स्थिर संपत्तीवर | २०,००० |
| **एकूण :** | **२,४०,५००** |

**प्रशासकीय खर्च :**

| | |
|---|---|
| पर्यवेक्षक-१ | ३,२५,००० |
| वॉचमन-१ | ६०,००० |
| **एकूण :** | **३,८५,०००** |

**वाहतूक खर्च :**

| | |
|---|---|
| वाहतूक खर्च | ३,३०,००० |
| प्रवास खर्च | १,३०,००० |
| इतर | -- |
| **एकूण :** | **४,६०,०००** |
| **एकूण :** | **८,४५,०००** |

**विक्री खर्च :**

| | |
|---|---|
| विक्रेते | ५,५०,००० |
| इतर | २,००,००० |
| **एकूण :** | **७,५०,०००** |

**प्रकल्पाचा एकूण भांडवली खर्च :**

| | |
|---|---|
| जागा | भाड्याची |
| इमारत | भाड्याची |
| यंत्रसामग्री | २२,५०,००० |
| इतर स्थिर संपत्ती | २,००,००० |
| प्राथमिक व पूर्व उत्पादन खर्च | २५,००० |
| **एकूण :** | **२४,७५,०००** |
| खेळते भांडवल | ८,७५,००० |
| **एकूण :** | **३३,५०,०००** |

**मीन्स ऑफ फायनान्स :**

| | |
|---|---|
| स्वतःचे ३० टक्के | १०,०५,००० |
| बँकेचे कर्ज ७० टक्के | २३,४५,००० |

**प्रकल्पाचा वार्षिक उत्पादन खर्च व वार्षिक विक्री :**

| | |
|---|---|
| कच्चा माल | ३३,००,००० |
| उपयुक्तिके | ७,००,००० |
| वेतन व भत्ते | ११,१०,००० |
| देखभाल व दुरुस्ती | ७३,५०० |
| घसारा | २,४०,५०० |
| प्रशासकीय खर्च | ८,४५,००० |
| विक्री खर्च | ७,५०,००० |
| व्याज | २,८१,४०० |
| **एकूण :** | **७३,०४,९००** |
| **वार्षिक विक्री :** | **८७,६५,८८०** |
| **वार्षिक नफा :** | **१४,६०,९८०** |

# फिश पिकल तयार करणे

**ओळख :** सदरील प्रकल्प हा फिश पिकल उत्पादनाचा आहे. आपल्याकडे अनेक वर्षांपासून मत्स्य व्यवसाय परंपरेने चालत आलेला आहे; पण त्यामध्ये जर आणखी वाढ करायची असेल तर त्यापासून टिकणारे पदार्थ उत्पादित करायला पाहिजे, त्यातलाच एक भाग फिश पिकल उत्पादित करण्याचा आहे व या उत्पादनाला खूप मोठ्या प्रमाणात भारतात व भारताच्या बाहेर मागणी आहे.

**जागा व इमारतीची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| जागा | भाड्याची |
| इमारत | भाड्याची |

**लागणारा कच्चा माल :** वेगवेगळ्या प्रकारचे मासे

**मनुष्यबळाची आवश्यकता :** कुशल-१, अर्धकुशल-१, अकुशल-१

**लागणारी यंत्रसामग्री :** मिक्सिंग, वॉशिंग टँक, पॅकेजिंग इत्यादी.

**प्रकल्पाला लागणाऱ्या जागेची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| जागा | स्वतःची |

**जागा विकासाला लागणारा खर्च :**

| | |
|---|---|
| लेव्हलिंग, फेन्सिंग व इतर | -- |

**इमारतीची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| इमारत | भाड्याची |

**यंत्रसामग्रीची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| यंत्रसामग्री | ९,८०,००० |

**इतर स्थिर संपत्तीचा खर्च :**

| | |
|---|---|
| कार्यालयीन फर्निचर | २५,००० |
| वर्कशॉप फर्निचर | ३०,००० |
| इतर | १०,००० |
| **एकूण :** | **६५,०००** |

**प्राथमिक व पूर्व उत्पादनांच्या खर्चांची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| प्रकल्प अहवाल तयार करण्याचा खर्च, मार्केट सर्व्हे, कायदा खर्च | ५,००० |

**खेळत्या भांडवलाची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| कच्चा माल | २,००,००० |
| पक्का माल | १,००,००० |
| प्रत्यक्ष | ५०,००० |
| **एकूण :** | **३,५०,०००** |

**वार्षिक कच्च्या मालाची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| कच्चा माल | २४,००,००० |

**उपयुक्तिकेची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| वीज | १,००,००० |
| पाणी | ३०,००० |
| **एकूण :** | **१,३०,०००** |

**मनुष्यबळाची आवश्यकता :**

| | |
|---|---|
| कुशल-१ | २,७०,००० |
| अर्धकुशल-१ | २,१०,००० |
| अकुशल-१ | १,५०,००० |
| **एकूण :** | **६,३०,०००** |

**देखभाल व दुरुस्तीचा खर्च :**

| | |
|---|---|
| यंत्रसामग्रीवर | २९,४०० |
| इतर स्थिर संपत्तीवर | १०,००० |
| **एकूण :** | ३९,४०० |

**घसाऱ्याचा खर्च :**

| | |
|---|---|
| यंत्रसामग्रीवर | ९८,००० |
| इतर स्थिर संपत्तीवर | ७,००० |
| **एकूण :** | **१,०५,०००** |

**प्रशासकीय खर्च :**

| | |
|---|---|
| व्यवस्थापक | १,५०,००० |
| वॉचमन-१ | ३६,००० |
| **एकूण :** | **१,८६,०००** |

**वाहतूक खर्च :**

| | |
|---|---|
| वाहतूक खर्च | ९०,००० |
| प्रवास खर्च | ३०,००० |
| **एकूण :** | **१,२०,०००** |
| **एकूण :** | **३,०६,०००** |

**विक्री खर्च :**

| | |
|---|---|
| विक्रेते | १,२५,००० |
| इतर | ५०,००० |
| **एकूण :** | **१,७५,०००** |

**प्रकल्पाचा एकूण भांडवली खर्च :**

| | |
|---|---|
| जागा | भाड्याची |
| इमारत | भाड्याची |
| यंत्रसामग्री | ९,८०,००० |
| इतर स्थिर संपत्ती | ६५,००० |
| प्राथमिक व पूर्व उत्पादन खर्च | ५०,००० |
| **एकूण :** | **१०,९५,०००** |
| खेळते भांडवल | ३,५०,००० |
| **एकूण :** | **१४,४५,०००** |

**मीन्स ऑफ फायनान्स :**

| | |
|---|---|
| स्वतःचे ३० टक्के | ४,३३,५०० |
| बँकेचे कर्ज ७० टक्के | १०,११,५०० |

**प्रकल्पाचा वार्षिक उत्पादन खर्च व वार्षिक विक्री :**

| | |
|---|---|
| कच्चा माल | २४,००,००० |
| उपयुक्तिके | १,३०,००० |
| वेतन व भत्ते | ६,३०,००० |
| देखभाल व दुरुस्ती | ४०,००० |
| घसारा | १,०५,००० |
| प्रशासकीय खर्च | ३,०६,००० |
| विक्री खर्च | १,७५,००० |
| व्याज | १,७३,४०० |
| **एकूण :** | **३९,५९,४००** |
| **वार्षिक विक्री :** | **४९,०९,६५६** |
| **वार्षिक नफा :** | **९,५०,२५६** |

(या प्रकल्प अहवालाचे लेखक हे स्वतः व्यवस्थापन सल्लागार असून गेली २३ वर्षे या क्षेत्रामध्ये प्रशिक्षण व सल्ला देण्याचे कार्य करत आहेत. ते स्वतः एक उद्योजक आहेत. त्यांचा भ्रमणध्वनी ९४०४५५०७९९ असून ई-मेल shidhayesanjay7@gmail.com आहे. प्रकल्प अहवालामधील किमती त्या-त्या जागेप्रमाणे व स्वतःच्या गुंतवणुकीप्रमाणे बदलू शकतात.)



# प्रश्नपेटी

**प्रश्न : व्हेगन लेदर उत्पादित प्रकल्पाविषयी माहिती पाहिजे.**

**किशोर गायकवाड, उस्मानाबाद**

**उत्तर :** व्हेगन लेदर उत्पादित करण्याच्या प्रकल्पाविषयी माहिती खालीलप्रमाणे आहे.

जागा ५,००० चौरस फूट

इमारत २,००० चौरस फूट

उपयुक्तितेची आवश्यकता :

वीज २० अश्वशक्ती

पाणी १० के.एल.

**मनुष्यबळाची आवश्यकता :** कुशल-३, अर्धकुशल-१, अकुशल-२

या उत्पादनासाठी लागणारी यंत्रसामग्री : वेगन लेदर फुल्ली ऑटोमॅटिक मेकिंग प्लँट

**लागणारा कच्चा माल :** वेगवेगळ्या प्रकारचे व गुणवत्तेचे बायोमास

या प्रकल्पासाठी एकूण भांडवल १५० ते २०० लाख रुपये लागू शकते. त्यामध्ये स्थिर भांडवलाची आवश्यकता १०० ते १२० लाख व खेळत्या भांडवलाची आवश्यकता ४० ते ५० लाखांपर्यंत असू शकते. या प्रकल्पाचा ना नफा ना तोटा बिंदू १२ ते १५ टक्क्यांपर्यंत असू शकतो व एकूण गुंतवणुकीवर परतावा २० ते २४ टक्क्यांपर्यंत असू शकतो.

**प्रश्न : ग्लुकोज बायोसेंसर प्रकल्पाविषयी माहिती पाहिजे.**

**आनंद पाटील, कोल्हापूर**

**उत्तर :** ग्लुकोज बायोसेंसर प्रकल्पाविषयी माहिती पुढीलप्रमाणे आहे.

जागा ७,००० चौरस फूट

इमारत ४,००० चौरस फूट

**मनुष्यबळाची आवश्यकता :** कुशल-२, अर्धकुशल-३, अकुशल-१

या उत्पादनासाठी लागणारी यंत्रसामग्री : सेमी ऑटोमॅटिक ग्लुकोज बायोसेंसर मेकिंग प्लँट

लागणारा कच्चा माल : वेगवेगळ्या प्रकारच्या गुणवत्तेचे व सेंसर व इतर

या प्रकल्पासाठी लागणारे एकूण भांडवल ९० ते १२५ लाख रुपये असू शकते. त्यामध्ये स्थिर भांडवलाची आवश्यकता ७० ते ९० लाखांपर्यंत व खेळत्या भांडवलाची आवश्यकता २० लाख ते ३० लाखांपर्यंत असू शकते. या प्रकल्पाचा ना नफा ना तोटा बिंदू २२ ते २३ टक्क्यांपर्यंत असू शकतो व एकूण गुंतवणुकीवर परतावा १७ ते १९ टक्क्यांपर्यंत असू शकतो.

**प्रश्न : ॲरोमॅटिक ऑईल प्रकल्पाविषयी माहिती पाहिजे.**

**विजय देसाई, कोल्हापूर**

**उत्तर :** ॲरोमॅटिक ऑईल प्रकल्पाविषयी माहिती खालीलप्रमाणे आहे.

**मूलभूत सुविधांची गरज :**

जागा ९,००० चौरस फूट

इमारत १,००० चौरस फूट

**उपयुक्तितेची आवश्यकता :**

वीज १० अश्वशक्ती

मनुष्यबळाची आवश्यकता : कुशल-३, अर्धकुशल-२, अकुशल-२

या उत्पादनासाठी लागणारी यंत्रसामग्री : सेमी ऑटोमॅटिक ॲरोमॅटिक ऑईल मेकिंग प्लँट

**लागणारा कच्चा माल :** वेगवेगळ्या गुणवत्तेचे व दर्जाचे इसेंसीयल ऑईल

या प्रकल्पासाठी लागणारे एकूण भांडवल ५० ते ७० लाखांपर्यंत असू शकते. त्यामध्ये स्थिर भांडवलाची आवश्यकता ४० ते ६० लाखांपर्यंत व खेळत्या भांडवलाची आवश्यकता १५ ते ३० लाखांपर्यंत असू शकते. या प्रकल्पाचा ना नफा ना तोटा बिंदू २९ ते ३१ टक्क्यांपर्यंत असू शकतो. एकूण गुंतवणुकीवर परतावा १५ ते १८ टक्क्यांपर्यंत असू शकतो.

**प्रश्न : नॅनो कंपोझिट मटेरियल प्रकल्पाविषयी माहिती पाहिजे.**

**मनोज गावंडे, नागपूर**

**उत्तर :** नॅनो कंपोझिट प्रकल्पाविषयी माहिती खालीलप्रमाणे आहे.

**मूलभूत सुविधांची गरज :**

जागा ३,००० चौरस फूट

इमारत २,००० चौरस फूट

**उपयुक्तितेची आवश्यकता :**

वीज १० अश्वशक्ती

**मनुष्यबळाची आवश्यकता :** कुशल-१, अर्धकुशल-२, अकुशल-१

या उत्पादनासाठी लागणारी यंत्रसामग्री : फुल्ली ऑटोमॅटिक ॲरोमॅटिक मटेरियल मेकिंग प्लँट

**लागणारा कच्चा माल :** ॲरोमॅटिक ग्रास

या प्रकल्पासाठी लागणारे एकूण भांडवल ५० ते ६० लाखांपर्यंत असू शकते. त्यामध्ये स्थिर भांडवलाची आवश्यकता ४५ ते ५० लाखांपर्यंत व खेळत्या भांडवलाची आवश्यकता ७ ते १५ लाखांपर्यंत असू शकते. या प्रकल्पाचा ना नफा ना तोटा बिंदू २१ ते २३ टक्क्यांपर्यंत असू शकतो. एकूण गुंतवणुकीवर परतावा १३ ते १७ टक्क्यांपर्यंत असू शकतो.

*(टीप : प्रश्नपेटीसाठी प्रश्न विचारणाऱ्या वाचकांनी आपला प्रश्न मोजक्या शब्दांत मांडावा. प्रश्न एकच विचारावा, एकच प्रश्न विचारणाऱ्या वाचकांना प्राधान्याने थोडक्यात उत्तर देण्यात येईल.)*

## उद्योग, व्यापार, व्यवसायाद्वारा स्वयंरोजगार मिळविण्यासाठी सर्व काही...

**प्रस्थापित व होतकरू उद्योजकांच्या यशोगाथा, बाजारपेठ, व्यवस्थापन, दर्जा, गुणवत्ता, ग्राहकांचे मानसशास्त्र, नवीन उद्योगांच्या संधी, शोध, तंत्रज्ञान, निर्यात, उद्योजकतेच्या वाटेवर साह्य करणाऱ्या संस्था, नमुना प्रकल्प अहवाल, आपल्यातील उद्योजकतेला दिशा देणारे, राज्य शासनाच्या उद्योगासंबंधीच्या योजना इत्यादींसंदर्भात माहिती.**

**उद्योजकीय मन घडविणारा तत्त्वज्ञ मित्र**

# उद्योजक

अ-३८, एम.आय.डी.सी., रेल्वे स्टेशन,
औरंगाबाद-४३१ ००५.

**E-mail :**
**Editorial** : udyojakmagazine2@gmail.com
**Subscription** : udyojaksubscription@gmail.com
**Advertisement** : udyojakadvt@gmail.com

To know more about MCED please visit our
**Portal**
www.mced.co.in

## वर्गणीदारांसाठी सूचना

*('उद्योजक' मासिकाच्या ज्या वर्गणीदारांना अंक मिळत नाहीत अथवा अनियमितता आहे अशा वर्गणीदारांनी कृपया आपल्या तक्रारी एक महिन्याच्या आत खालील भ्रमणध्वनीवर एसएमएसद्वारे नोंदवाव्यात. एक महिन्यानंतर केलेल्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही. तक्रार नोंदवताना वर्गणी भरल्याचा पावती क्रमांक, दिनांक, रक्कम तसेच जो अंक मिळाला नाही त्याचा तपशील थोडक्यात कळवावा, जेणेकरून उद्योजक वितरण विभागाला आपल्या तक्रारीवर तातडीने कार्यवाही करता येईल. भ्रमणध्वनी क्र. ९४०३६८३१९६).*

प्रति,
मा. व्यवस्थापकीय संपादक,
'उद्योजक' मासिक,
अ-३८, एमआयडीसी रेल्वे स्टेशन,
औरंगाबाद-४३१ ००५.

विषय : 'उद्योजक' मासिकाचे वर्गणीदार होण्याबाबत...

महोदय,
'उद्योजक' मासिकाचा वार्षिक/द्वैवार्षिक/त्रैवार्षिक सभासद होऊ इच्छितो. सोबत वर्गणीची रक्कम डिमांड ड्राफ्ट/मनिऑर्डर रु......... 'एमसीईडी औरंगाबाद'चे नावे पाठवत आहोत. कृपया आम्हाला 'उद्योजक' मासिक पुढील पत्त्यावर नियमितपणे पाठवावे.

पूर्ण नाव (आडनाव प्रथम) ______________________

पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता ______________________

______________________

पिन कोड ______________________

कळावे,

आपला विश्वासू,

स्वाक्षरी/-

नाव ______________________

### वर्गणीचे दर

| वर्गणी | अर्ध वार्षिक | वार्षिक | द्वैवार्षिक | त्रैवार्षिक |
|---|---|---|---|---|
| रुपये | ५००/- | ९००/- | १७००/- | २५००/- |

### जाहिरातींचे दर

| जाहिरातीचा आकार | नियमित अंकांसाठी |
|---|---|
| मलपृष्ठ (चार रंगी) | ५०,००० |
| कव्हर क्र. २ व ३ (चार रंगी) | ३०,००० |
| आतील पाने (चार रंगी) | २५,००० |
| अर्धे पान (चार रंगी) | १५,००० |
| पाव पृष्ठ (चार रंगी) | ८,००० |

- ५% जी.एस.टी. अतिरिक्त लागेल.
- जाहिरातीचे आर्टवर्क तयार करुन पाठविणे.
- जाहिरातीचे आर्टवर्क PDF / CDR / JPEG मध्ये आवश्यक.
- संस्थेच्या प्रशिक्षित उद्योजकांना जाहिरात दरात १०% सवलत.
- जाहिराती udyojakadvt@gmail.com वर पाठवाव्यात.

**उद्योजक मासिकाचे वर्गणीदार होण्यासाठी पुढील बारकोड स्कॅन करून वर्गदार व्हा..!**

**ऑफिसर कोड ४६ टाका. वर्गणीची नोंदणी करताना काही अडचण आल्यास ९४०३०७८७७९ वर संपर्क साधा.**

**वर्गणी/जाहिरातीचे पेमेंट https://mced.co.in/Subscription/ या लिंकवर करावे**

**कृपया पेमेंट 'एमसीईडी औरंगाबाद' (महाराष्ट्र) च्या नावे डिमांड ड्राफ्टने/मनिऑर्डरद्वारे पाठवावे अथवा 'उद्योजक' मासिकाच्या स्टेट बँक ऑफ इंडिया, रेल्वे स्टेशन शाखा, औरंगाबादच्या खाते क्र. ५२०६५८८३५९६ IFSC Code : SBIN 0020302 वर भरून त्याची सूचना तात्काळ एसएमएसद्वारे यूटीआर नंबर व उद्योजक मासिक पोस्टाद्वारे पाठविण्यासाठी सविस्तर पत्ता भ्रमणध्वनी ९४०३६८३१९६ वर कळवावा.**

# उद्योजक

## उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम, ‘उद्योजक’ मासिक वर्गणी/जाहिरात

### संपर्काचे पत्ते

MCED

महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे प्रकल्प अधिकारी गेल्या दीड दशकभरापासून प्रत्येक जिल्ह्यात समाजाच्या उद्योजकीकरणाची मोहीम स्वयंसेवकाच्या निष्ठेने राबवीत आहेत. केंद्राच्या शास्त्रशुद्ध उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमामुळे महाराष्ट्रात हजारो पहिल्या पिढीचे उद्योजक तयार झाले आहेत. हे लोण तळागाळापर्यंत पोहोचेल असा आम्हाला विश्वास आहे. समृद्धीकरणाचा हा विचार जनसामान्यांपर्यंत सर्वदूर पोहोचविण्यासाठी ‘उद्योजक’ मासिकही यशस्वीरीत्या उद्योजकतेविषयीचे ज्ञान प्रसार करीत आहे. केंद्राच्या कार्यक्रमाविषयी आणि उद्योजकच्या वर्गणी/जाहिरातीविषयी खालील प्रकल्प अधिकारी मित्र चर्चेसाठी सदैव उपलब्ध आहेत. महाराष्ट्रातील तरुणांनी, महिलांनी याचा फायदा जरूर घ्यावा. दहा हजार अधिक वर्गणीदार असलेले ‘उद्योजक’ कधी कधी परिस्थितीजन्य कारणांमुळे वेळेवर पोहोचत नसल्यास, वर्गणीदाराचा पत्ता बदलला असल्यास, नवीन वर्गणीदार व्हायचे असल्यास किंवा जाहिरात द्यायची असल्यास कृपया खालील पत्त्यावर संपर्क साधून समाजाच्या उद्योजकीकरणाच्या मोहिमेला हातभार लावावा.

# महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे (एमसीईडी) राज्यातील कार्यालयांचे पत्ते

**मुंबई विभाग :** श्री.राजेश कांदळगांवकर, विभागीय अधिकारी, कोकण विभाग, श्री.आनंद विद्यागर, प्रकल्प अधिकारी, श्री.प्रदीप सावंत, क.प्र.अ. (से.पू.), मुंबई-उपनगर (एमएमआर) व मुख्य समन्वयक (सीएमईजीपी), कोकण भवन, ५वा मजला, रूम क्र.५१२ सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४. ☎२७५६३८९६, २७५६४०२५, ९४२३९३६००१, ७९७२८१५२२२, ९४०३६८३१८९. श्री.धम्मपाल थोरात, जि.प्र.समन्वयक (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, जिल्हाधिकारी कार्यालय, प्रशासकीय इमारत-अ, पहिला मजला, कक्ष क्र.१०३, कोळगाव, ता.जि.पालघर, ☎८६६९०५४०७८ श्री.प्रदीप सावंत, चारुशिला धर्माधिकारी, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा विकास आयुक्त (उद्योग) उद्योग संचालनालय, दुसरा मजला, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२. ☎७९७७२४२१६७, ८८५०२९२८४८. श्री.एस.के.बायस, प्रकल्प अधिकारी, द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, सी. एफ.सी.बिल्डिंग, पहिला माळा, मॉडेल वुलन मिलसमोर, मुलुंड चेक नाका, ठाणे-४०० ६०२.☎ २५८२५३४८, ७७७४०५३०१४. वर्षा मेश्राम, जिल्हा प्रकल्प समन्वयक (सेपू), पटेल मोटर्स, नगरपालिकेजवळ, शेतकरी भवनाजवळ, अलिबाग, जि.रायगड-४०२ २०१. ☎९८३४२२१९६०. **पुणे विभाग :** श्री.एस.के.थोटे, विभागीय अधिकारी, श्री. एम.डी.शेळके, प्रकल्प अधिकारी, कृषी महाविद्यालय आवार, शिवाजीनगर, पुणे-४११ ००५. ☎ ९४०३०७८७५३, २५५३७७२४/२५५२०३५९. श्री.मिलिंद लोंढे, क. प्र.अ. (से.पू.), एमसीईडी, सी-१८१, एच ब्लॉक, इंजिनिअरिंग ऑटो क्लस्टर परिसर, एमआयडीसी, पिंपरी चिंचवड, पुणे-४११ ०१९. ☎७३८७०२०२३५. श्री.राजशेखर शिंदे, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, होटगी नाका, किनारा हॉटेलसमोर, सोलापूर-४१३००३. ☎२६०५०३३, २३२२५२६, ९४०३६८३२१. सौ.शितल पाटील, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, प्लॉट क्र.ए-१३,औद्योगिक वसाहत, सातारा-४१५ ००४. ☎२४६५५५, २४४६५५, ८७८८१९०१८९. **कोल्हापूर विभाग :** श्री.एस.के.थोटे, विभागीय अधिकारी, श्री.प्रवीण कायंदे, क.प्र.अ. सौ.वनिता पाटील, क.प्र.अ. (से.पू.), दत्ताजी चेंबर्स, ३१५/ई, न्यू शाहूपुरी, मेरा हॉटेलसमोर, एस.टी.स्टँडजवळ, कोल्हापूर-४१६ ००२. ☎(०२३१) २६६६७४८, २६६२०७१,९४०३०७८७५३, ९४०३०७८७७४, ९४२२८१०८६३. श्री.दत्तात्रय क्षीरसागर, क.प्र.अ. (से.पू.), एमसीईडी, द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, उद्योग भवन, विश्रामबाग, सांगली-४१६ ४१६. ☎२६७११६९, ७०५७९९४३०८. श्री.रमेश जाधव, क.प्र.अ. (से.पू.) एमसीईडी, द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, बीडीओ स्टाफ क्वार्टरमागे, जेल मार्ग, रत्नागिरी. ☎२२१९८८, ९४०४९५०००४. श्री.आर.ए.गावडे, क.प्र.अ., द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, दुसरा मजला, ए ब्लॉक, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, सिंधुदुर्गनगरी, ओरोस, ता.कुडाळ, जिल्हा सिंधुदुर्ग, ☎२२१३६२, २२८७०५, ९४०३०७८७६७. **नाशिक विभाग :** श्री.आलोक मिश्रा, विभागीय अधिकारी, श्री.एस.ए.भामरे, प्रकल्प अधिकारी, श्री.मंगेश बनकर, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), ११, तळमजला, उद्योग भवन, त्र्यंबक मार्ग, सातपूर, नाशिक, ☎२३५२१५१, २३६३४१४, ९४०३०७८७६३, ७७२००७५९०१, ८२०८०५५०१९. आरती शेलोरकर, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, जमनागिरी मार्ग, धुळे-४२४००१, ८७८८५५७५३०. श्री.टी.पी.जिवडे, क.प्र.अ. (से.पू.) द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, स्टेशन मार्ग, अहमदनगर महाविद्यालयाजवळ, अहमदनगर. ☎२३२०४८५,९५६१७३७७४७. श्री.दिनेश गवळे, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से. पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, रिंग रोड, राष्ट्रीय महामार्ग, जळगाव-४२५ ००१. ☎२२५२८३२, ७७२००७५९०१. श्री.डी.एस.ढाकणे, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय, खोली क्र.२८ नंदुरबार. ☎०२५६४-२१०५१०, ८८८८५१०४९९. **नागपूर विभाग :** श्री.प्रदीप इंगळे, विभागीय अधिकारी, श्री.एस.एस.कुलकर्णी, प्रकल्प अधिकारी, शिवानी गायकवाड, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), उद्योग भवन, सिव्हिल लाइन्स, उच्च न्यायालयामागे, विक्री कर कार्यालयाजवळ, नागपूर. ☎२५३७०९७, ९४०३०७८७६९ ९४०३०७८७६०. श्री.एच.आर.वाघमारे, प्र.अ., केंद्र प्रमुख, एमसीईडी उपकेंद्र, श्री.पंकज ठाकरे, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), हिंगणा औद्योगिक परिसर, नागपूर, मो. ९४२२२७६७०१, ७७७४०३६२३२, ८९७५५०६६३०. श्री.रोशन तायवडे, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, वर्धा-४४२ ००१. ☎२४३४६३, ९८३४३५२२९५. श्री. संदीप जाने, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा उद्योग भवन, ब्लॉक क्र.८, दुसरा मजला, बस स्टँडसमोर, रेल्वे स्टेशन मार्ग, चंद्रपूर, ☎ २७४४१६, ९४०३०७८७७३. कु.काजोल राठोड, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, सिव्हिल लाइन्स, भंडारा. ☎२५८८६७, २५२३४७१, ७६६६१३६३८९. श्री.जितेंद्र चौरे, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), डोरलीकर भवन, नगर परिषदेजवळ, धानोरा मार्ग, गडचिरोली. ☎२२३३६५. संगीता ढोणे, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से. पू.), बोपचे भवन, हॉटेल सागरसमोर, बालाघाट मार्ग, गोंदिया-४४१ ६१४, ☎२५०२७४, ८७८८६४८९६५. **छत्रपती संभाजीनगर विभाग :** श्री.डी.यु.थावरे, विभागीय अधिकारी, सौ.भारती सोसे, क.प्र.अ. (से.पू.) सौ.प्रतिभा निमकर, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), एमसीईडी, अ-३८, रेल्वे स्टेशन परिसर, छत्रपती संभाजीनगर-४३१ ००१. ☎२३६१२२३. ९४०३०७८७६६, ९४०३६८३१७३, ९८८१३०४९३०. श्री.विनोद तुपे, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, प्लॉट क्र. पी-७, अतिरिक्त औद्योगिक वसाहत, जालना. ☎२२०२०३०६२८, ९०४९२२८८८८. श्री.खुशाल रोकडे, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, बशीर गंज, बीड-४३१ १२२. ☎२२२२८५, ७०५७९६८१३१. श्री.पांडुरंग कांबळे, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीसमोर, उस्मानाबाद-४३१ ५०१. ☎२२१५०५, ८२७५०९३२२८. **नांदेड विभाग :** श्री.किशोर अंभोरे, विभागीय अधिकारी, श्री.शंकर पवार, क.प्र.अ. (से.पू.), उद्योग भवन, तळ मजला, शिवाजीनगर, नांदेड. मो. ९४०३०७८७८३, ९४०३६८३१९७. श्री.के.व्ही.राठोड, प्रकल्प अधिकारी, हॉल क्र.७४, सर्व्हे नं. ६२२, वार्ड क्र.२०, चिद्रावार नगर, शासकीय कृषी कार्यलयाजवळ, जुना पेडगाव रोड, परभणी-४३१ ४०१. ☎२३३२७५, ९४०३०७८७७३. श्री.दिपक गायकवाड, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, प्लॉट क्र. पी-१, एमआयडीसी परिसर, लातूर-४१३ ५३७. ☎२२११००, ९४०४९५०००४. श्री. सुधीर आठवले, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, एस-१२, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, हिंगोली. ☎२२२२१८, ९७६५२९१७८५. **अमरावती विभाग :** श्री.पी.व्ही.इंगळे, विभागीय अधिकारी, श्री.पी.व्ही.इंगळे, प्रकल्प अधिकारी, श्री. राजेश सुने, क.प्र.अ. (से.पू.), श्री.नेत्रदीप चौधरी, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), टांक चेंबर्स, गाडगेनगर, व्ही.एम.व्ही.मार्ग, अमरावती-४४४ ६०२. ☎२६६०३१६, २६६५४७२. ९४०३०७८७६९, ८८५७८६९८८३, ९८२२४४१२०९. श्री.प्रसन्ना रत्नपारखी, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, जुने कॉटन मार्केट, अकोला-४४४ ६०२. ☎२४३५६८,० ९४०५३१५९४६. श्री.गणेश गुप्ता, क.प्र.अ. (से.पू.), द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, जतकर भवन, टिळकवाडी, बस स्टँड मार्ग, बुलढाणा, ☎२४२३६७/२४२६०४, ९८६००००६८१. श्री.रूपेश हिरुलकर, क.प्रकल्प अधिकारी (से.पू.), उद्योग भवन, अमरावती मार्ग, यवतमाळ. ☎२५५४१३, ८२७५०९३२३०. श्री.गौरव इंगळे, जिल्हा प्रकल्प समन्वयक (से.पू.), (एमसीईडी), जिल्हा उद्योग केंद्रासमोर, काटा मार्ग, शासकीय दूध डेअरीजवळ, वाशिम, मो. ९४०५५४८३२९

Rgd.No.RNI-66017/96 Udyojak March 2024
Date of Publication : 25th February 2024


For Posting under the Registration No. ABD/66/2022-2024 & Without Pre Payment of Postage of Posting WPP
License No.AR/Tech/WPP/Udyojak/AGD Dn/2021-22 Dated 08.03.2022 for the calendar year 2022 to 2024


# मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (CMEGP)

## मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमातून उद्योजक बनण्याची संधी

## धोरण रोजगार निर्मितीचे, उद्दिष्ट प्रगत महाराष्ट्राचे

* ''नोकरी मागणाऱ्यांपेक्षा नोकरी देणारे व्हा''
* मार्गदर्शन व गुंतवणूकीसाठी पैशांचा अभाव आहे का?
* उद्योजक होण्याचे स्वप्न प्रत्यक्षात उतरत नाही का?
* तर उद्योजक होण्याचे स्वप्न सत्यात उतरविण्यासाठी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम म्हणजेच सीएमईजीपीचा लाभ घ्या.
* या योजनेअंतर्गत निर्मिती व उत्पादन क्षेत्रासाठी ५० लाख तर
* सेवा व कृषि पूरक प्रकल्पांसाठी २० लाख रूपयांपर्यंतचे कर्ज पुरवठा.
* मोठ्या प्रमाणात अनुदानही उपलब्ध आहे.
* तर वाट कशाची बघता... आपले स्वप्न साकारण्यासाठी, स्वतःचा स्वंयरोजगार उभारण्यासाठी आजच सीएमईजीपीचा लाभ घ्या.



: अधिक माहिती व संपर्कासाठी :

राज्यस्तरीय संनियंत्रण : विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, नवीन प्रशासकीय इमारत, २रा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई - ४०० ०३२.
हेल्पलाईन नंबर : २२ २२०२ ३९१२.
महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र (संबंधित जिल्हा) जिल्हा खादी व ग्रामोद्योग अधिकारी (संबंधित जिल्हा)
संकेतस्थळ : www.di.maharashtra.gov.in, www.maha-cmegp.gov.in, www.mced.co.in

Scan Me

**Visit us @ https://www.maha-cmegp.gov.in**


If undelivered please return to

**Chief Editor,**
**Udyojak Magazine,**
उद्योजक
MCED, A-38, MIDC Railway Station Area,
**Chhatrapati Sambhajinagar-431005.**
Portal : www.mced.co.in

**To,**

Published & Printed by Santosh Borde on behalf of Maharashtra Centre for Entrepreneurship Development (MCED), Printed at M/s.Printwell International Pvt.Ltd., G-12, MIDC Chikalthana, Chhatrapati Sambhajinagar-431 006. Published from MCED, A-38, MIDC Railway Station Area, Chhatrapati Sambhajinagar-431 005. **Chief Editor : B.T. Yeshwante**